मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.


अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत


अनुक्रमणिका

अनुक्रमणिका



युगवाणी

एप्रिल | मे | जून
१९८८



अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

एप्रिल-मे-जून
एकोणवीसशे अठ्यांशी
वर्ष ४४ : अंक ४-५-६
[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

मुख्य संपादक : आशा सावदेकर
संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी
कार्यकारी संपादक : केशव जोशी

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

अनुक्रम • • •

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

■ संपर्क : संपादक युगवाणी, वि. सा. संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२ / दूरभाष : २१९२८

संपादकीय

'युगवाणी' च्या या अंकात कथा व कादंबरीविषयक असे काही लेख आणि संशोधनमहर्षी भाऊसाहेब कोलते यांचा लेख आहे. भाऊसाहेबांचे ८१ व्या वर्षात पदार्पण आणि संशोधन–लेख यांचा योग सहज जुळून आलेला आहे.

उत्कृष्ट साहित्य सेवेबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, यांनी गं. दे. खानोलकर यांचा सत्कार केला; आणि वा. भा. पाठक यांना कृतज्ञता निधी देण्यात आला. त्या दोघांच्या सत्काराबद्दल अभिनंदन करीत असताना खऱ्या साहित्यिकाचे रूप जाणवते. खरा साहित्यिक हा असा साहित्य सेवेत तृप्त असतो. व्यवहारी बाह्य जगाची प्रलोभने त्याला भूल घालू शकत नाहीत. त्याचा मार्ग निष्कंटक नसतो, पण आवडीचा असतो. तो त्याने आपणहून पत्करलेला असतो. म्हणूनच वाट्याला येणारे भोगही त्याला पत्करावे लागतात आणि समतोल वृत्तीने जगावे लागते.

अशा साहित्यसेवकांचा सत्कार करणे, त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे साहित्यप्रेमींचे कर्तव्यच असते.

मागील अंकात 'मानाचे पान' मध्ये डॉ. अ. ना. देशपांडे यांना पुणे विद्यापीठाने पीएच. डी. दिल्याचा उल्लेख आहे. त्याऐवजी नागपूर विद्यापीठाने पीएच्. डी. दिली असे वाचावे. चुकीबद्दल क्षमा असावी.

मानाचे पान

विदर्भ साहित्य संघाचे भूतपूर्व अध्यक्ष डॉ. विष्णु भिकाजी उर्फ भाऊसाहेब कोलते यांना २२ जून रोजी ऐंशी वर्षे पूर्ण झाली. पण अभ्यास, संशोधन आणि चिकित्सा या दृष्टीने भाऊसाहेब अजूनही तरुण आहेत. व्यासंग आणि ग्रंथप्रेम अखंड चालविण्याचे व्रतच त्यांनी घेतलेले आहे. १९३१ साली मराठीच्या पदव्युत्तर परीक्षेत नागपूर विद्यापीठात प्रथम येण्याचा मान मिळविणारे भाऊसाहेब स्वकष्टार्जित पात्रतेने त्याच विद्यापीठाचे कुलगुरू बनले. जिद्द आणि शिस्त या दोन गोष्टींच्या बळा-वर त्यांनी कुलगुरू म्हणून काम करीत असताना शिक्षणातल्या अनेक त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केला. पदव्युत्तर पातळीपर्यंत मराठी माध्यम आले. विद्यार्थ्यांच्या-त्यातल्या त्यात ग्रामीण भागातून येणाऱ्या-सोयींसाठी सर्व विषयांची पाठ्यपुस्तके मराठीतून निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती-मंडळाचे कार्यालय नागपुरात आले. विद्यापीठाचा प्रशासकीय कारभार मराठीतून चालावा यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले.

१९४८ साली गोंदिया इथे झालेल्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असताना महाराष्ट्र शासनाने आपला कारभार लोकभाषेतून चालवला पाहिजे, असे त्यांनी प्रथम बोलून दाखवले आणि १९६७ साली भोपाळला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवीत असताना आपल्या भाषणात त्यांनी 'बहुजनसमाजनिष्ठा' अशा नव्या साहित्य—मूल्याचा उद्घोष केला. इंग्रजीचे दडपण नको, संस्कृतची बळजोरी नको आणि हिंदीचे प्राबल्य नको असे म्हणत मराठीचे मराठीपण टिकविण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले.

भाऊसाहेब हे संशोधनमहर्षी आहेत. २१ स्वतंत्र ग्रंथ, १३ संपादित ग्रंथ, जवळ जवळ २५० संशोधन लेख, अशी भरीव साहित्यसेवा त्यांनी केलेली आहे.

आपल्या 'लव्हाळी' या कवितासंग्रहात लव्हाळ्याबद्दल भाऊसाहेब म्हणतात, 'खेडयाच्या पायाशी, नदीच्या थडीत, जन्मली गाऱ्यात, लव्हाळी ही'. ह्या लव्हाळ्याला नावगाव, रंगरूप नाही मग फुलेफळे कोठली ? भाऊसाहेब तुमच्या कर्तृत्वाने याचे उत्तर दिले आहे. आज जे लव्हाळे आहे असे वाटते ते उद्याच्या वृक्षाचे बीज आहे; हे तुम्ही आपल्या चिकाटी व परिश्रमाने सिद्ध करून दाखविले. भाऊसाहेब, या जीवनवृक्षाला फुले फळे तर आलीच पण त्याच्या सावलीत कितीकांनी विसावा घेतला, कित्येकांनी आधार शोधला. आज आपण ८१ व्या वर्षात पदार्पण करीत आहात. विदर्भ साहित्य संघ आणि 'युगवाणी' आपले अभिनंदन करीत आहेत, आणि आपल्याला दीर्घ आयुरारोग्य चिंतीत आहेत !

आशा सावदेकर

अनुक्रमणिका

श्रीमुख दृष्टांत आणि लीळाचरित्र

वि. भि. कोलते

दृष्टांत श्रीचक्रधरांचे ?

महाराष्ट्र शासनाने जुलै १९८२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'श्रीचक्रधरदर्शन' या ग्रंथात 'श्रीचक्रधर स्वामींचा दृष्टांतपाठ–काही विचार' (पृ. २२१ ते २४८) हा लेख मी लिहिला आहे. त्यात प्रामुख्याने मी तीन प्रश्नांचा विचार केला आहे.

१. मुद्रित 'दृष्टांत पाठा'च्या संपादण्यात प्रत्येक दृष्टांताच्या आरंभी स्वामींची एक किंवा अनेक वचने आढळतात, तशी ती मुळात आहेत काय ? या वचनांचा संबंध त्या त्या दृष्टांताशी केसोबासांनी लावला आहे काय ?

२. दृष्टांतांच्या शेवटी आलेली द्राष्टांतिके केसोबासांची आहेत काय ?

३. श्रीचक्रधर स्वामींनी हे दृष्टांत कुठून घेतले असावेत ?

आज त्याच विषयाशी संबद्ध अशा आणखी एका महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार प्रस्तुत लेखात करायचा आहे. हा प्रश्न असा की, श्रीचक्रधर स्वामींचे 'दृष्टांतपाठा'त आढळणारे हे सर्व दृष्टांत खरोखरच श्रीमुखोक्त आहेत काय ? म्हणजे असे की, त्यांनी त्या त्या प्रसंगी ज्या शब्दांत त्यांचे निरूपण केले त्याच शब्दांत ते आज 'दृष्टांतपाठा'त आढळतात की 'त्यांची मांडणी किंवा शब्दयोजना' यात 'केशिराजांचा काही वाटा आहे ?'

श्री चक्रधर व केसोबास यांचे ?

हे प्रश्न जवळ जवळ चोवीस वर्षांपूर्वी, इ. स. १९६४ मध्ये डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी उपस्थित केले आहेत. त्यांनी संपादन केलेल्या 'दृष्टांत पाठा'च्या प्रस्तावनेत, 'दृष्टांतपाठा'ची घडण कशी झाली ते सांगताना त्यांनी म्हटले आहे की, (१) प्रत्येक दृष्टांत केशिराजांनी 'लीळाचरित्रा'तून जसाच्या तसा घेतला आहे असे नाही. 'दृष्टांतपाठा'तील काही दृष्टांत 'लीळाचरित्रा'त संपूर्णतः सांगितलेले आहेत हे खरे असले तरी 'लीळाचरित्राचा' पाठ व केशिराजांनी दिलेला पाठ यात थोडा फरक आहेच. आतुलाचा व शय्यापालनेचा, या दोन दृष्टांतांचे या दोन्ही ग्रंथांतील पाठ उदाहरणादाखल घेऊन त्यांनी हे फरक दाखवून दिले आहेत. (२) दुसरे असे की, 'दृष्टांतपाठा'तील काही दृष्टांत असे आहेत की, त्यांचा उल्लेखच तेवढा 'लीळाचरित्रा'त आढळतो, प्रत्यक्ष दृष्टांत आढळत नाहीत. उदा. १३ वा, माळेकराचा दृष्टांत. त्याचे मूळ असलेली लीळा (उत्तरार्ध,१४०, नेने प्रत) 'यावरि गोसावी माळेकाराचा दृष्टांत नीरूपीला' इतकेच म्हणून थांबते, प्रत्यक्ष दृष्टांत सांगत नाही. हीच गोष्ट 'खडेया खुन्टेयाचा' (दृ. १५) व 'बांदकरीयाचा' (दृ. १६) यांसारख्या आणखी काही दृष्टांतांची आहे. या गोष्टीचा निर्देश करून डॉ. तुळपुळे म्हणतात :

डॉ. तुळपुळे यांचे मत

"यावरून दोन अनुमाने निघू शकतात. एक म्हणजे केशिराजबासापुढे असलेली 'लीळाचरित्रा'ची प्रत आपणापुढील नेने–संपादित प्रतीहून थोडी निराळी असावी. कारण, नाही तर 'लीळाचरित्रा'तील दृष्टांत व 'दृष्टांतपाठा'-तील दृष्टांत यांत पाठभेद दिसले नसते. याहून महत्त्वाचे दुसरे अनुमान असे की, 'दृष्टांतपाठा'-तील प्रत्यक्ष दृष्टांतांचा बराच भाग चक्रधरोक्त असला तरी तो म्हाइंभटांनी 'लीळाचरित्रात'त समाविष्ट न केल्यामुळे केशिराजांना तो स्वतः आठवून लिहावा लागला आहे. कारण पुष्कळ ठिकाणी 'लीळाचरित्र' जेथे 'मग सर्वज्ञें (अमुक) दृष्टांत निरूपिला' एवढेच म्हणून थांबते, तेथे केशिराजांनी आपल्या ग्रंथात तो दृष्टांत समग्र दिलेला आहे...याचा अर्थ असा की,

दृष्टांतपाठा 'तील 'दृष्टांत' हा भाग जो चक्रधराचा म्हणून समजला जातो तो सर्वस्वी तसा नसून त्यात केशिराजाचाही काही वाटा आहे. अर्थात, हे दृष्टांत चक्रधरांनी प्रत्यक्षात दिले यात शंका नाही, परंतु त्यांची मांडणी किंवा शब्दयोजना प्रत्येक ठिकाणी चक्रधरांचीच आहे. असे म्हणता येणार नाही, इतकेच. हेच निराळ्या शब्दात सांगायचे तर सूत्र चक्रधरांचे, दार्ष्टांतिक केशिराजांचे व प्रत्यक्ष दृष्टांत या दोघांचा अशी 'दृष्टांतपाठा'च्या कर्तृत्वाची त्रिभागणी करावी लागेल." (दृष्टांतपाठ. प्रस्ता. पृ. १०–११)

इ. स. १९६४ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'दृष्टांतपाठा'च्या आपल्या संपादणीतील प्रस्तावनेत डॉ. तुळपुळे यांनी व्यक्त केलेल्या मताच्या आधारे डॉ. श्री. र. कुळकर्णी यांनी 'केशिराजवासांनी हे सर्व दृष्टांत एकत्र करून केवळ उल्लेखाच्या रूपाने आलेल्या कथांचा विस्तार केला आहे'. असे आपल्या 'प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा आणि परंपरा' या ग्रंथात विधान केले आहे (पृ. ३१) पुढे डॉ. तुळपुळे यांनी आपल्या पूर्वोक्त मताचा पुनरुच्चार इ. स. १९७६ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय' या आपल्या ग्रंथातही केला आहे. (पृ. १८२–१८३)

डॉ. आवलगावकर व डॉ. डोळके

अलीकडे डॉ. रमेश आवलगावकर यांनी 'केशिराज व्यास : व्यक्ती आणि वाङ्मय' या आपल्या ग्रंथांत (इ. स. १९८३) हीच विचारसरणी स्वीकारून "काही दृष्टांतात...लीळाचरित्रात केवळ दृष्टांत आलेले आहेत. आणि काही ठिकाणी त्या दृष्टांतांचा उल्लेखच केलेला आढळतो. ते दृष्टांत व दार्ष्टांतिक केशिराजांनी पूर्ण केले. सारांश, दृष्टांतपाठाचे स्वरूप असे मिश्र स्वरूपाचे आहे. म्हणून त्यातील काही दृष्टांताचे व काही दार्ष्टांतिकांचे कर्तृत्व श्रीचक्रधरस्वामींकडे जाते तर काहींचे कर्तृत्व केशिराजांकडे येते" (पृ. ६३) असे म्हटले आहे. यावरून 'दृष्टांतपाठा'तील काही दृष्टांत केशिराजांचे आहेत, अर्थात, ते श्रीमुखोक्त नाहीत, असेच त्यांना म्हणायचे आहे, हे स्पष्ट दिसते. त्यांचे प्रस्तावनाकार डॉ. सुरेश म. डोळके यांना हा "डॉ. आवलगावकरांचा अभिप्राय यथायोग्य वाटतो." त्यांनी तर एक पाऊल पुढे टाकून असेही म्हटले आहे की, "केशिराजांनी असे हे दृष्टांत लीळाचरित्रातून निवडले असणे शक्य नाही. कारण लीळाचरित्रात ते नाहीतच." "केशिराजवासांनी ते लीळाचरित्रातून निवडलेले नाहीत, हे उघड आहे. मग हे दृष्टांत दृष्टांतपाठात कसे आले ? त्यांचे प्रत्यक्ष दर्शन लीळाचरित्र घडवीत नाही. केशिराजबासांनी अन्वयी लावलेला दृष्टांतपाठच त्यांचे पहिले दर्शन घडवितो. या दृष्टांताचे कर्तृत्व कुणाचे ? मला वाटते की केशिराजबासांच्या कर्तृत्वाचा हा भाग असावा... त्यांचे कर्तृत्व केशिराजांकडे दिले पाहिजे, असे मला वाटते." (प्रस्ता. पृ. ९–१०)

म्हणजे, 'दृष्टांतपाठा'तील ज्या दृष्टांतांचा लीळाचरित्रात नुसता निर्देश आहे, पण प्रत्यक्ष निवेदन नाही अशा दृष्टांतांचे कर्तृत्व डॉ. तुळपुळे चक्रधर व केशिराज या दोघांना देतात, तर डॉ. आवलगावकर व डॉ. डोळके ते फक्त केशिराजांना देतात !

अन्वयस्थळ व अन्वयमाळिकाकार

या प्रश्नांचा प्रत्यक्ष विचार करण्यापूर्वी त्यांची पार्श्वभूमी पाहाणे आवश्यक आहे.. ती पाहाताना जे महत्त्वाचे आधार वारंवार लक्षात घ्यावे लागणार आहेत ते येथे उद्धृत करणे इष्ट होईल.

(१) केसोबासांच्या ग्रंथनिर्मितीचा निर्देश करताना 'अन्वयस्थळ'कार धाकुटे सोंगोबास लिहितात

"भटां विद्यमान केसोबासीं : पूर्वी : १ पंचकृष्ण :२: नवहि प्रकरणें :९: ऐंसी :११: आनि आचार २८९ : दोन शतें न्याहासी वचनें १२ : आनि विचार २८५ : दोन शतें पंच्यासीं वचनें १३ : आणि द्राष्टान्तीकसहीत श्रीमुख दृष्टांत : ११४ : एकशत चौदा १४ : ऐसा चौदाही श्रीमुख प्रकरणासीं अन्वयो लावूनि आचार्यां दाखवीला : तो भटीं मानीला : ।। . . ."

(कोलते : महानुभाव संशोधन २. पृ. २७०)

(२) हाच वृत्तांत कृष्णमुनीच्या 'अन्वयमाळिके'त पुढीलप्रमाणे वर्णन केलेला आहे :

तीन्ही रूपें लीळा : श्रुती नीवडुनी : काढी-ल्या तेथुनी : कवणे ठाइं ।।३८।। भटां वीद्यमानीं : केशव पंडीतीं : नीवडील्या श्रुती : लीळेमाजी ।। ३९ ।। पुर्वी पंचकृष्ण : नवही प्रकर्णे : भटां संबंधुन : दाखवीलीं ।।४०।। दोन शतें नऊ : वचन आचार : संबंध सुंदर : लावीयेला ।।४१।। दोनशे पंच्याशी : विचार वचनें : संबंध गहन : लावीयेला ।।४२।। चौदोत्तरशत श्रीमुख दृष्टांत : दृष्टांतासहीत : लावणीक ।।४३।। ऐसा श्रीमुखासी : संबंध लाउनि : भटां दाखउनि : वीषेशीला ।।४४।। इत्यादि अन्वयो : केशव पंडीतीं लावीला नुगुती : श्रीमुखासी ।।४५।।

(नेने. संशोधनलेख संग्रह भाग १ पृ. १५५–१५६).

धाकुटे सोंगावास यांचे ' अन्वयस्थळ ' आणि कृष्णमुनी यांची 'अन्वयमाळिका ' यांतील केसोबासांच्या ग्रंथकर्तृत्वासंबंधी जे उतारे वर उद्धृत केले आहेत त्यांतील ' चौदाही श्रीमुख प्रकरणांतील पहिली तेरा प्रकरणे म्हणजे पूर्वी, पंचकृष्ण, नऊ प्रकरणे, आचार व विचार, यांचा अंतर्भाव ' सूत्रपाठा 'त आहे तर ' द्राष्टान्तीक-सहीत श्रीमुख दृष्टांत ११४ ' यांच्या संग्रहालाच आज ' दृष्टांतपाठ ' म्हणून संबोधतात. केसोबासांनी नागदेवाचार्यांच्या सान्निध्यात, ज्या प्रकरणांना अन्वय लावला ती चौदाही प्रकरणे श्रीमुख प्रकरणे होत असे ' अन्वयस्थळ ' व अन्वय-माळिका या दोहोंच्याही कर्त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे.

सर्वज्ञांचे श्रीमुख ते श्रुती :

' श्रीमुख प्रकरण ' म्हणजे श्रीमुखातून, अर्थात, श्रीचक्रधरस्वामी यांच्या मुखातून बाहेर पडलेले, त्यांनी उच्चारलेले किंवा निरूपिलेले प्रकरण ' अन्वयस्थळ 'कारांनी निर्देशिलेल्या चौदाही 'श्रीमुख-प्रकरणां 'तील ' सूत्रपाठा 'त अंत-र्भूत असलेली पहिली तेरा प्रकरणे, अर्थात त्यांतील वचने किंवा सूत्रे ही जशी श्रीमुख–वचने होत तसेच ' दृष्टांतपाठा 'त अंतर्भूत झालेले ११४ दृष्टांत हेही श्रीमुख–दृष्टांत होते; असे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे. जे दृष्टांत केसोबासांनी उद्धरणक्रमाने अन्वयी लावले ते सर्व श्रीमुख-दृष्टांत होते म्हणजेच प्रत्यक्ष श्रीचक्रधर स्वामींच्या मुखातून बाहेर पडलेले होते, हे यावरून निर्विवाद दिसून येईल. ' अन्वयमाळिका 'कार कृष्णमुनी यांनीही ' श्रीमुखासी संबंध लाउनि भटा दाखविला ' ' केशव पंडीती श्रीमुखासी नीगुती अन्वयो लाविला ' असेच म्हटले आहे. ' कृष्ण मुनींनी आणखीही एक गोष्ट स्पष्ट केली आहे. ती अशी की, केसोबासांनी ' तिन्ही रूपे लीळा : तेथुनी ' म्हणजे ' लीळाचरित्रा 'तून श्रुती निवडुनी काढिल्या ' (३८) ' केशव पंडिती भटां विद्यमानीं लीळेमाजी (=लीळांतून, अर्थात ' लीळा-चरित्रा 'तील लीळांतून) श्रुती नीवडील्या ' (३९). ' श्रीमुख ' या अर्थानेच त्यांनी ' श्रुती ' शब्द वापरला आहे. ' अन्वयस्थळ ' कारांनी ' सर्वज्ञाचे श्रीमुख ते श्रुति ' अशी व्याख्या केली आहे. कृष्णमुनीनेही ' ईश्वरें श्रीमुखें : केलें नीरोपण : श्रुत पैं गहन : बोलीयेलें : ' (२३) असेच म्हटले आहे. म्हणून, चौदा प्रकरणातील पहिल्या १३ प्रकरणाच्या, ' सूत्रपाठा 'त अंतर्भूत झालेली वचने या जशा ' श्रुति ' होत तसेच १४ व्या प्रकरणातील, ' दृष्टांतपाठा 'त अंतर्भूत झालेले दृष्टांत ह्यासुद्धा ' श्रुती 'च होत. कारण, ते श्रीमुखाने केलेले निरोपण आहे, हे लक्ष्यात येईल. आणि या ' श्रुति ' म्हणजे १३ प्रकरणांतील वचने, त्याचप्रमाणे श्रीमुख दृष्टांत केसोबासांनी ' लीळाचरित्रा 'तील लीळांतून निवडलेले होते. अशी निवड करून प्रकरणांचा अन्वय लावताना आचार्य नागदेव विद्यमान होते. इतकेच नाही तर म्हाइंभट विद्यमान होते व त्यांनी तयार केलेली ' लीळाचरित्रा 'ची मूळ पोथीही उपलब्ध होती. असे असताना, दृष्टांत प्रकरणाचा अन्वय लावा ताना, एखादा दृष्टांत उपलब्ध नसल्यामुळे, तो आठवून आठवून स्वतःच्या शब्दांत त्याची मांडणी करण्याची केसोबासांना आवश्यकताच नव्हती, हे नीट लक्षात घेतले पाहिजे.

दृष्टांत पाठ आणि लीळाचरित्र

या पार्श्वभूमीवर, डॉ. तुळपुळे, डॉ. आवलगावकर, डॉ. डोळके इत्यादींनी काही दृष्टांतांचे किंवा दृष्टांतातील काही भागांचे कर्तृत्व

केसोबासांना दिले आहे, या प्रश्नाचा विचार करावयाचा आहे. 'दृष्टांतपाठा'त एकूण दृष्टांत ११४ आहेत. ते 'लीळाचरित्रा'तील लीळातून निवडून अन्वयी लावले आहेत. त्याअर्थी ते सर्व 'लीळाचरित्रा'त आढळायला पाहिजेत, ही अपेक्षा वाजवी आहे. ती अपेक्षा पूर्ण होते की नाही, याचा पडताळा घेण्यासाठी या सर्व संशोधकांनी 'लीळाचरित्रा'च्या नेने प्रतीचा धांडोळा घेतलेला आहे. तेव्हा त्यांना असे आढळले की, लीळाचरित्रा'च्या त्या प्रतीत 'दृष्टांतपाठा'तील काही दृष्टांत पूर्ण स्वरूपात आहेत, तर काही दृष्टांत केवळ निरूपिल्याचे निर्देश आहेत. यांची निश्चित संख्या किती हे त्यांनी तपासून पाहिले नाही. मी तसा प्रयत्न केला, तेव्हा पुढील गोष्टी माझ्या निदर्शनास आल्या[1]

(१) 'दृष्टांतपाठा'तील पुढील ९ दृष्टांत 'लीळाचरित्रा'त पूर्ण स्वरूपात आहेत.

१. आतुलाचा : उत्त. ४७१ (उत्त. ४५६)
२. वाहीरीलाचा : उत्त. ४७१ (उत्त. ४५६)
३. उंबरेयावरिलाचा उत्त. ४७१ (उत्त. ४५६)
२८. तणधेलेया वावराचा : एकांक २५ (एकांक २५)
पूर्वार्ध भाग ३, पृ. १०९ (पूर्वार्ध २५१)
७६. वटरोपाचा : उत्त. ४७८ (उत्त. ४६०)
६१. सामान्य स्त्रिएचा : उत्त. ५००(उत्त.४८२)
६८ दुवळीए मातेचा : उत्त. ४९१ (उत्त. ४७३)
६९. वृक्षत्वचेचा : उत्त. ४९१ (उत्त. ४७३)
८५. शय्यापाळनेचा : उत्त. ४७८ (उत्त. ४६०)

(२) 'यावरि गोसावीं...अमुक अमुकाचा—दृष्टांत निरोपिला' अशा शब्दांत ज्यांचा केवळ निर्देश आढळतो असे दृष्टांत पुढीलप्रमाणे :–

११. वेवाचा : पूर्वार्ध भाग ३, पृ. ४० (पूर्वार्ध १७९)
१३. माळेकाराचा : उत्त. १४० (उत्त. १४३)
१४. डोळेयाचा : उत्त. २७८ (उत्त. २६८)
१५. खडेया खूव्रटेयाचा : पूर्वार्ध भाग ४, पृ. २८ (पूर्वार्ध ३११); उत्त. ४० (उत्त. ४०)
१६. वांदीकरियाचा : उत्त. १३९ (उत्त १४२)
१७. काकसूकराचा : उत्त. २५२ (उत्त. २४४)
२५. घासाचा : उत्त. ३९१ (उत्त. ३७८)
२९. कानवायराचा : उत्त. १२५ (उत्त. १२७)
३०. वेळुवाचा उत्त. १४६ (उत्त. १४८)
३९. हिरडेयावेहाडेयाचा : पूर्वार्ध भाग ३, पृ. ९३ (पूर्वार्ध २३७ टीप)
४२. वांदोवेयाचा : पूर्वार्ध भाग ३, पृ. ६. (पूर्वार्ध १२८)
४३. हस्तीचा : उत्त. १११ (उत्त. ११३)
४८. कर्मचांडाळाचा : उत्त. १२५ (उत्त. १२७)
५२. दीक्षितकन्येचा : उत्त. १२५ (उत्त. १२७)
५३. कुष्टियाचा उत्त. ११३ (उत्त. ११५)
५४. परिसाचा : पूर्वार्ध भाग ३, पृ. ११३; (पूर्वार्ध २५६)
५९. इषाळुवाचा : उत्त. २७३ (उत्त. २६३)
६२ दासीचा उत्त. २९० (उत्त. २७९)
६४. चाटसीएचा : उत्त. ४६१ (उत्त. ४५०)
७८. ब्रम्हचारी घोडेयाचा : उत्त. ९४ (उत्त. ९५)

'दृष्टांत निरूपिला :' संपूर्ण दृष्टांतच अपेक्षित :

म्हणजे, 'दृष्टांतपाठा'तील एकूण ११४ दृष्टांतांपैकी, संपूर्ण असे फक्त ९ व ज्यांचा केवळ नामनिर्देश आहे असे २०, मिळून २९ दृष्टांत 'लीळाचरित्रा'च्या उपलब्ध प्रतीत आढळतात. 'यावरि गोसावीं (अमुक अमुक) दृष्टांत निरोपिला' असे ज्यांचे नामनिर्देश आहेत; त्यांपैकी काही दृष्टांत त्या त्या ठिकाणी संपूर्ण स्वरूपात असावे असे मानण्याला जागा आहे. उदा.

(१) 'खडेया खूव्रटेया'च्या दृष्टांताचा निर्देश पाहा. 'या उपरि खडेया खूवटेयाचा दृष्टांत निरुपिला:' असे लिहिल्यानंतर लागलीच पुढे 'सर्वज्ञें' म्हणीतलें : "कव्हणी एकू उदकाचे..." हे त्या दृष्टांताचे पहिले वाक्य दिले आहे. त्यावरून त्या ठिकाणी तो संपूर्ण दृष्टांत अपेक्षित आहे हेच सुचविलेले आहे. 'लीळाचरित्रा'च्या संपादनासाठी मी घेतलेल्या मूळ अ प्रतीत जसा हा दृष्टांत या ठिकाणी संपूर्ण दिलेला आहे तसा गो. ह बी.

१. या लेखात प्रामुख्याने 'लीळाचरित्रा'च्या नेने प्रतीतील संदर्भ दिले आहेत. त्या लीळांचे तुळपुळे प्रतीतील संदर्भ त्याच पुढे कंसात दिले आहेत.

या प्रतीतही तो पूर्ण आहे. (कोलते प्रत. पूर्वार्ध ५४१ पाहा)

(२) 'यावरि गोसावीं काकसूक्राचा दृष्टांत निरूपिला' हा निर्देश ज्या लीळेत आहे त्या लीळेचा मथळाच 'मार्गी काकसूक्र दृष्टांतद्वारे इंद्रभटां सीक्षापण' असा आहे. त्यावरून या लीळेत हा संपूर्ण दृष्टांत असला पाहिजे. '...दृष्टांत नीरुपीला : मग...' या वाक्यावरून येथे पूर्ण दृष्टांत असावा असे वाटते. तसा तो क पाठाच्या पोथीत असल्याचे नेने यांनी टीपेत नमूदही केले आहे.

(३) 'आधारीचियें परिसाचा दृष्टांत २ निरूपिल्याची लीळा पाहा. यातील हिराइसा पाठाच्या मजकुरात 'सर्वज्ञें म्हणीतलें : "कव्हणी एकु माहात्मा तेयाचिये आधारियें परिसू असे :" अशी दृष्टांताच्या आरंभीची एकदोन वाक्ये देऊन नंतर 'ऐसा अवघा दृष्टांत निरोपीला' असे म्हटले आहे. यावरून मूळ पोथी-लेखकाला तो संपूर्ण दृष्टांत अभिप्रेत आहे, हे स्पष्ट होते. मी संपादनासाठी स्वीकारलेल्या अ प्रतीत आणि ह. बी. भ. गो. या प्रतीतही नामनिर्देशानंतर हा संपूर्ण दृष्टांत लीळेत दिलेला आहे. (कोलते प्रत. पूर्वार्ध ४७७ पाहा.)

(४) चांदोवेयाच्या दृष्टांताच्या लीळेत 'दुष्टांतु नीरोपिला' एवढेच म्हटले असले तरी त्या आधी या दृष्टांतातील काही वाक्ये आली आहेत. ती त्या दृष्टांतातील संक्षेपरूप वाक्ये असून त्याद्वारा तेथे संपूर्ण दृष्टांत असल्याचेच सूचित होते. मी संपादनासाठी घेतलेल्या अ. भ. गो. ह. बी. या प्रतीत या लीळेत हा संपूर्ण दृष्टांत लिहिलेला आहे. (कोलते प्रत. पूर्वार्ध ३०९ पाहा.)

(५) 'यावरि वेवाचा दृष्टांत नीरूपिला' या वाक्यानंतर मी संपादनासाठी घेतलेल्या अ. भ. प्रतीत मात्र हा दृष्टांत संपूर्ण दिलेला आहे.

'गोष्टि सांघितली' : संपूर्ण गोष्टींचे संसूचन : एकांक कथा

यावरून दिसून येईल की, 'यावरि गोसावीं (अमुक अमुक) दृष्टांत निरुपिला' असा 'लीळाचरित्रा'त, अर्थात 'लीळाचरित्रा'च्या पोथीत जेथे जेथे उल्लेख असतो तेथे तेथे, त्या निर्देशानंतर तो दृष्टांत संपूर्ण स्वरूपात आहे असे वाचकांनी समजावे, अशीच पोथी-लेखकाची अपेक्षा असते. 'दृष्टांतपाठा'त ते दृष्टांत पूर्णपणे घेतलेले असल्यामुळे 'लीळाचरित्रा'त त्या त्या दृष्टांताच्या प्रकरणात केवळ त्यांचा नामनिर्देश केलेला आहे. 'लीळाचरित्रा'च्या पोथ्यांत ही पद्धती अन्यत्रही स्वीकारलेली आहे. उदा. श्रीचक्रधरस्वामींनी एकांकी परिभ्रमणातील आपली चरित्रे पुढे पूर्वार्ध व उत्तरार्ध काळात अनेक भक्तांना सांगितली. तशी ती ज्यावेळी सांगितली त्यावेळी तेथे, स्वामींच्या त्या एकांकातील चरित्राचा नुसता नामनिर्देश केला आहे. ते चरित्र स्वामींनी त्यावेळी तेथेच सांगितलेले असले तरी संपादक म्हाइंभट यांनी, किंवा नंतरच्या पुनर्लेखकांनी स्वामींच्या एकांक लीळांचा विभाग पूर्वार्धाच्या आरंभी संगृहीत केलेला असल्यामुळे, प्रत्यक्ष त्या ठिकाणी ती लीळा पूर्णपणे न लिहिता केवळ तिचा नामनिर्देशच केला आहे. उदा.

(१) नेने प्रत. भाग २, पृ. ६२; तुळपुळे प्रत. पूर्वार्ध लीळा ११६, 'पद्मनाभी स्तीति'–या लीळेत 'या उपरि **पंचकौळाचार्यांची गोष्टी सांगितली.'** असा केवळ निर्देश केला आहे. कारण ती गोष्ट 'एकांक' विभागात (लीळा १९) सविस्तर घेतलेली आहे. तेथे ज्या प्रसंगी स्वामींनी ती गोष्ट सांगितली तो प्रसंगही सारांशरूपाने दिलेला आहे.

(२) उत्त. लीळा. ३९८; तुळपुळे उत्त. ३८६; 'श्रीप्रभु परमगुरु नीखेद' या लीळेच्या शेवटी 'या उपरि गोसावी तेयां **कांतिएची गोष्टी सांघितली'** असा नुसता निर्देश केला आहे, प्रत्यक्ष ती गोष्ट त्या ठिकाणी लिहिलेली नाही. कारण, ती एकांक विभागात (लीळा १०) पूर्णपणे घेतलेली आहे. तेथेही त्या गोष्टीचा उत्तरार्धातील प्रसंग थोडक्यात दिलेला आहे.

(३) पूर्वार्ध भा. ३ पृ. १०१; तुळपुळे. पूर्वार्ध २४५, 'आपलो भेटि' या लीळेत 'मग या उपरि गोसावीं **जुतक्रीडेची गोष्टि सांघीतली'** असा नुसता निर्देश आहे. तेथे ती गोष्ट दिलेली

नाही. कारण ती एकांक विभागात घेतलेली आहे.

याशिवाय 'या उपरि गोसावी **कामाक्षेची गोष्टी सांघीतली.**' : (पूर्वार्ध भाग ३, पृ. १०७); 'या उपरि गोंडवाडाचि गोष्टि सांघीतली :' (उत्त. ३१.); 'या उपरि भांडारेकाराची गोष्टि सांघितली :' (उत्त. ४७७), इत्यादी कथानिर्देश पाहा. तेथे त्या गोष्टी समग्र लिहिलेल्या नाहीत, कारण त्या एकांक विभागात (अनुक्रमे लीळा ३, २२, २९-३०) घेतलेल्या आहेत.

लीळाचरित्र व द्वापर-लीळा

द्वापर (श्रीकृष्ण) चरित्र आणि लीळाचरित्र यांचे निरीक्षण केल्यास पोथी-लेखकांच्या याच धोरणाचा पाठपुरावा होतो. आपल्या पूर्वार्ध व उत्तरार्ध आयुष्यात स्वामींनी निरनिराळ्या प्रसंगी भक्तांना श्रीकृष्णाच्या लीळा सांगितल्या. या सर्व तेथून निवडून काढून 'द्वापर-चरित्रे' (=श्रीकृष्ण चरित्र) हा ग्रंथ तयार केला आहे. 'द्वापर-चरित्रे' या स्वतंत्र ग्रंथात त्या एकत्रित केलेल्या असल्यामुळे, त्या लीळा स्वामींनी पूर्वार्धात व उत्तरार्धात ज्या ठिकाणी व ज्या प्रसंगी सांगितल्या तेथे त्यांचा केवळ नामनिर्देश केलेला आहे. काही उदाहरणे येथे देतो.

(१) 'यावरि गोसावीं कुब्जका भवनीं बीजें केलें ते गोष्टी सांघितली :'-पूर्वार्ध भाग ३, पृ. ६८; तुळपुळे. पूर्वार्ध २०८;

(२) 'यावरि गोसावीं जरासंधाची गोष्टि सांघितली :'-उत्त. २९४; तुळपुळे. उत्त. २८३.

(३) 'यावरि गोसावीं 'प्रभासेचि गोष्टि सांघितली '-उत्त. २७४; तुळपुळे उत्त. २६४

(४) 'यावरि वरुणलोका नंदु नेला हे गोष्टि सांघितली '-अज्ञात लीळा ९६, (कोलते प्रत.)

(५) 'मग यावरि गोसावीं खीराब्धिची गोष्टि सांघितली :'-पूर्वार्ध ३६३; कोलते प्रत. इत्यादी.

या गोष्टी त्या त्या ठिकाणी पूर्णपणे सांगितलेल्या नाहीत. कारण, त्या द्वापरचरित्रात म्हणजेच श्रीकृष्णचरित्रात अंतर्भूत केलेल्या आहेत. यावरून हे दिसून येईल की, 'लीळाचरित्रा'च्या पूर्वार्धात किंवा उत्तरार्धात स्वामींच्या एकांक परिभ्रमणातील किंवा श्रीकृष्ण-चरित्रातील लीळेचा निर्देश 'मग यावरि गोसावी अमुक अमुक गोष्टि सांघितली' अशा स्वरूपात जेथे येतो तेथे ती संपूर्ण लीळा किंवा गोष्ट अभिप्रेत असते. ती तेथे लिहिलेली आहे असे समजायचे असते. तेथे तिचा केवळ नामनिर्देश आहे, ती पूर्ण गोष्ट तेथे नाही, याचा अर्थ श्रीचक्रधरांनी ती सांगितली नाही, किंवा 'लीळाचरित्रा'त ती नाही, असे समजणे चुकीचे होईल. हीच वस्तुस्थिती 'लीळाचरित्रा'-तील काही दृष्टांताच्या नामनिर्देशासंबंधीही आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. लेखकाने ते त्या ठिकाणी पूर्ण स्वरूपात लिहिले नाहीत, कारण 'दृष्टांतपाठ' या ग्रंथात ते स्वतंत्रपणे संकलित केलेले आहेत.

दृष्टांतांची निवड म्हाइंभटांच्या मूळ 'लीळाचरित्रा'तून

या नामनिर्देशाच्या आधारे "हे दृष्टांत 'लीळाचरित्रा'तून निवडले असणे शक्य नाही. कारण, ते लीळाचरित्रात नाहीतच." "वरील सारखे काही दृष्टांत दृष्टांतपाठात आहेत, लीळाचरित्रात ते नाहीत, अर्थात केशिराजबासांनी ते लीळाचरित्रातून निवडलेले नाहीत, हे उघड आहे." अशी ठाम विधाने करणारे संशोधक, आज उपलब्ध असलेल्या 'लीळाचरित्रा'च्या पाठाच्या आधारे अशी विधाने करतात. तेव्हा ते हे विसरतात की, केसोबासांनी 'लीळाचरित्रा'तून काही दृष्टांत निवडून ते उद्धरणक्रमाने अन्वयी लावले त्यावेळी त्यांच्यासमोर म्हाइंभटांनी तयार केलेला 'लीळाचरित्रा'चा मूळ पाठ होता, **आजचा पाठ** नव्हे. म्हाइंभटाचा 'लीळाचरित्रा'चा मूळ पाठ खालशाच्या धाडीत नाहीसा झाल्यावर हिराइसाने त्याचे पुनर्लेखन केले. आज उपलब्ध असलेल्या अनेक पाठांना आधारभूत असलेला हिराइसाचा पाठ किंवा पिढीपाठ हा पुनर्लिखित पाठ आहे; मूळ पाठ नव्हे. केसोबासांनी त्या मूळ पाठातून दृष्टांत निवडलेले आहेत. हे कार्य त्यांनी केले त्यावेळी नागदेवाचार्य विद्यमान होते, इतकेच नाही तर त्यांच्या आज्ञेने व संमतीने 'लीळाचरित्रा'तील लीळांचे संशोधन करणारे म्हाइंभटही विद्यमान होते, हे विसरता कामा नये.

उपलब्ध 'लीळाचरित्रा'च्या या पुनर्लिखित

पाठात काही दृष्टांतांचे केवळ नामनिर्देश आहेत, प्रत्यक्ष दृष्टांत 'लीळाचरित्र' सांगत नाही. अर्थात ते 'लीळाचरित्रा'त नाहीत; मग ते 'दृष्टांत-पाठा'त कसे आले, असा प्रश्न उपस्थित करून त्याला उत्तर देताना हे संशोधक त्यांचे कर्तृत्व केसोबासांकडे देतात, हे पाहून मौज वाटते. मौज अशासाठी की, उद्धरणक्रमाने हे दृष्टांत अन्वयी लावताना 'केसोबासीं भटोबासातें पुसपुसों दृष्टांत प्रकरणाही अन्वयो लाविला' असे 'स्मृतिस्थळ' सांगते. (स्मृती. १७), 'अन्वयस्थळ'कार सोंगोबास व 'अन्वयमाळिका'कार कृष्णमुनीही तेच सांगतात, याचा निर्देश यापूर्वी केलेलाच आहे. हा अन्वय लावताना, 'लीळाचरित्रा'त ज्यांचा केवळ नामनिर्देश आहे, अर्थात चक्रधरांनी जे पूर्णपणे सांगितलेच नाहीत असे दृष्टांत केसोबासांनी पूर्ण केले, त्यांनी ते आपल्या शब्दांत मांडले म्हणून त्यांचे कर्तृत्व केसोबासांकडे येते, असे हे विद्वान जेव्हा म्हणतात तेव्हा केसोबासांनी आपल्या शब्दांत मांडलेल्या या 'स्वोक्ती'पूर्ण दृष्टांतांना 'श्रीमुखोक्त दृष्टांत' म्हणून नागदेवाचार्यांनी मान्यता दिल्याचेच ते अप्रत्यक्षपणे सुचवितात. हे होणे शक्य नाही. मौज अशी की, अशा दृष्टांतातील काही दृष्टांत तर स्वामींनी प्रत्यक्ष भटोबासांना म्हणजे नागदेवाचार्यांनाच निरूपिलेले आहेत. उदा. वांदिकरियाचा, वेळुवाचा, चांदोवेयाचा, दासीचा, माळेकाराचा. दृष्टांत अन्वयी लावताना हे दृष्टांत जर खरोखर केसोबासांना 'लीळाचरित्रा'त आढळले नसतील तर त्यांनी ते प्रत्यक्ष आचार्यांना विचारले नसतील काय ? केसोबासांनी आपल्या शब्दांत त्यांची मांडणी केल्यावर त्या दृष्टांतांना 'श्रीमुखोक्त' म्हणून नागदेवाचार्यांनी मान्यता देणे कसे शक्य आहे ?

नामनिर्देशही नसलेले दृष्टांत कोणाचे ?

ज्या तर्कपद्धतीने काही दृष्टांतांचे 'कर्तृत्व' केसोबासांकडे देण्याचा प्रयत्न या संशोधकांनी केला आहे त्याच पद्धतीने विचार करू जाता आणखी काही प्रश्न समोर उभे राहातात. 'दृष्टांतपाठा'तील 'लीळाचरित्रा'त असलेले पूर्ण दृष्टांत व ज्यांचा केवळ नामनिर्देश आहे असे दृष्टांत यांची एकूण संख्या २९ आहे. याचा अर्थ असा की, ११४ दृष्टांतांपैकी ८५ दृष्टांतांचा तर 'लीळाचरित्रा'त उल्लेखसुद्धा नाही. मग ते उल्लेख 'दृष्टांतपाठा'त कसे आले ? संशोधकांच्या वरील तर्कपद्धतीने विचार केला तर असे म्हणावे लागेल की, हे ८५ दृष्टांत 'केसोबासांनी' स्वत: रचले आणि नागदेवाचार्यांच्या संमतीने 'श्रीचक्रधरोक्त' म्हणून 'दृष्टांतपाठा'त खुशाल दडपून दिले. आपले कर्तृत्व श्रीचक्रधरांच्या नावावर खपविण्याच्या केसोबासांच्या या चलाखीबद्दलही त्यांच्यावर कौतुकाची छत्रचामरे ढाळण्याला हे संशोधक कमी करणार नाहीत, असे समजायचे काय ?

नऊ प्रकरणांतील किती प्रकरणे 'लीळाचरित्रा'त आहेत ?

दुसरे असे की, ज्या तर्कपद्धतीच्या भिंगातून या संशोधकांनी 'दृष्टांतपाठा'चा विचार केला व काही दृष्टांतांचे कर्तृत्व केसोबासांकडे दिले त्याच तर्कपद्धतीच्या भिंगातून केसोबासांनी अन्वयी लावलेल्या 'सूत्रपाठा'कडे ते का पाहात नाहीत ? 'दृष्टांतपाठा'तील दृष्टांत जसे 'लीळाचरित्रा'तून निवडून अन्वयी लावल्याचे म्हटले आहे तसेच सूत्रपाठा'तील सर्व प्रकरणांतील वचनेही केसोबासांनी 'लीळाचरित्रा'तूनच निवडल्याचे सर्वच मान्यवरांनी मान्य केले आहे. अर्थात, दृष्टांतांप्रमाणेच ती सर्व वचनेही 'लीळाचरित्रा'त आढळायला पाहिजेत. तशी ती आढळतात काय ? 'सूत्रपाठा'च्या आरंभीच्या 'पूर्वी' प्रकरणातील 'सृष्टीमध्ये कव्हणें करणें मुंचिजे ना एकें परमेश्वरेवीण . . .' हे पहिलेच वचन उदाहरणार्थ घ्या. हे 'पूर्वी' प्रकरण श्रीचक्रधरस्वामींनी म्हाइंभटांना पहिल्याच भेटीत डोमेग्रामी असताना निरूपिलेले आहे. नेने प्रतीच्या उत्तरार्धातील १११ व्या लीळेत (तुळपुळे प्रत. उत्त. ११३) हा वृत्तांत आला आहे. तेथे प्रस्तुत वचन 'सूत्रपाठा'त आहे त्या स्वरूपात आढळत नाही. त्या ऐवजी 'सृष्टीमध्ये जीऊ जेतुलेही करी तेतुलेनि काइसेनही मूंचे ना : एक वांचौनि' – अशा स्वरूपात ते तेथे आहे. तथापि

'प्रकरणवश'[1] (पृ.४) 'निरूक्तशेष'[2] (पृ.१७०), 'लक्षणबंद'[3] (पृ. ७) इत्यादी ग्रंथांत मात्र 'सूत्रपाठा'तल्या प्रमाणेच ते आहे. अर्थात, ते 'लीळाचरित्रा'त नाही. 'अन्यव्यावृत्ती' हे प्रकरण स्वामींनी दाइंबाला अनेक ठिकाणी निरूपिले आहे. त्यापैकी पूर्वार्ध भाग ३, पृ. ९२ वरील 'दायांबा पाटणीं सारिखेवाटणी' (तुळपुळे. पूर्वार्ध २३७) या लीळेमध्ये 'मग गोसावीयां दायांबासि अन्यव्यावृत्ती निरूपिली' असा फक्त त्या प्रकरणाचा नामनिर्देश आहे, त्यातील वचने तेथे नाहीत. 'दाइंबा जवळीक निराकरणे' (नेने. उत्त. ३४८; तुळपुळे. उत्त. ३३७) या लीळेत या प्रकरणातील १० व्या वचनाचा पूर्वार्ध 'चैतन्यापर परमेश्वरु' तेवढा आला आहे. 'प्रकरणवशा'–नुसार (पृ. ६) पूर्वार्धाच्या शेवटी 'भटां ईश्वर–प्रतीति करणें' (भाग ४, पृ. ५७–६०; तुळपुळे. पूर्वार्ध ३५६) स्वामींनी भटोबासांना अन्यव्यावृत्ती, युगधर्म, विद्यामार्ग, संहार व संसरण ही पाच प्रकरणे निरोपिली. पण तत्संबद्ध पूर्वार्धातील उपरोक्त लीळेत त्यांचा नामनिर्देशही नाही, मग ती संपूर्ण प्रकरणे तेथे कुठून असणार ? 'प्रकरणवशा'नुसार (पृ. ८) युगधर्म प्रकरण स्वामींनी एकाइसाला 'विश्वपति निरूपण'-प्रसंगी निरूपिले (उत्त. ३७६; तुळपुळे. उत्त. ३६५). विद्यामार्ग प्रकरण दायंबाला 'दीढ पुरुष माहात्मे उपहासु' प्रसंगी 'अंशवेधें संपूर्णाची प्राप्ती' या वचनाच्या अनुषंगाने निरूपिले (उत्त. ४१६; तुळपुळे. उत्त. ४०४). संहार प्रकरण गळनिबा येथे 'परसनाएका स्तीत्यादि मरणी वानरेयादीकां संबोखु' प्रसंगी निरूपिले (उत्त. २६३; तुळपुळे. उत्त. २५३) 'सूत्रपाठा'तील या प्रकरणांचा त्या त्या प्रकरणांच्या लीळात नामनिर्देशसुद्धा नाही, मग त्यातील वचने तेथे कुठून असणार ? 'अस्तिपरी' हे प्रकरण स्वामींनी भटोबासांना 'असन्निधानधर्म निरूपण'–प्रसंगी निरूपिले. (उत्त. ४७८; तुळपुळे. उत्त. ४६०) 'अस्तिपरी'च्या 'प्रकरणवशा'च्या लीळत 'एथ गोसावीं असतीपरीचें पहिले वचन निरूपिले असे म्हटले आहे. तथापि, 'प्रकरणवशा'नुसार अस्तिपरी पूर्ण स्वरूपात या प्रसंगी निरुपिली असावी. कसेही असले तरी 'अस्तिपरी'चे कोणतेही वचन त्या लीळेत नाही; प्रकरणाचा नामनिर्देश मात्र आहे. 'उद्धरण' प्रकरणातील वचने स्वामींनी 'डांगरेया देहावसान' उत्त. ३०५; तुळपुळे. उत्त. २९४) 'सारंगपंडिता दत्तश्रीकरावलंबन अनुसरण कथन' (उत्त. ३३७; तुळपुळे. उत्त. ३२६) आणि 'जीवा अविद्ये विभाग कथन' (उत्त. ३९३; तुळपुळे उत्त. ३८०) या तीन लीळांच्या प्रसंगी निरूपण केली, असे 'प्रकरणवशा'वरून समजते. पण या तिन्ही लीळांत या प्रकरणातील कोणतीच वचने नाहीत, इतकेच नाही तर तेथे स्वामींनी अशी काही वचने निरूपिल्याचा निर्देशही नाही. या प्रकरणातील 'अनुसरलेयासि देवत्व तिर्यंचत्व होणे नाहीं' हे दहावे वचन 'तथा तरु-दुम्ब निरूपणें' (उत्त. ८६; तुळपुळे. उत्त. ९७) या लीळेत आढळते. तसेच 'साध्याचिया प्राप्ती साधन निवर्ते' हे ५८ वे वचन 'भटां शास्त्रसीधांतु कथन' (उत्त. ५०२; तुळपुळे. उत्त. ४८४) या लीळेत आढळते, याचा निर्देश करणे आवश्यक आहे. 'महावाक्या'चा प्रकरणवश 'भटा शास्त्रासीधांतु कथन' ही लीळा आहे. (लीळाचरित्र, उत्त. ५०२; तुळपुळे उत्त. ४८४) तेथे महावाक्यातील वचने नाहीत, प्रकरणाचा नामनिर्देशही नाही. 'निर्वचना'चा प्रकरणवश 'प्रार्थवाइसा देवो निरूपणीं भटोबासाचा उपाहारू स्वीकारू' ही लीळा आहे. (उत्त. १०७; तुळपुळे उत्त. १०९) या लीळेतही 'सूत्रपाठा'च्या निर्वचन प्रकरणातील वचने नाहीत. 'आचार' प्रकरणातील २८९ सुमारे १२१ व 'विचार' प्रकरणातील २८६ वचनांपैकी सुमारे ६६ वचने निरनिराळ्या लीळांत आहेत. म्हणजे या दोन प्रकरणातील जवळजवळ ३८७ वचने 'लीळाचरित्रा'त नाहीत.

ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन, डॉ. तुळपुळे, आवलगावकर व डोळके यांच्या तर्कपद्धतीच्या भिगातून 'सूत्रपाठा'कडे पाहिले तर असे म्हणावे

---

१. प्रकरणवश, संपादक : मा. का. पंजाबी, अमरावती

२. निरुक्तशेष, संपादक : य. खु. देशपांडे

३. लक्षणबंद, संपादक : वि. भि. कोलते.

लागेल की ' 'सूत्रपाठा'चा मुख्य गाभा म्हणजे अन्यव्यावृत्ती, विद्यामार्ग, युगधर्म, असतीपरी, संहार, संसरण, उद्धरण, महावाक्य व निर्वचन ही नऊ प्रकरणे, यातील वर निर्देशिलेली तीन वचने वगळता जवळजवळ बहुतांश वचने आज उपलब्ध असलेल्या 'लीळाचरित्रा'त नाहीत. तेव्हा या संशोधकांच्या मते, या प्रकरणातील वचने केसोबासांनी 'लीळाचरित्रा'तून निवडली असणे शक्य नाही. मग ती वचने (व त्यांची प्रकरणे) 'सूत्रपाठा'त आली कशी? 'दृष्टांतपाठा'तील बव्हंश दृष्टांतांप्रमाणे या वचनांची निर्मितीही केसोबासांची असावी, तो केसोबासांच्या कर्तृत्वाचा भाग असावा, असे अनुमान या संशोधकांच्या तर्कपद्धतीनुसार काढले तर ते यथार्थ होईल काय?

लीळाचरित्राचे पुनर्लेखन :

अर्थात, नाही. 'सूत्रपाठा'तील वचने व दृष्टांत केसोबासांनी 'लीळाचरित्रा'तून निवडून अन्वयी लावली हे 'अन्वयस्थळ'कारांनी म्हटले आहे. ती वचने व दृष्टांत हे श्रीमुखोक्त होत याबद्दल त्यांच्यात एकवाक्यता आहे. अर्थात, म्हाइंभटांनी संकलित केलेल्या मूळ 'लीळाचरित्रा'त ती सर्व असलीच पाहिजेत. हे मूळ 'लीळाचरित्र' शके १२४० (इ. स. १३१८) मध्ये खालशाच्या धाडीत नष्ट झाल्यावर हिराइसाने त्याचे पुनर्लेखन स्थूलमानाने शके १२४२ (इ. स. १३२०) च्या सुमारास केले. या पुनर्लेखनाचे स्वरूप कसे होते? त्यासंबंधी मी अन्यत्र केलेले विवेचन येथे उद्धृत करणे इष्ट होईल :

"–हिराइसाने 'लीळाचरित्रा'चे पुनर्लेखन केले म्हणजे काय केले? म्हाइंभटांची संहिता तिने शब्दशः सांगून लिहून काढली काय? तसे तिने केले असल्याचे (आज उपलब्ध असलेल्या हिराइसा पाठावरून देखील) आढळत नाही. कारण, तसे करण्याची त्यावेळच्या आचार्यादी प्रज्ञावंत महंतांना व म्हणून हिराइसालाही आवश्यकता वाटली नाही. कोणत्या का रीतीने होईना, म्हाइंभटांनी तयार केलेले संपूर्ण 'लीळाचरित्र' पूर्ण स्वरूपात पुन्हा उपलब्ध होणे एवढीच त्यावेळी आवश्यकता होती. म्हाइंभटांनी तयार केलेल्या 'लीळाचरित्रा'ची एकमेव पोथी नाहीशी झाली होती हे खरे, पण त्यातील काही भाग निरनिराळ्या रूपांनी अजून विद्यमान होता. 'लीळाचरित्रा'तून सर्वज्ञांची वचने निवडून व त्यांचा आचार-विचारांच्या अनुषंगाने अन्वय लावून केसोबासांनी नागदेवाचार्यांच्या विद्यमानीच 'सूत्रपाठ' तयार केला होता. त्याचप्रमाणे 'लीळाचरित्रा'त आलेल्या, सर्वज्ञांनी वेळोवेळी सांगितलेल्या दृष्टांतांतून ११४ दृष्टांत निवडून व उद्धरणक्रमाने त्यांचा अन्वय लावून 'दृष्टांतपाठ'ही स्वतंत्रपणे तयार केला होता. ही वचने व दृष्टांत 'लीळाचरित्रा'तून वेगळी काढताना त्यांच्या 'प्रकरणवशा' सहित म्हणजे सर्वज्ञांनी ती वचने व दृष्टांत ज्या प्रसंगी सांगितले त्या प्रसंगांच्या लीळांसहित वेगळी काढली असावीत असे दिसते. कारण, या वचनांच्या प्रकरणवशाची स्वतंत्र पोथी त्याचवेळी परशरामबासाकडून तयार झाली असावी; असे म्हणण्यास जागा आहे. 'लीळाचरित्रा'तील वचने, वचनांचे प्रकरणवश, आणि अन्वयी लावलेले दृष्टांत स्वतंत्रपणे उपलब्ध असल्यामुळे 'लीळाचरित्रा'चे पुनर्लेखन करताना ती वगळली तरी हरकत नव्हती. म्हणून हा भाग वगळून 'लीळाचरित्रा'चे पुनर्लेखन झाले असावे. 'चरित्रा'च्या किंवा 'लीळे'च्या निवेदनात पूर्वापर संदर्भाला आवश्यक व अपरिहार्य असतील तेवढीच वचने व दृष्टांत ठेवून आणि बाकीची वगळून (कारण ती अन्यत्र उपलब्ध होती) हिराइसाने चरित्रांचे पुनर्लेखन केले असावे असे स्पष्ट दिसते. आज उपलब्ध असलेल्या कोणत्याही पाठात सर्व वचने व दृष्टांत आढळत नाहीत, याचे कारण हे होय. हा अपवाद वगळता हिराइसाकडून म्हाइंभटांच्या चरित्रांचे पुनर्लेखन यथातथ्य स्वरूपात झाले असावे, असे म्हणण्यास हरकत नाही." (लीळाचरित्र. संपा. कोलते. प्रस्ता. पृ. ६९)

'सूत्रपाठ' व 'दृष्टांतपाठ' यांतील वासना

यावेळी 'लीळाचरित्रा'चे जसे पुनर्लेखन झाले तसेच 'सूत्रपाठ' आणि 'दृष्टांतपाठ' यांचेही झाले असावे असे वाटते. कारण, एक तर या ग्रंथाची जी हस्तलिखिते उपलब्ध आहेत त्यात

पाठभेद अनेक ठिकाणी आढळतात. काही पाठभेद तर 'सूत्रपाठा'तील वचनांतच आज अंतर्भूत झालेले आहेत. उदा. 'कव्हणी एकु वेदविभागु चैतन्याचेया अस्तित्वातें जाणे : तथा बोले :' (विचार, १४); 'आउवेचा भावो काइसेया एका न पुरे : वासना : प्रेमा वारिया सरे :" (विचार २३१), '...त्र्यंशु हा निरूपावेया दोषें भणिजतु असिजे : वासना : निरूपावेया दोषें भणिजे :' (विचारमाळिका १२)इत्यादी. याशिवाय निरनिराळ्या हस्तलिखितांतील वचनांत शब्दांचे व वाक्यांचेही पाठभेद आहेत. शिवाय, आज उपलब्ध असलेल्या 'लीळाचरित्रा'त आलेली काही वचने व 'सूत्रपाठा'तील काही वचने यांतही शाब्दिक फरक आहेतच. हीच गोष्ट 'दृष्टांतपाठा'तील दृष्टांताचीही आहे. ४०, ४८, ८१ या मूळ दृष्टांतातच 'एकी वासना' आहेत; ७१, ७४ मध्ये परशरामवासाच्या, तर ४२, ५३, ५९. ६१, ७४, ७९, ८२, ८९ मध्ये रामेश्वरबासाच्या वासना आहेत. ५३ व ७६ या दृष्टांतांत 'मियांबा'च्या वासना आहेत. 'लीळाचरित्रा'त आलेल्या काही पूर्ण दृष्टांतांच्या संहितेत व त्यांच्याच 'दृष्टांतपाठा'-तील संहितेतही फरक आहेत. यावरून आजच्या 'दृष्टांतपाठा'त म्हाइंभटांच्या 'लीळाचरित्रा'तील पाठ सर्वत्र आलेला आहे असे म्हणता येत नाही. त्यावरून 'लीळाचरित्रा'प्रमाणेच 'सूत्रपाठ' व 'दृष्टांतपाठ' यांचेही पुनर्लेखन झालेले असलेच पाहिजे, असे स्पष्ट दिसते. या समजुतीला सोंगोबासाच्या 'अन्वयस्थळा'त व कृष्णमुनीच्या 'अन्वयमाळिके'त आधार नाही, हे खरे.' तथापि 'दामबासाचे केशोबा चाऊरगावकर' यापासून लिहिलेल्या पारमांडल्य आम्नायाच्या अन्वयस्थळात मात्र तसा उल्लेख स्पष्ट आढळतो. तो पुढील-प्रमाणे :

द्वादश प्रकरणांचे पुनर्लेखन :

'केसीराजबासी भटां वीद्यमान द्वादश प्रकरण वचनपाठान्वयो लावीला : तो खालसेयाचिये धाडिसि गेला : मग कवीश्वरी : परशरामबासी : रामेश्वरबासी द्वादश प्रकरणवचनपाठान्वयो लावीला : तो कवीश्वर आम्नायी प्रवर्तला : तें देखौनि नागनाथवासीं आनोबासातें प्रार्थिलें : जैसा कवीश्वर आम्नायीं द्वादश प्रकरणासि अन्वयो असे तैसा तुम्ही लावावा...ते आनोबासीं मानिलें : मग आनोबासी पूर्वी–पंचकृष्ण–नवां प्रकरण अन्वयो लावीला :...मग आचारस्थळ : वीचार स्थळ अन्वयो लावावेया चरीत्रातुलें वाक्यें वेगळीं निवडीली...तीयें पारिमांडल्य आम्नायीं प्रवर्तली : ...त्याचे हरीबास...तया हरीबासाचे तळेगावकर दत्तोबास तेहीं...दृष्टांतस्तोत्राचेनि अनुक्रमें श्रीमुख दृष्टांत अन्वयी लावीले : । :..." (नेने. संशोधन लेख संग्रह. भाग पहिला, पृ. १४४–१४५)

यावरून पुढील गोष्टी स्पष्ट होतात. केसोबासांनी अन्वयी लावलेली द्वादश प्रकरणे म्हणजे नऊ प्रकरणे, अधिक आचार व विचार मिळून ११ प्रकरणांचा 'सूत्रपाठ' आणि बारावे प्रकरण-म्हणजे ११४ दृष्टांतांचा 'दृष्टांतपाठ', हे दोन्ही खालशाच्या धाडीत गेले. त्यानंतर कवीश्वरबास; परशरामबास व रामेश्वरबास या तिघांनी मिळून या द्वादश प्रकरणांचा अन्वय पुन्हा लावला; म्हणजेच आपल्याला कंठगत असलेल्या वचनांच्या व दृष्टांतांच्या साहाय्याने 'सूत्रपाठ' व 'दृष्टांतपाठ-यांचे पुनर्लेखन केले. हाच 'सूत्रपाठ' व 'दृष्टांत' पाठ' कवीश्वर आम्नायात रूढ झाला हेच वचनपाठ व दृष्टांतपाठ आज उपलब्ध आहेत. पुढे आनोबासांनी नवा प्रकरणांचा व तळेगावकर दत्तोबास यांनी श्रीमुख दृष्टांतांचा अन्वय लावला. याचा अर्थ-असा की, कवीश्वर आम्नायातील आचार्यांनी व पारमांडल्य आम्नायातील आचार्यांनी या ग्रंथांचे आपापल्या घोकानुसार पुनर्लेखन केले.

संक्षेपाने दिग्दर्शन करण्याचे धोरण :

सारांश, आज उपलब्ध असलेले 'लीळाचरित्रा'चे पाठ पुनर्लिखित आहेत, तसेच 'सूत्रपाठ' व 'दृष्टांतपाठ'हे सुद्धा पुनर्लिखित आहेत. त्यांतही पूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे, 'लीळाचरित्रा'चा पुनर्लिखित पाठ खंडित झालेला आहे. हे सर्व लक्षात घेता 'सूत्रपाठा'तील सर्व वचने व 'दृष्टांतपाठा'तील सर्व दृष्टांत आजच्या 'लीळाचरित्रा'त का आढळत नाहीत, हे स्पष्ट होईल. आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. ती अशी की, 'लीळाचरित्रा'च्या आजच्या पुनर्लिखित व खंडित पाठांच्या हस्तलिखितांतही, अन्यत्र

जे उपलब्ध असेल, किंवा महंत महानुभावांच्या नित्यपाठात जे कंठगत असेल त्याचे संक्षेपाने केवळ दिग्दर्शन करायचे धोरण. त्या संक्षिप्त दिग्दर्शनावरूनच तेथील मूळ संपूर्ण संहिता वाचकांनी मनश्चक्षूसमोर उभी करून लक्षात आणायची असते. स्वामींनी 'अमुक अमुक दृष्टांत निरूपिला' असा निर्देश करणे, हे या संक्षेपाच्या धोरणाचेच उदाहरण होय. 'लीळाचरित्रा'च्या हस्तलिखितात काही मोठ्या सूत्रांचेही असेच संक्षेपाने लेखन केलेले असते, त्यावरून हे धोरण नीट लक्षात येईल. मी संपादनासाठी घेतलेल्या 'उत्तरार्धा'च्या अ प्रतीच्या हस्तलिखितातील काही उदाहरणे पाहू.

(१) "...सर्वज्ञें म्हणीतलें :" जाला : ऐसें म्हणति : यें रानीं असति : चेंदा खाति : यांचेनि काइ होववैल : यें ऐसीं उघडीं नागवीं : ।। १ ।। मग ते भीयाले..."(उत्त ९, कोलते प्रत)

येथे 'यें ऐसीं उघडीं नागवीं दिसते असति...' हे आचार प्रकरणातील १२२ वे संपूर्ण सूत्र अभिप्रेत आहे. पण ते हस्तलिखितात संक्षेपाने लिहिले आहे. लिप्यंतर करताना मी ते पूर्ण लिहिले आहे.

(२) '...' जी जी : देओ काइसेनहीं न पवीजे तरि काइ करावें ?' सर्वज्ञें म्हणीतलें "हां गा : तरि काइ रडिनलेयां ईश्वरू होईल : ।। १ ।। ऐसे गोसावीं संबोधिले : ।। (उत्त. ३९, कोलते प्रत)

येथे आचार. २०९, हे संपूर्ण वचन अपेक्षित आहे. पण ते संक्षेपाने लिहिले आहे.

(३) '...सर्वज्ञें म्हणीतलें :' साधे हो : जीव ऐसे अधोमुख असति : ।। १ ।। मग गोसावी पटिसाळेवरि खेळु करीत असति...' (उत्त. ७८. कोलते प्रत)

येथे 'जीव ऐसें अधोमुख असति : परमेश्वरु ऐसें वरिपडोनि पाहात असति : एकाधा एकु ऐसी वरौती वास पाहील तेयातें ऐसेंचि काढिजैल :" हे आचार प्रकरणातील २१३ वे संपूर्ण वचन अभिप्रेत आहे. हस्तलिखितात ते संक्षेपाने लिहिले आहे.

(४) याच लीळेत पुढे "त्रसों नेदिजे : त्रसला सातां जीउ वीखयां सरण जाइल : देसाचां सेवटां जाउनि सर्वाधमत्व ब्राह्मणत्व स्वीकरील." हे आचार १०६ वे सूत्र "त्रसों नेदिजे : त्रसला सातां जीउ ।।१।।" असे संक्षेपाने पोथीत लिहिलेले आहे.

(५) 'आउ स्तुति करणीं गणपति आपयो कोपणें' (उत्त ९५. कोलते प्रत) या लीळेत "कें अचिंत्यानंतशक्ति परमेश्वरु : आणि कें चिंतामणि : कामधेनु :" (विचार २२४) हे संपूर्ण सूत्र "अचिंत्यानंतशक्ति परमेश्वरु :" ।। १ ।। असे पोथीत केवळ संक्षेपाने लिहिले आहे.

'लीळाचरित्रा'च्या नेने पाठातील संक्षेपांचे अवशेष

मोठी लांब वचने अशी संक्षेपाने लिहिण्याची पद्धती सर्व पोथ्यांत स्वीकारलेली आढळते. नेने यांच्या प्रतीत लिप्यंतर करतानाही तिचे काही अवशेष आढळतात. उदा.

(१) पूर्वार्ध भाग २, पृ. १५ वरील 'वीषयें वसति : देवी कमळी पुजा" या लीळेत 'सर्वज्ञें म्हणीतलें : ऐथौनि देवताचक्र निरूपितां ।। १ ।। सर्वज्ञें म्हणीतलें : देसकाळीचे आचार्ये..." इत्यादी. या ठिकाणी "एथौनि देवताचक्र निरूपितां पृथ्वीएसणें कडीत आणि मेरुएसणी खडी न पुरे :" हे 'विचार' प्रकरणातील २७० वे वचन संक्षेपाने लिहिलेले आहे. हे लक्षात न आल्यामुळे नेने प्रतीवरून आपल्या आवृत्तीचे संपादन करताना 'एथौनि देवताचक्र निरुपितां देसकाळीचे आचार्ये - - -' इत्यादी, असे चुकीचे वाक्य डॉ. तुळपुळे यांनी तयार केले आहे. (तुळपुळे प्रत; पूर्वार्ध भाग १, लीळा २८)

(२) पूर्वार्ध भाग ४. पृ. १२. 'राणाइसा स्वातंत्रीय नीरूपण' या लीळेत "स्वातंत्रीय हे मूक्ति तया मोक्ष ।। छ ।।" हा भाग "स्वातंत्र्यू हा मोक्ष पारतंत्र्यू हा बंध :" (आधारमाळिका १) या वचनाचा संक्षेप होय.

(३) पूर्वार्ध भाग ४, पृ. १४. 'राणाइ भेटि : पाठवणी :' या लीळेतील 'सर्वज्ञें म्हणीतलें : पृथ्वीएसणें रवण :।।' हे वाक्य म्हणजे "पृथ्वीएसणें रवण असे : आणि परमेश्वराएसणी देवता असे : मा चिंधीचिरकुटी नेणों कैसी मिळेल की :" (आधार २७४) या वचनाचे संक्षिप्त लेखन होय.

'सूत्रपाठा'तील वचनाचा आरंभीचा भाग देऊन तेथे ते संपूर्ण वचन अभिप्रेत असल्याचे सुचविणारी ही लेखन-पद्धती हस्तलिखितात फार मोठ्या प्रमाणात अवलंबिलेली आहे. या पद्धती-प्रमाणेच 'अमुक-अमुक दृष्टांत निरुपिला' असा केवळ नामनिर्देश करून तो दृष्टांत तेथे पूर्ण स्वरूपात अभिप्रेत असल्याचे सुचविणारी ही संक्षेप-लेखन-पद्धती होय. ती लक्षात न घेता स्वामींचा तो दृष्टांत 'लीळाचरित्रा'त तेथे नाहीच, असे समजणे बरोबर नाही. तेच दृष्टांत केसोबासांच्या 'दृष्टांतपाठा'त पूर्ण असल्यामुळे त्यांचे कर्तृत्व थोडयाफार प्रमाणातसुद्धा केसोबासांकडे देणे हे 'अन्यथा-ज्ञान' होय.

समारोप

डॉ. तुळपुळे यांनी संपादन केलेल्या 'दृष्टांतपाठा'च्या प्रस्तावनेत त्यांनी प्रथम हे मत मांडले. 'महानुभाव पंथ व त्याचे वाङमय' या आपल्या ग्रंथात त्यांनी त्याचा पुनरुच्चार केला. त्या ग्रंथाला मी लिहिलेल्या प्रस्तावनेत त्यांची मते कशी चुकीची आहेत याचे मी दिग्दर्शन केले आहे. त्यानंतर आता डॉ. आवलगावकर व त्यांचे प्रस्तावनाकार डॉ. ढोळके यांनी डॉ. तुळपुळे यांचेच मत पुन्हा मांडले आहे. या दोन्ही बहुश्रुत विद्वांनांनी, डॉ. तुळपुळे यांच्या 'महानुभाव पंथ व त्याचे वाङमय' या ग्रंथाला मी लिहिलेली प्रस्तावना वाचली नसेल असे कसे म्हणावे? डॉ. आवलगावकरांनी तर आपल्या पुस्तकाच्या संदर्भ-ग्रंथ-सूचीत डॉ. तुळपुळे यांच्या उपरोक्त ग्रंथाचे नावही दिले आहे. त्यांनी माझी ती प्रस्तावना वाचली असल्यास त्यांना डॉ. तुळपुळे यांच्या मताचा परामर्ष घेणारे माझे त्यातील विवेचन बहुधा मान्य नसावे. तसे असेल तर माझ्या त्या विवेचनाचे खंडन न करता, किंवा त्यांना उत्तरे न देता या दोन्ही संशोधकांनी पुन्हा तीच मते मांडली आहेत. त्यांचा सविस्तर परामर्ष घेऊन, त्यांनी चालविलेल्या या 'अन्यथा-ज्ञाना'च्या प्रसारावर प्रकाश टाकणे आवश्यक वाटले, म्हणून या लेखाचा हा प्रपंच.

नवीन रामदासपेठ, नागपूर ४४००१०

अनुक्रमणिका

कादंबरीकार वरेरकर

मनोहर

मामा उर्फ भा. वि. वरेरकरांनी नाट्यवाङ्‌मयामध्ये जितका नावलौकिक मिळवला तितकाच नावलौकिक त्यांनी कादंबरी वाङ्‌मयामध्ये सुद्धा मिळविला आहे. परंतु वरेरकर हे नाटककार मामा वरेरकर म्हणूनच ओळखले जातात. याविषयी स्वतः वरेरकरांनीच म्हटले आहे की, "मी ओळखला जातो तो नाटककार म्हणून. माझा पेशा आहे नाटककाराचाच यात काही शंका नाही. मी जे इतर लेखन केलं ते केवळ विरंगुळा म्हणून किंबहुना इतर क्षेत्रात देखील आपल्याला काही साहित्यनिर्मिती करता येते की नाही ते पाहण्याकरिता. ती निर्मिती काही अगदीच कच्ची ठरली नाही. माझ्या कादंबऱ्या देखील गाजल्या आहेत. तरीपण कादंबरीकारांची नावं घेताना माझं नाव विसरलं जातं ते या नाटकामुळं." १

वरेरकरांनी आपल्या कादंबरीलेखनास इ. स. १९११ पासून प्रारंभ केला. 'भावशर्मा' या टोपणनावाने 'संसार की संन्यास ?' (अथवा एक बुद्धकालीन ऐतिहासिक कादंबरी) ही त्यांची कालानुक्रमाने पहिली कादंबरी आणि 'लढाईनंतर' ही इ. स. १९४७ मध्ये प्रसिद्ध झालेली शेवटची कादंबरी होय. त्यापूर्वी पूर्ववयात त्यांनी 'बी-राम' या टोपणनावाने 'अंध-प्रेम' ही ही कादंबरी मासिकातून प्रसिद्ध केली होती. त्याच्याही पूर्वी इ. स. १८९५ साली विठ्ठलराव वरेरकर (वरेरकरांचे वडील) यांनी 'कल्पवृक्ष' नावाचे मासिक काढले. त्यात वरेरकरांची इ. स. १८९७ सालापासून 'साधु अमरपुरीची गुहा' ही कादंबरी क्रमशः प्रकाशित होत होती. ही कादंबरी म्हणजे रेनॉल्डसच्या इंग्रजी कादंबरीचे स्वैर रूपांतर होते. मासिक बंद पडल्यामुळे ही कादंबरी अपूर्ण (फक्त पाच प्रकरणे प्रकाशित) राहिली. आज या दोन्ही कादंबऱ्या अज्ञात आहेत. परंतु या कादंबऱ्यांना कादंबरीचे स्वरूप प्राप्त झाले नव्हते. या संदर्भात वरेरकरांचेच मत लक्षात घेण्यासारखे आहे. 'साधु अमरपुरीची गुहा' या कादंबरीच्या संदर्भात ते लिहितात, "त्या कादंबरीत काही वैशिष्ट्य होते असे नाही. लेखनाची शैली होती, पण निर्मितीची कल्पना नव्हती." २

यावरून त्यांच्या कादंबरीलेखनास प्रारंभ प्रामुख्याने इ. स. १९११ साली 'संसार की संन्यास' या कादंबरीद्वारे झाला असे म्हणण्यास हरकत नाही. त्यांच्या एकूण कादंबऱ्यांची संख्या पाउणशेच्या घरात आहे. त्यांनी इ. स. १९११ ते १९५४ या काळात एकोणतीस स्वतंत्र कादंबऱ्या लिहिल्या. इ. स. १९३९ ते १९५२ या काळात शरच्चंद्र चटर्जी यांच्या तीस कादंबऱ्या. इ. स. १९५२ ते १९५५ या काळात बंकिमचंद्र चटर्जी यांच्या तेरा कादंबऱ्या आणि इ. स. १९५५ ते १९५६ या काळात प्रभातकुमार मुखर्जी यांच्या तीन कादंबऱ्या त्यांनी रूपांतरित केल्या. त्यांचे कादंबरीलेखन इतके विपुल आहे. कै. वि. स. खांडेकर यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास, "वरेरकर हे केवळ विपुल लेखन करणारे एक लोकप्रिय लेखकच नव्हे तर मराठी ललित वाङ्‌मयाच्या इतिहासातील एका फार मोठ्या आणि उज्ज्वल कालखंडाचे ते शेवटचे प्रतिनिधी होते." ३

वरेरकरांनी इ. स. १९०४ पासून १९६४ पर्यंत साठ वर्षे सातत्याने अमाप वाङ्‌मयनिर्मिती केली आहे. यामध्ये नाटके, कादंबऱ्या, कथा; रहस्यकथा; बंगालीमधून अनुवादित कथा-कादंबऱ्या;

चार खंडात आत्मचरित्र; नैमित्तिक साहित्यविषयक लेखन (श्रुतिका, एकांकिका, ध्वनिमुद्रणासाठी नाटिका) इत्यादींचा समावेश होतो. यातील काही लेखन त्यांनी भावशर्मा, वी–राम, सूत्रधार (या नावाने आकाशवाणीसाठी नाटिका–लेखन), गतभर्तृका या टोपणनावाने केलेले आहे. तसेच त्यांच्या साहित्याचे हिंदी, गुजराती, बंगाली, तेलगू, मल्याळम, ओडिया या भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत.

वरेरकरांच्या लेखनास प्रारंभ कोणत्या वाङ्मयप्रकाराने झाला आहे आणि ते कादंबरीवाङ्मय-प्रकाराकडे का वळले ? याचा शोध घेण्याचा येथे प्रयत्न केलेला आहे.

लेखनास प्रारंभ

वरेरकरांनी आपल्या लेखनास प्रारंभ मालवण येथे इ. स. १८९७ साली (वयाच्या १४ व्या वर्षी) 'वार्तादर्श' नावाचे साप्ताहिक पत्रक निघाले होते, त्यात लेख लिहून केलेला आहे. परंतु तसा त्यांच्या लेखनास प्रारंभ वयाच्या आठव्या वर्षीच झालेला होता. 'रासक्रीडा' या नाटकाच्या कथानकावर "आठ वर्षाचा कृष्ण घालून तू नाटक लिही पाहू" असे विनायकराव गुरव त्यांना थट्टेने म्हणाले होते. परंतु वरेरकरांना ते आव्हान वाटले. त्यांनी त्यावर आठ पानी नाटक लिहिले. नंतर १६ पानी. पण नाटक मोठे झाले नाही. "हे माझे पहिले पुस्तक. पण ते पूर्ण झाले नाही." ' अशी वरेरकरांनी खंत व्यक्त केली आहे.

पुढे काही वर्षानंतर मालवणात 'सिंधुदुर्ग प्रासादिक नाटक कंपनी' आली होती. या कंपनीतील पुरुषनट विष्णुपंत यांनी वरेरकरांना नाटक लिहिण्यास सांगून त्या नाटकाचा प्रयोग रंगभूमीवर करीन, असे आश्वासन दिले होते. म्हणून त्यांनी 'अरेबियन नाईटस' (१४ वर्षाचे असताना) यातील 'कामर्लेजाम आणि बदुरा' या कथेवर 'मरुत्सेन लीलावती' या नावाचे नाटक लिहिण्यास सुरूवात केली होती आणि ते नाटक त्यांच्याकडून लिहून पूर्ण झाले होते. परंतु दुर्दैवाने ती नाटक-कंपनीच बंद पडली. रत्नागिरीला परत जाताना विष्णुपंतांनी ते नाटक आपल्याबरोबरच नेले. त्यामुळे "अल्पवयात नाटककार होण्याचा माझा योग ढासळला" ' असे उद्गार वरेरकरांनी काढले आहेत.

परंतु पुढे (१८ वर्षाचे असताना) 'रासक्रीडा' या नाटकाच्या कथानकावरच इ. स. १९०४ साली दापोलीमध्ये 'कुंजविहारी' या त्यांच्या पहिल्या नाटकाचा जन्म झाला.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की वरेरकरांच्या लेखनास प्रारंभ प्रामुख्याने नाट्यवाङ्मय-प्रकाराने झाला आहे.

वरेरकर कादंबरीलेखनाकडे का वळले ?

इ. स. १९१९ पर्यंत 'कुंजविहारी', 'हाच मुलाचा बाप' व 'संन्याशाचा संसार' या गाजलेल्या नाटकांनी वरेरकरांना नाटककार म्हणून कीर्ती मिळवून दिली होती. म्हणून नाट्यलेखनावरच स्वतंत्रपणे निर्वाह करण्याचे त्यांनी ठरविले. नाटककार होणे हे एकच ध्येय त्यांचे होते. परंतु ते इतर वाङ्मय प्रकाराकडे वळलेले दिसतात. या संदर्भात त्यांचेच मत लक्षात घेणे इष्ट ठरेल, ते लिहितात, "नाटककार व्हावे हे एकच ध्येय माझ्या जीवनाचे होते. पण परिस्थितीला अनुसरून मला वाङ्मयाच्या निरनिराळ्या क्षेत्रात निर्मिती करणे भाग झाले." '

यावरून असा निष्कर्ष काढावासा वाटतो की, साहित्य निर्मितीवरच जगायचे ठरविल्यामुळे नुसत्या नाटकावरच अवलंबून राहणे त्यांना अपुरे वाटू लागले. तसेच मधला एक काळ असा गेला की जवळ जवळ सात वर्षे नाटक लिहिणे त्यांना तहकूब ठेवावे लागले. कारण नाटके निर्माण करण्याची जितकी स्फूर्ती वरेरकरांची होती तितकी नाटके रंगभूमीवर आणण्याची नाटककंपन्यांची तयारी नव्हती. एक यशस्वी नाटक हाती पडल्यावर सबंध महाराष्ट्राचा प्रवास करीत चार–पाच वर्षे

हिंडल्यामुळे नाटककर्त्यांना नवीन नाटकाची तितकीशी जरूरी भासत नव्हती. या त्यांच्या सुखासीन वृत्तीमुळे आणि सरकारी बंधनांच्या (त्यावेळी राजकीय विषयावरील नाट्यलेखनास बंदी होती.) योगाने रंगभूमीवर काही विषय आणणे अशक्य झाल्यामुळे त्या विषयावर वरेरकरांना कादंबऱ्या लिहाव्या लागल्या असे दिसून येते.

नाट्यलेखनाकडून कादंबरीलेखनाकडे हेतुपुरस्सर वळण्यापूर्वी वरेरकरांनी कादंबरीलेखनास सुरुवात केली होती. 'वैश्य' मासिकाच्या वर्गणीदारांना भेट देण्याकरिता 'भावशर्मा' या टोपणनावाने त्यांनी 'संसार की संन्यास' ही कादंबरी लिहिली आणि त्यानंतर त्यांनी कादंबरीलेखन सोडून दिले होते. ते का सोडून दिले, याविषयी ते लिहितात, "नाट्यलेखनाचा अभ्यास मी जसजसा करू लागलो तसतसे कादंबरीलेखन हे नाटकाला वावडे आहे, असे मला वाटू लागले. 'पाल्हाळ' कादंबरीला जसा आवश्यक आहे तसाच तो नाटकाला वर्ज्य आहे. म्हणून नाटक लिहिण्याची शैली अंगी बाणेपर्यंत कादंबरी न लिहिण्याचा मी निश्चय केला होता."[७] तसेच "नाटके आणि कादंबऱ्या या दोहोंची तुलना करताना मला कादंबरीलेखनाचा दर्जा दुय्यम प्रतीचा वाटला. आधीपासूनच नाटकाची आवड मला जन्मजात होती, म्हणून नाट्यनिर्मितीसाठी काय केले पाहिजे याचा विचार आणि अभ्यास करण्याकडे पहिल्यापासून मी माझी सारी शक्ती खर्ची घालीत असल्यामुळे कादंबरीलेखनाकडे माझे दुर्लक्ष झाले"[८]

वरील वरेरकरांच्या विधानावरून असे लक्षात येते की वरेरकरांचे प्रमुख ध्येय नाटककार होणे हेच होते. म्हणून त्यांनी कादंबरीलेखनाकडे दुर्लक्ष केले असावे. परंतु ते १४ वर्षाच्या कालावधीनंतर कादंबरीलेखनाकडे वळलेले दिसतात. पण ते हेतुपुरस्सर नाही. त्यांच्या काही मित्रांनी 'कादंबरीलेखन हे नाट्यलेखनापेक्षा कठीण आहे' असे जाणूनबुजून खिजवल्यामुळेच श्री. ना. वि. कुलकर्णी यांच्या मागणीवरून "महाराष्ट्र कुटुंब माले" करिता त्यांनी इ. स. १९२६ साली 'चिमणी' ही स्वतंत्र सामाजिक कादंबरी लिहिली.

तसेच वरेरकरांना ज्या विषयावर नाटके लिहायची होती, परंतु परिस्थितीमुळे त्यांना कादंबऱ्या लिहाव्या लागल्या. अशा कादंबऱ्यांमध्ये 'विधवाकुमारी', 'गोदू गोखले' व 'धावता धोटा' यांचा उल्लेख करता येईल.

इ. स. १९०४ साली एका बालविधवेच्या कथानकावर त्यांचा नाटक लिहिण्याचा मानस होता. परंतु "त्या वयाच्या मुलीचं आणि दर्जाचं काम करणारा नट पुढल्या काळातही न आढल्यामुळं शेवटची संधी म्हणून पुढं जवळ जवळ दोन तपांनी, मी 'विधवाकुमारी' ही कादंबरी लिहिली"[९] असे वरेरकरांनी म्हटले आहे.

तसेच "राजकारणविषयक नाटके लिहिणे जवळ जवळ अशक्य झाल्यामुळे तसले विषय कादंबरीसाठी घ्यावे अशी इच्छा असतानाही मला पुन्हा समाजातील क्रांतिकारक विषयावर लेखन करण्यासाठी 'गोदू गोखले' ही कादंबरी लिहिणे भाग पडले"[१०] अशी वरेरकरांनी स्पष्ट कबुली दिली आहे.

मजूर आणि भांडवलदार यांचे परस्परसंबंध या विषयावर 'सोन्याचा कळस' नावाचे नाटक वरेरकर लिहीत होते. परंतु सरकारी बंधनामुळे ते नाटक रंगभूमीवर येणे अशक्य आहे असे वाटल्यावर त्याच विषयावर त्यांनी 'धावता धोटा' ही कादंबरी लिहिली.

वरील विवेचनावरून मराठी रंगभूमीची सेवा बजावित असतानाच वरेरकर कादंबरीलेखनाकडे वळलेले दिसतात. नाट्यवाङ्मयाकडून कादंबरीवाङ्मयाकडे आपण का वळलो याविषयी "मी हा वाङ्मयप्रकार का लिहितो ?" या आत्मकथनपर लेखात वरेरकरांनी थोडेसे प्रांजळ निवेदन केले आहे. " 'सामुदायिक सायुज्या'चे ध्येय नाटकाद्वारे गाठणे अवघड झाले म्हणून ते कादंबरी या थोड्याफार सैल वाङ्मयप्रकाराकडे वळले. नाटक हे गर्दीसाठी असते व त्या मानाने कादंबरी ही

व्यक्तिनिष्ठ असते. तसेच नाटकात आखलेल्या तंत्राच्या लक्ष्मणरेषेपलिकडे जाता येत नाही तर नियंत्रणाच्या व बंधनाच्या अभावी कादंबरीकाराला फार मोठी झेप घेता येते. तंत्राच्या सांकेतिकतेमुळे नाटकांच्या द्वारे लोकसमाजावर होणारा परिणाम हा दीर्घकाल टिकणारा व सखोल असतो. पण वरेरकरांसमोर काही ज्वलंत सामाजिक प्रश्न असत आणि ते नाटकामधून मांडता येत नसल्यामुळे वरेरकर कादंबरी या वाङ्मयप्रकाराकडे वळले, असा निष्कर्ष काढण्यास हरकत नसावी.

वरेरकरांच्या सर्व कादंबऱ्याचे सर्वसामान्य स्वरूप पाहिले असता त्यातून प्रामुख्याने स्त्री-व्यक्तिरेखांचे चित्रण केलेले आहे आणि ते उत्कट असल्याचे दिसून येते. किंबहुना या कादंबऱ्या स्त्री-व्यक्तिरेखाप्रधान आहेत. रूपांतरासाठी कादंबऱ्या निवडण्यामागेसुद्धा हीच त्यांची दृष्टी असल्याचे दिसून येते, सभोवतालच्या समाजातील स्त्रीला मिळणाऱ्या वागणुकीकडे समाजाचे लक्ष वेधावे यासाठी वरेरकरांनी स्त्री-व्यक्तिरेखेला प्राधान्य दिले असल्याचे प्रत्ययास येते.

संदर्भ–टीपा

१. भा. वि. वरेरकर : "मी हा वाङ्मयप्रकार का लिहितो ?" सुषमा–मार्च १९६१, नागपूर, पृष्ठ क्र. १७.
२. भा. वि, वरेरकर : "मी कादंबऱ्या का लिहिल्या ?". मनोहर–एप्रिल १९४०, पुणे, पृष्ठ क्र. ९.
३. वि. स. खांडेकर : "साहित्यातील वटवृक्ष"; लोकराज्य–२६–१९८३, मुंबई, पृष्ठ क्र. ३.
४. भा. वि. वरेरकर : "माझे पहिले पुस्तक", ललित–फेब्रुवारी १९६४, मुंबई. पृष्ठ क्र. १०.
५. भा. वि. वरेरकर : माझे पहिले पुस्तक", ललित–फेब्रुवारी १९६४, मुंबई, पृष्ठ क्र. ११.
६. भा. वि. वरेरकर : "मी कादंबऱ्या का लिहिल्या ?", मनोहर–एप्रिल १९४०, पुणे, पृष्ठ क्र. ८.
७. भा. वि. वरेरकर : "माझे कादंबरीलेखन", विहंगम–मार्च/एप्रिल १९३६, नागपूर, पृष्ठ क्र. ५११.
८. भा. वि. वरेरकर : "मी कादंबऱ्या का लिहिल्या ?" मनोहर एप्रिल १९४०, पुणे, पृ. क्र ८
९. भा. वि. वरेरकर : "माझा नाटकी संसार", भाग १ (आ. १ ली), १९४१, मुंबई, पृष्ठ क्र. ८६.
१०. भा. वि. वरेरकर : "मी कादंबऱ्या का लिहिल्या ?", मनोहर–एप्रिल १९४०, पुणे, पृष्ठ क्र. ९
११. भा. वि. वरेरकर : "मी हा वाङ्मयप्रकार का लिहितो ?" सुषमा–मार्च १९६१, नागपूर. पृष्ठ क्र. १७.

■

७८ / जे. एस. हॉल, 'बी' रोड, चर्चगेट, मुंबई–४०००२०

लघुकथा : एका वाङ्मय प्रकाराच्या विकासाचा शोध

प्रल्हाद वडेर

लघुकथा या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप, वेगळेपणा व तिचा गेल्या पाऊणशे वर्षात झालेला विकास याचा शोध घेण्यासारखा आहे.

कथा सांगण्याची व ऐकण्याची आवड माणूस बोलू लागला तेव्हापासूनची आहे. त्यामुळे कथा हा वाङ्मय प्रकार भाषेला लिखित स्वरूप मिळण्याच्या पूर्वीपासून चालत आला आहे. देव, दानव, राक्षस यांच्या कथा, शिकार कथा, आठवणी, आख्यायिका, ऐकीव गोष्टी वा अफवा या सर्व जुन्या कथाच होत. इ. स. पूर्वी ३२०० मध्ये इजिप्तमध्ये लिहिलेली The Two Brothers ही जगातील पहिली लिखित कथा समजली जाते. बुद्धाच्या जातककथा, पंचतंत्र, इसापच्या नीतिकथा, बायबलमधील डॅनियल व जोनाह् व रूथ यांच्या रूपककथा, ग्रीक लेखक अॅपोलीनियसच्या 'The Golden Ass' मधील क्युपिड आणि सायकी, अरबी भाषेतील गोष्टी, डेकॅमेरॉन या सर्व कहाण्या वा गोष्टी लघुकथाच होत्या. त्याशिवाय लोककथा, प्राणीकथा, परिकथा, बोधकथा, रुपककथा, अद्‌भुतकथा शेकडो, हजारो वर्षांपासून सांगण्यात आल्या आहेत, त्यांचाही आत्मा लघुकथेचाच आहे.

पण आज ज्या अर्थाने 'लघुकथा' म्हटले जाते ती मात्र १९ व्या शतकाची निर्मिती आहे, व तिचा नियतकालिकांच्या उदयाशी निकटचा संबंध आहे. त्या आधी कादंबरी आणि लघुकथा यांत विशेष फरक केला जात नसे. त्यामुळे अनेक श्रेष्ठ कादंबरीकारांनी काही लघुकथा लिहिल्या असल्या तरी, तिच्या रचनेकडे त्यांनी फारसे लक्ष पुरविले नाहीत, वा ते त्यांना पुरवावेसेही वाटले नाही. कारण त्यांच्या काळात कादंबरी हाच सर्वात लोकप्रिय वाङ्मयप्रकार होता. त्यांनी ज्या लघुकथा लिहिल्या त्यांचा ऐवजही कादंबरीचाच वाटतो. डोस्टॉव्हस्की, टॉलस्टॉय, डीकन्स, हार्डी व आपल्याकडील हरी नारायण आपटे यांच्या कथांचे स्वरूप ठेचून भरलेल्या कादंबरीचेच वाटते. नुकत्याच निधन पावलेल्या जी. ए. कुलकर्णी यांच्या प्रतिभेचे स्वरूपही कादंबरीकाराला जवळचे होते.

लघुकथेची व्याख्या करण्याचे आतापर्यंतचे बहुतेक सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले आहेत. याचे मुख्य कारण लघुकथा या वाङ्मय प्रकाराचा विकास इतक्या विविध दिशांनी झाला आहे की, कोणत्याही एका व्याख्येच्या चौकटीत ती बंदिस्त होणे कठीण आहे. साधी तिच्या लांबीरुंदीची अपेक्षाही पूर्ण झालेली नाही. डॉ. अॅन रीडने लघुकथा म्हणजे कादंबरीपेक्षा लहान असलेले काल्पनिक गद्य असे तिचे स्वरूप सांगितलेले आहे. लघुकथेचे एक शिल्पकार एड्गर अॅलन पो याने लघुकथेची व्याख्या करताना करताना ती एका बैठकीत वाचून होण्याइतकी लांब असावी असे म्हटले आहे. पण याला उत्तर देताना सारोयजने मिस्किलपणे म्हटले आहे की, काही लोकांना अधिक वेळ बैठक घालून बसणे शक्य असते. त्याचे काय ? त्यामुळे हीही व्याख्या बाद ठरते. हेन्री जेम्सने सहा ते आठ हजार शब्दांत लघुकथा बसविणाऱ्या मासिकाच्या संपादकाच्या प्रथेचा उल्लेख केला आहे. टॉलस्टॉयची एखादी लघुकथा २०० पानापर्यंतही जाते. एकूण मॉमने म्हटल्याप्रमाणे कमीत कमी ५०० ते १६०० शब्द ते ३२००० शब्द इतक्या लांबीपर्यंतही ती लिहिली जाऊ शकेल. याच संदर्भात लघुकादंबरी;

कादंबरिका व दीर्घकथा अशाही संज्ञांचा वापर होतो. अर्ध्या तासात वाचून होईल ती लघुकथा, किंवा जी फार लांब नाही ती लघुकथा, असे एच्. जी. वेल्स म्हणतो तेच अखेर मान्य करावे लागते.

१९ व्या शतकामध्ये लघुकथा हे कादंबरीचे लघुरूप नसून तो स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहे, याची जाणीव लेखकांना झाली. त्यात पो, ओ. हेन्री या अमेरिकन लेखकांचा व झोला, मोपासां या फ्रेंच व चेखोव या रशियन कथाकारांचा महत्त्वाचा वाटा आहे. कादंबरी हा जीवनावर टाकलेला फ्लड लाईट मानला तर लघुकथा हा फ्लॅश आहे असे म्हणता येईल. लघुकथा ही जुळवाजुळव नसून ती स्वतंत्र निर्मिती आहे. कथानक, व्यक्तिरेखा दृष्टिकोण (Point of view), प्रसंग व भाषा अशी तिची अंगे कादंबरीला समांतर असली तरी दोन्हीत मूलतः फरक आहे. एडगर ॲलन पोने तिच्या एकच एक परिणामावर भर दिला आहे. क्लेटन हॅमिल्टनच्या आधारे प्रा. ना. सी. फडके यांनी तिची व्याख्या करताना, " शक्यतितक्या परिणामकारक रीतीने आणि शक्य तेवढ्या कमी पात्र–प्रसंगाच्या साहाय्याने सांगितलेली एकच एक गोष्ट म्हणजे लघुकथा " असे म्हटले आहे. वाचकांच्या मनावर विपुल संस्कार करणे हा तिचा हेतूच नव्हे, लघुकथेत रचनेची ढिलाई, नीतिमत्तेवरील प्रवचने, प्रचार, भाषेचा रचनेतील पाल्हाळ व बोजडपणा यांना वाव नाही. या दृष्टीने लघुकथा ही भाव कवितेला जवळची आहे. एड्गर ॲलन पोने एकात्म परिणाम (unity of impression) वर भर दिला. लघुकथेत एक वाक्य देखील वायफळ असता कामा नये, जो मुख्य संस्कार वाचकांच्या मनावर व्हायला हवा असेल त्याचा परिपोष करण्याचे काम लघुकथेच्या प्रत्येक भागावरून झाले पाहिजे. हे जर खरे असेल तर लघुकथेचा प्रारंभही त्याच धोरणाने झाला पाहिजे. गोष्टीचा उद्दिष्ट संस्कार पूर्णपणे झाला असे वाटताच त्या क्षणी लेखकाने गोष्ट संपविली पाहिजे. मग एक अक्षरही त्याने लिहिता कामा नये असे पोने लिहिले आहे.

क्लेटन हॅमिल्टनने पोच्या लघुकथेसंबंधीच्या विवेचनाच्या संदर्भात तिची व्याख्या अशी केली आहे की, " The aim of a short story is to produce a single nor-narrative effect with the greatest economy of means that is consistent with the utmost emohasis." ही व्याख्या प्रथम " The Bookman " मध्ये फेब्रुवारी १९०४ मध्ये व " The Reader " मध्ये फेब्रुवारी १९०६ मध्ये आली, आणि नंतर ती लघुकथेवरील प्रत्येक पुस्तकात दिली गेली आहे.

क्लेटन हॅमिल्टन व ब्लिस पेरी यांनी व्यक्तिदर्शनात्मक व प्रसंगात्मक अशा लघुकथेच्या दोन दोन जाती बरोबरच पार्श्वभूमी (setting) ला महत्त्व देणारी अशी एक तिसरी जात सांगितली आहे. लघुकथेमध्ये लेखकाला व्यक्तिदर्शन, प्रसंगदर्शन किंवा पार्श्वभूमी यापैकी एकाला इतर दोहोंहून अधिक महत्त्व द्यावयाचे असल्याने व्यक्तिदर्शनात्मक लघुकथेसंबंधी असे म्हटले आहे की, " The characters must be unique, organic enough to catch the eye at once. If his theme is character development, then that developent must be hastnened by striking experiences." लघुकथेत कोणता तरी एकेरी संस्कार करावयाचा असतो या दृष्टीने व्यक्ती, प्रसंग किंवा पार्श्वभूमी यापैकी कोणत्यातरी एका अंगावर लक्ष ठेवणे चांगले असा विचार पोच्या अनुरोधाने इतरांनीही मांडलेला दिसतो. ना. सी. फडक्यांनी मात्र पार्श्वभूमीला महत्त्व देणारी कथा असू शकते याचा उल्लेख केलेला नाही.

लघुकथा ही बहुधा वास्तववादी असू शकत नाही, ती रोमँटिकच असते या विचारालाही तत्कालीन लघुकथेवरील लेखनात काहीसे प्राधान्य मिळाले आहे. दॉदे, मोपांसा यांनी वास्तवपूर्ण कादंबऱ्या लिहिल्या, पण त्यांच्या व पो, हॉर्थार्न, स्टीव्हन्सन व किपलिंग यांच्या कथांचे स्वरूप रोमँटिकच राहिले." " In Ihe bricef space aliated to him (i. e. short writer) it is practically impossible for the writer of short Stories to induce a general truth from partıculur imagined forces imitated from actuality " असे या संदर्भात

क्लेटन हॅमिल्टनने म्हटले आहे. (अर्थात नंतरच्या लघुकथेच्या विकासाने कथा ही कादंबरीप्रमाणे वास्तववादी असू शकते हे सिद्ध झाले आहे.) पण पो व ओ. हेन्री, मोपांसा यांच्या तंत्रशुद्ध कथाहून हॉथॉर्न, वॉशिग्टन आर्यव्हिंग, हेन्री जेम्स स्टिव्हनसन यांच्या वेगळचा व काहीशा ऐसपैस व प्रदीर्घ गोष्टीही लिहिल्या जात होत्या, हेही लक्षात घेणे जरूर आहे.

पो च्या लघुकथेच्या सिद्धांताप्रमाणे लघुकथा व कादंबरी यातील भेद कळतो. लघुकथेचा कॅनव्हास लहान असल्यामुळे ती माणसातल्या आयुष्यातील फक्त एकाच प्रसंगावर लक्ष केंद्रित करते. कादंबरीसारखा सबंध आयुष्याचा संपूर्ण व सांगोपांग उहापोह ती करीत नाही. लघुकथा एखादा लहानसा प्रसंग घेऊन त्या द्वारे एखाद्या पात्राच्या आयुष्यक्रमावर निरनिराळ्या बाजूने प्रकाश टाकते. लघुकथा व कादंबरी यांचा संबंध खंडकाव्य व भावकविता यासारखा आहे. लघुकथेत थोडे पण नाट्यवस्तुप्रधान प्रसंग, जलद हालचाली, ठसठशीत पात्रे व त्यांचे सुसंगत स्वभाव, दिग्दर्शन, एकाग्रता व उत्कटता यांची जरूर असते.

१९ व्या शतकात जी लघुकथा लोकप्रिय झाली व मराठीत फडके यांनी तिचा आग्रहाने पुरस्कार केला ती इंग्रजीतील "मॅगेझिन स्टोरी" होती. ती तंत्र प्रधान होती, तिचे श्रेय पो, ओ. हेन्री व मोपांसा यांचेच आहे. वॉल्टर पिटकिन यानी तिची पूर्व पीठिका सांगताना म्हटले आहे की, " The short story ideal is a fusion of two artistic ideas : The onc American, the other French. Poe best expressed the former and maupassant the the latter. The American ideal is the single effeet The French ideal is the dramrtic effect. The short story is therefore A Narrative drama with A single effect."

इंग्रजीत ही कथा " " Sleck Magazine story " असे जिला म्हटले जाते, तशा प्रकारच्या नियतकालिकांच्या आधारे वाढली. गुर्जर, फडके हे मराठीतील तिचे प्रमुख शिल्पकार. 'मनोरंजन', 'यशवंत' व 'किर्लोस्कर' इ. मासिकांतून तिचा विकास झाला. तिच्यातील एकच एक परिणाम महत्त्वाचा ठरल्यामुळे ब्रुतियर सारख्या टीकाकारांनी " The theme of the short story must be socially insignificant " असे म्हटले. आपल्याकडील गुर्जरांच्या कथेत हे विशेषकरून दिसते. दोन घटका मनोरंजन हेच तिचे उद्दिष्ट राहिले अगदी आजही व. पु काळे तेच करताना दिसतात.

एसेनविनने लघुकथेचे सात विशेष सांगितले आहेत : (1) A single predominant character. (2) A single predominant incident, (3) imaginaion (4) Compressiou (5) Plot (6) Organization (7) Unity of impression. हॅमिल्टनने नंतर Complication, major knot and explication याचा उपयोग केला. पिटकिन यांनी Complication, the crisis and the denouement असे म्हटले. ना. सी. फडके यांनी गुंतागुंत, सुरगाठ, निरगाठ व उकल अशी भाषांतरे करून तिचे टप्पे दाखविले.

पो, एसेनविन, वॉल्टर पिटकिन, ब्लीस पेरी, हॅमिल्टन, मेबी, इ. तत्कालीन टीकाकारांनी या सफाईदार गुळगुळीत कथेचे स्वरूप स्पष्ट केले. तिची चौकट तंत्रदृष्टचा अतिशय बंदिस्त होती. मराठीतही फडके यांनी तिचे तंत्र निश्चित केले. इतकेच नव्हे तर त्याबरहुकुम लेखनही करून दाखविले !

पण ही लोकप्रिय किंवा "मॅगेझिन स्टोरी" एकांगी होती. तिचा उद्देश जीवनदर्शन नव्हता, तर चार घटका मनोरंजन करून जीवनातील खऱ्या दुःखाचा विसर पाडणे हाच होता. चेंज पर्किन्स या तत्कालीन टीकाकाराने या लघुकथेबद्दल म्हटले आहे की, " these popular stories have no distinctive charcters, they emphasise only one time of life : youth; they

deal largely with one emotion; love. So similar are they in plot that few minutes after one has read a number of them, he can hardly keep them apart. "

या तंत्रप्रधान कथेचा जनक एड्गर अॅलन पो हाच होता. त्याने दीर्घ कविता (वा कादंबरी) हा एक वदतोव्याघात मानला. वाङ्मयप्रकार शुद्ध राहावा, त्यात अन्य प्रकारातील मिश्रणे होऊ नये व झाली तर ती कलाहीन असतात हा नवअभिजातवादाचा वारसा होय, असे रेने वेलेकनी म्हटले आहे. " Poe's concept of unity is not an organic one. An organic concept allows a reconciliation of contradiction, a multiplicity in unity, while Poe's is merely a unity of effect achieved by calculation " हे वेलेकचे मत मार्मिक आहे. मराठीत य. गो. जोशी यानी असल्या कथेची "ग्यानबा तुकाराम व टेक्निक" या कथेत टर उडविली. (पण त्यांच्या कथेचेही पुढे एक तंत्र झाले.)

जुन्या कथेच्या असमाधानातून २० व्या शतकाच्या प्रारंभी आधुनिक लघुकथा इंग्रजीत जन्माला आली. फ्रॉईडच्या मनोविश्लेषणशास्त्राशीही तिचा निकटचा संबंध आहे. रशियन कथाकार अंतोन चेखोवच्या कथा १९१६ च्या सुमाराम इंग्रजीत आल्या व त्या कथांनी इंग्रजी, अमेरिकन व युरोपियन लघुकथेचा चेहरामोहराच बदलून टाकला. केवळ मनोरंजन हे तिचे ध्येय नव्हते. काव्य व कादंबरी-प्रमाणेच ती अंतर्मुख झाली. नव्या लघुकथेतील कथानक, घटना, पार्श्वभूमी संवाद इत्यादी साऱ्याच घटनांना जुन्या कथेप्रमाणे स्वतंत्र अस्तित्व उरले नाही. तिच्या रचनातंत्रातील यांत्रिकता जाऊन तिच्यात एक सेंद्रिय एकात्मकता असलेला रूपबंध (Form) आला. आतापर्यंत जी ऐसपैस गोष्ट होती ती हळू हळू लघुकथा झाली. जी केवळ ऐकण्यासाठी होती ती वाचण्यासाठी झाली. तिने कथानकाच्या चौकटीतून आपली सुटका करून घेतली. तिचा केवळ कायापालटच नव्हे तर मनःपालटही झाला. तिच्यातील मनोविश्लेषण हा तिचा एक अविभाज्य भाग झाला. तिचा विविध दिशांनी विकास झाला. एखादी भावस्थिती, प्रसंग, व्यक्तिदर्शन किंवा एखादा गुंतागुंतीचा भावानुभव असे कोणत्याही अनुभवाला ती सामोरी जाताना दिसते. त्यामुळेच ती एखाद्या भावकवितेच्या जवळ जाताना दिसते. गंगाधर गाडगीळांची 'बिन चेहऱ्याची संध्याकाळ' व अरविंद गोखल्यांची 'कातर वेळ' इथे आठवते. विजया राजाध्यक्षांच्या काही कथाही अशाच काव्यमय आहेत.

स्थूल गोचर वास्तवाचे वा घडामोडींचे दर्शन घडविण्यापेक्षा मनात दडलेल्या अतिवास्तवाचे, स्वप्नसृष्टीचे दर्शन, घडामोडींचे दर्शन घडविताना तिच्यात कथानकाची फारशी मातबरी राहत नाही. वातावरणनिर्मितीला तिच्यात विशेष महत्त्व असते. आजची लघुकथा कोणतीही बंधने मनावर न ठेवता सर्व जीवनानुभवाकडे धीटपणाने पाहते, व मोठ्या धैर्याने जीवनदर्शन घडविण्याचा प्रयत्न करताना दिसते. जुन्या कहाण्या, लोककथा, गोष्टी, अद्भुतकथा, प्राणीकथा, रूपककथा अशा अनेक जुन्या कथारूपांचाही ती आज उपयोग करून घेताना दिसते. जी. ए. च्या रूपककथा हा जुन्यानव्या कथेला जोडणारा दुवाच आहे.

लघुकथा व कादंबरी यातील फरक प्रा. गंगाधर गाडगीळ यानी असा सांगितला आहे की, कादंबरी ही बहुकेंद्री, तर कथाही एककेंद्री असते. एखाद्या व्यक्तीचे विविध अनुभव जसे एकमेकांशी जोडलेले असतात तसे लघुकथेच्या घटकांचे एकमेकांशी नाते असते. उलट कादंबरीतल्या घटनांचे नाते काहीसे सैल असते. ते परस्पराशी जोडलेले असते, पण जखडलेले नसते. त्यापैकी प्रत्येकाचा त्याच्या परिघात स्वतंत्रपणे विकास होऊ शकतो. तसे लघुकथेचे नसते. तिची घडण एकसंघ असते. म्हणूनच एखाद्या भावकवितेइतकाच उत्कटता असलेला कथा हाही वाङ्मयप्रकार आहे. अंतोन चेखोव, एच्. इ. बेटस्, कॅथरिन मॅनस्फिल्ड, अर्नेस्ट हेमिंग्वे, विल्यम सॅरोयन व आपल्याकडील गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले व जी. ए. कुलकर्णी इत्यादींनी तिच्यातील विलक्षण प्रयोगशीलता व तिचे जीवनदर्शनाचे अपार सामर्थ्य सिद्ध केले आहे. एच्. इ. बेटस्. आपल्या " Modern shortt story " मध्ये म्हणतात

त्याप्रमाणे The short story can be anything the author decides it shall be from the death of a horse to a young girl's love affair, from the static sketch without plot to the swiftly moving machine of bold action and climax, from the prose poem, painted rather than written, to the piece of straight reportage in which style, colour and elaboration have no place, from the piece which catches like a cob-web the light, subtle iridesence of emotions that can never be really contured or measured to the solid tale in which all emotion, all action, all reaction, is measured."

अशी ही आधुनिक लघुकथा कविता आणि कादंबरी या दोन प्रमुख वाङ्मयप्रकाराशी स्पर्धा करताना आज दिसते ती तिच्यातील विलक्षण सामर्थ्यामुळेच यात शंका नाही.

[मडगाव येथे श्रीमती पार्वतीबाई चौगुले कॉलेजात दि. २३-१-८८ रोजी 'लघुकथे'वरील चर्चासत्रात वाचलेला शोधनिबंध.]

एस-१, मेघना टीचर्स कॉलनी
टोक, पोस्ट करझाळे, गोवा ४०३००२

लेखकांसाठी सूचना

१. मजकूर कागदाच्या एका बाजूने लिहिलेला व सुवाच्य असावा.

२. पुरेसे पोस्टेज नसलेले लेखन परत केले जाणार नाही. स्थळप्रत ठेवावी, नाहीतर पुरेसे पोस्टेज पाठवावे.

३. कवितेची पोच दिली जात नाही. निर्णयही दिला जाणार नाही. तीन अंकापर्यंत कविता न आल्यास ती अस्वीकृत आहे असे समजावे. कवितेसंबंधी कुठलाही पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही.

४. अनाहूत लेख, कथा, ललित वा वैचारिक निबंध ह्याबाबत निर्णय हवा असल्यास पत्ता लिहिलेले एक पोस्ट कार्ड पाठवावे. गद्याबाबत निर्णय कळवल्यानंतरही, तात्काळ प्रसिद्ध होईलच असे नाही. यथावकाश प्रसिद्ध होईल.

५. अनाहूत समीक्षणे प्रसिद्ध होणार नाहीत. 'युगवाणी'-कडून मागवली गेलेली समीक्षणेच प्रसिद्ध होतात.

६. 'युगवाणी' साहित्यप्रेमाला, साहित्याला मोकळी वाट देते. पण ते साहित्य अभिरुचीसंपन्न असावे.

कोसला : काही प्रतिक्रिया

स. त्र्यं. कुल्ली

कोसलात एक युगजाणीव व्यक्त झाली आहे. कोसला ही एका अशा भारतीय तरुणाची कहाणी आहे, जो भारतीय समाजजीवनाच्या एका वळणावर उभा आहे. स्वातंत्र्याच्या आसपास तो जन्मला आहे, सुमारे ४० ते ४७ या काळात. ६० ते ६६ या काळात तो सध्या वावरतो आहे; म्हणजे तो २० २६ वर्षांचा आहे. स्वातंत्र्याची चळवळ, त्यानंतरची काही काळ असलेली स्वप्नपूर्तीची, आनंदाची लाटही त्याला ठाऊक नाही. स्वातंत्र्याच्या चळवळीतील ध्येयवाद आता ओसरत चालला आहे; नव्या पिढीला भारून टाकले असे ध्येय, कार्यक्रम, व्यक्तित्व नाही. अशा वेळी ६२ साली चीनचे आक्रमण होते; ६४ साली नेहरूंचा मृत्यू होतो; आर्थिक नियोजनातील असफलतेमुळे बेकारी, महागाई, विषमता वाढते. समाजजीवनात अनेक विसंगती व विकृती दिसतात.

सरंजामी व्यवस्थेचा भौतिक आधार नष्ट झाला तरी तिची सांस्कृतिक-वैचारिक आधार, मूल्ये शाबूत आहेत. माणसे मनाने पुरेशी आधुनिक न झालेली. भांडवलशाहीतील बुद्धिप्रामाण्य, लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, इत्यादी आधुनिक मूल्ये न स्वीकारलेली. शरीराने आधुनिक भांडवली युगात व मनाने जुन्या सरंजामी युगात अशा चमत्कारिक अवस्थेत वावरणारी; आत्मवंचना करून घेणारी.

प्रचलित समाजव्यवस्थेतील अशा अंतर्विरोधांनी संवेदनाशील मध्यमवर्गीय तरुणांची घालमेल होते. प्रस्थापिताला नकार देण्यासाठी पाश्चात्य राष्ट्रात हिप्पीचे बंड उभे राहते. प्रस्थापित व्यवस्थेला जे योग्य वाटते, टिकवून धरावेसे वाटते, ते ते नाकारण्याचा प्रयत्न हिप्पी करतात. पण त्यांचे बंड प्रस्थापितांची केवळ नकारात्मक प्रतिक्रिया असते. नव्या जाणिवांच्या आधारे प्रस्थापिताची समीक्षा करून ते नव्या जीवनव्यूहाचा, नव्या जीवनमूल्यांचा पर्याय कृतीशीलतेने उभा करीत नाहीत. कोणत्या बाबतीत बंड करावे, व्यवस्थेची मुळे कोणती आहेत व त्यावर घाव कसा घालावा हे त्यांना कळत नाही. त्यांचे भावनात्मक बंड वरवरचे केवळ पाने तोडणारे, विफल ठरते. शेवटी तर विकृतीत रूपांतरित होते.

जवळपास अशीच स्थिती ६०-६५ च्या सुमारास मध्यमवर्गीय भारतीय तरुणाची आहे. त्याचीही अवस्था या काळात दुभंगलेली व त्रिशंकूसारखी झाली आहे. जुनी मूल्ये कालबाह्य झालेली आहेत व नव्यांची स्थापना व्हायची आहे. मध्यमवर्गाचे समाजातील विशेषाधिकारप्राप्त असे वरचे स्थान ढासळले आहे आणि तरी जनसामान्यांशी तो आपले नाते जोडायला तयार नाही. प्रस्थापिताला नकार द्यायचा आहे पण त्यासाठी आर्थिक-सामाजिक व्यवस्थेत बदल करायला तो तयार नाही. किंबहुना विद्रोहासाठी ही चौकट बदलावी लागते याची त्याला जाणिवच नाही. अशा अवस्थेत हा मध्यमवर्गीय युवक केवळ सांस्कृतिक पातळीवर बंड करून प्रस्थापिताला नकार देण्याचा प्रयत्न करतो. अर्थात त्याचे हे बंड वांझोटे ठरणार हे ठरलेलेच असते.

मराठीतील लिट्ल मॅगझीन्सची चळवळ आणि त्यातून अशोक शहाणे, अरुण कोलटकर, भाऊ पाध्ये, भालचंद्र नेमाडे, चंद्रकांत खोत, वसंत आबाजी डहाके, वसंत गुर्जर, दिलीप चित्रे, मनोहर ओक आदींनी केलेले लेखन हे वरील सांस्कृतिक बंडात मोडते. या वाङ्मयीन विद्रोहातून समाजव्यवस्था बदललेली नसली तरी मराठी साहित्याच्या दृष्टीने हे सांस्कृतिक बंड अतिशय लाभदायक ठरले. जणू काळाची आवश्यकता त्याने पूर्ण केली. कारण हा संक्रमणाचा कालखंड होता. मर्ढेकरकालीन नवलेखकांच्या पिढीचा जोम संपत आलेला होता. आणि ग्रामीण, दलित, मार्क्सवादी

आदी वाङ्मयीन प्रवाहांना भरती यायची होती. अशा संक्रमणावस्थेत त्यांनी लेखन केले. आपल्या काळात झालेली भारतीय युवकांची कोंडी (त्यांच्या भाषेतसांगायचे म्हणजे 'गोची') त्यांनी यथार्थपणे व्यक्त केली. एक युगजाणीव व्यक्त केली. या वाङ्मयीन–सांस्कृतिक मंथनातून 'कोसला', 'धोपेश्वरकर', 'योगभ्रष्ट', 'कविता' असे कसदार साहित्य नवनीत निर्माण झाले.

२. कोसला कादंबरीत Crisis of values मूल्यव्यवस्थेतील अरिष्ट–हा विषय प्रामुख्याने आहे. भारतात भांडवली अर्थव्यवस्था आली पण मानसिकता सरंजामी व्यवस्थेतील व जीवन-मूल्ये परंपरागत आहेत. अशा अवस्थेत जगणारी माणसे मानसिक पातळीवर दुभंगलेली, गोंधळलेली असतात.

पांडुरंग सांगवीकराजवळ फ्युडल मूल्ये झुगारून देण्याइतका कणखरपणा, झुंझार मन नाही, की भांडवली व्यवस्थेशी जुळवून घेण्याइतकी संवेदनावधिरता नाही किंवा या दोन्ही व्यवस्थांच्या मूल्यांपलीकडे जाऊन अधिक व्यापक, श्रेष्ठ मूल्यांचा वेध घेणारी जीवनदृष्टी नाही. बरे तो संवेदनाशील व निरागस असल्याने या प्रश्नांकडे पाठही फिरवू शकत नाही व हे वर्तुळ छेदूही शकत नाही. त्याची शोकांतिका यात आहे.

पांडुरंग फक्त अनुभवासाठी अनुभव घेतो आहे. या अनुभवातून तो एखादी अर्थपूर्ण मूर्ती घडवीत नाही की कोणता जीवनव्यूह रचत नाही. तो आत्ममग्न, आत्मकेंद्रित आहे. फक्त आलेला क्षण; आलेला अनुभव भोगायचा. त्यांचा सुसंगत अन्वय लावण्याचा प्रयत्न करायचा नाही ही त्याची वृत्ती. त्याच्या अनुभव–विचारांना वस्तुनिष्ठ व व्यापक तात्त्विक पाया नाही. त्याच्या आत्यंतिक व्यक्तिवादाची परिणती शेवटी अराजकतेमधे होत असते. सांगवीकर शेवटी निष्क्रीयतेच्या व नैराश्याच्या कोषात स्वतःला बंद करून घेतो. परात्मताबाधित पांडुरंग परिस्थितीशी तडजोड करून संवेदना-बधीर होऊन जगतो. जणू त्याचे भूत होते; आणि जिवंतपणी विचारपूर्वक भूत बनलेल्या माणसाची शोकांतिका केवढी भयंकर असेल !

३. कोसला कादंबरीत आदिमता व अत्याधुनिकता, वैयक्तिकता व सामाजिकता तरल संवेदनशीलता व बौद्धिकता, गांभीर्य व मिस्कीलपणा, सुबोधता व गूढता, गद्यप्रायता व काव्यमयता, अनौपचारिकता व प्रयोगशीलता, पारंपारिकता आणि विद्रोह, नागर व ग्रामीण जीवनशैली, अस्तित्ववाद आणि सामाजिक जाणीव या परस्परविरोधी घटकांचे मोठे विलक्षण एकजीव आणि प्रभावी मिश्रण झाले. कोसलाची खरी ताकद वरील विरोधी घटकांच्या, विरोधी पेडांच्या अत्यंत आकर्षक, लयदार व कलात्मक गुंफणीत आहे. या दृष्टीने श्रेष्ठ कलात्मक अभिव्यक्तीचे कोसला हे उदाहरण ठरावे.

४. अस्तित्ववाद आणि सामाजिक जाणीव हे दोन धागे, दोन प्रवाह नेमाडेंच्या लेखनात 'कोसला'पासून थेट 'झूल'पर्यंत दिसतात. झूलमधे यासाठी दोन प्रतीके वापरली आहेत. चक्रधर हा अस्तित्ववादाचे तसेच आदिमतेचे प्रतीक तर त्याचा प्राध्यापक मित्र सामाजिक जाणिवेचे व आधुनिकतेचे प्रतीक.

सामाजिक रूढी, परंपरा, संकेत एव्हढेच काय ज्ञानही नाकारून मानवी विकासाच्या एका प्रगत टप्प्यावर प्राप्त झालेली संस्कृती व विवेकशीलताही नाकारून केवळ मूलभूत मानवी प्रेरणांच्या, आदिम भावना–प्रवृत्तींच्या साह्याने जगण्याचा प्रयत्न करणे व हाताशी काही लागते का ते पाहण्याचा म्हणजे जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करणे हा अस्तित्ववादाचा एक पेड, एक धागा कोसलात आहे. तर संस्कृतीने दिलेल्या विवेकशीलता, उच्च मानवी मूल्ये यांच्या साह्याने जगण्याचा प्रयत्न करणे हा सामाजिक जाणिवेचा दुसरा पेड, दुसरा धागा कोसलात आहे.

नेमाडेंप्रमाणे हे दोन धागे वापरून ज्यांनी सुंदर रीतीने गुंफले ते कलावंत हमखास यशस्वी ठरले आहेत.

५. कोसला वाचल्यानंतर हाती काय लागते ? निरागसता, प्रेम आणि उत्कटता ही मूल्ये.

यातील निरागसता व उत्कटता ही सनातन, कालातीत व परंपरेतीलच पण श्रेष्ठ मूल्ये आहेत. तर समष्टीविषयी प्रेम हे आधुनिक मूल्य आहे. त्याचा संबंध सामाजिक जाणिवेशी आहे. कारण सामाजिक जाणिवेतील बंधुता हे मूल्य नसेल तर समाजाविषयी, पृथ्वीवरील मानवाविषयी प्रेम वाटणार नाही आणि समता हे मूल्य नसेल तर मानवामानवातही आपण भेद करू. अर्थात माणुसकी हे प्राचीन मूल्य आहेच. पण आधुनिक तत्त्वांचा संदर्भ ध्यानात घेऊन 'मानुषते'चे नवे वळण ध्यानात घ्यावे लागेल.

यातील निरागसता व उत्कटता ही मूल्ये अस्तित्ववादी जाणिवेने आणि मानवाविषयी आस्था हे मूल्य सामाजिक जाणिवेने नेमाडयांना गवसले असावे. परंतु नेमाडयांचे वैशिष्टय यात आहे की, अनेक मोठया कलावंतांना ह्या मूल्यांचा शोध घेताना बौद्धिक धडपड करावी लागली, निकराचा आत्मसंघर्ष करावा लागला, याउलट नेमाडयांना ते सहजपणे साधले.

६. कोसला ही एक जिवंत, स्पंदणारी कादंबरी आहे. तिच्या लेखकाच्या व नायकाच्या उत्स्फूर्त, अनौपचारिक, कोऱ्या करकरीत व धारदार भावनात्मक प्रतिक्रिया हे कोसलाचे प्रमुख वैशिष्टय आहे. तिच्यातील उत्कटता, ताजेपणा, भाव-विचारांचे ताणतणाव यामुळे तिच्यात जणू एका चैतन्याचा आविष्कार झाल्यासारखे वाटते.

कादंबरीकाराची निवेदन शैली, नायकाचे मनोविश्लेषण, स्वभावचित्रण आणि कादंबरीची भाषाशैली हे सर्व घटक एकरस होऊन कोसलाचे पोत तयार झाले आहे. त्यामुळे लेखक निवेदनाला कुठून सुरुवात करतो आणि नायक आपल्या प्रतिक्रिया कुठून व्यक्त करतो, कळतच नाही. आशयाशी एवढे इमान राखणारी अभिव्यक्ती मराठी कादंबरीत दुर्मिळ आहे.

'विद्यार्थी बोली'चा नेमाडयांनी केलेला वापर नाविन्यपूर्ण आहे.

समकालीन जीवनाशय, प्रयोगशीलता, आशयाभिव्यक्तीची एकात्मता व नाविन्यपूर्णता अनोखी भावोत्कटता आदी वैशिष्टयांमुळे कोसला स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील सर्वात लक्षणीय कादंबरी ठरली.

७. कोसला म्हणजे कोष. फुलपाखरू बनण्याआधी सुरवंटाभोवती एक कोष असतो, तो फोडून बाहेर यावे लागते, तेव्हा त्याचे फुलपाखरू होते. कोषात सुरक्षितता असते, पण मग प्रकाश आणि आकाशाला पारखे व्हावे लागते. व्यक्तिकेंद्रित जाणिवेचा सुरक्षित पण संकुचित कोष छेदूनच समष्टीच्या आणि नव्या जीवनाच्या आकाशात स्वच्छंद विहार करता येतो.

पांडुरंग सांगवीकराची पिढी हा कोष छेदू शकली नाही. आजच्या विविध वाङ्मयीन प्रवाहातील प्रगल्भ जीवनदृष्टी आणि नवी रूपदृष्टी असलेल्या समर्थ लेखकांना हे आव्हान पेलायचे आहे. ■

रामनगर, नागपूर.

..... युगवाणी प्रतिभेत भेद करणार नाही.
प्रतिभा जुनी–नवी अशी नसतेच.
अशा धारणांच्या लेखकांची युगवाणीस गरज आहे.

वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे यांचे ललित साहित्य : एक अवलोकन

प्रमोद मुनघाटे

डॉ. वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे यांचा लेखनकाळ साधारणत: १९५० ते १९८० असा, तीस वर्षांचा आहे. वसंत वऱ्हाडपांडे यांनी कथा, काव्य, कादंबरी, समीक्षा हे सर्वच वाङ्मयप्रकार हाताळले असले तरी, त्यांना मुख्यत: प्रसिद्धी व प्रतिष्ठा त्यांच्या दर्जेदार नियतकालिकांतील कथा आणि 'नागपुरी बोली : भाषाशास्त्रीय अभ्यास' या राज्य शासन पुरस्कारप्राप्त ग्रंथामुळे मिळाली आहे.

तीस वर्षांच्या एकंदर वाङ्मयनिर्मितीत त्यांचे दोन कथासंग्रह : 'वास्तु' (१९५७), 'उत्सव' (१९८६), एक कवितासंग्रह 'या मनाचा पाळणा' (१९७३), एक कादंबरी :' चित्रशाळा' (१९८१) आणि एक समीक्षा ग्रंथ 'पु. भा. भावे' साहित्यरूप आणि समीक्षा' (१९८१) इत्यादी वाङ्मय प्रसिद्ध झाले आहे.

त्यांच्या या ललित वाङ्मयाचे हे एक अवलोकन.

'सत्यकथा', 'सुषमा', 'सह्याद्रि', 'प्रसाद' या नियतकालिकांतून मराठी कथेच्या विकासाच्या एका टप्प्यावर वऱ्हाडपांडे यांच्या कथा प्रकाशित झाल्या आहेत. मराठी कथेच्या विकासात वरील मासिकांचाच फार मोठा वाटा आहे हे विशेष. १९४५ ते १९६५ या कालखंडात गोखले-गाडगीळ या नवकथाकारांसोबतच जुनेही लेखक कथा लिहीत होते. 'वास्तु' या वऱ्हाडपांडे यांच्या तत्कालीन कथांच्या संग्रहातील कथांवर आशय आणि शैली यांच्या संदर्भात नव्या-जुन्या दोन्ही कथाकारांचा प्रभाव आढळतो. तर 'उत्सव' मध्ये १९६० नंतरच्या त्यांच्या कथांच्या संग्रहात त्यांचा स्वतंत्र बाज जाणवतो.

'वास्तु' या कथासंग्रहाला थोर समीक्षक दि. के. बेडेकर यांची प्रस्तावना आहे. वऱ्हाडपांडे यांच्या कथा य. गो. जोशी आणि पु. भा. भावे यांच्या वळणाने जाणाऱ्या आहेत, असे ते म्हणतात. या संग्रहातील 'निळ्या डोळ्यांची कथा', आणि 'मधला दुवा' या य. गों. च्या शैलीतील आहेत. 'निळ्या डोळ्यांची कथा' मध्ये वांझ स्त्री भावाच्या मुलाला आपली दृष्ट लागेल म्हणून स्वतःच्या डोळ्यात रुईचं दूध घालून आंधळी होते. तर 'मधला दुवा' मध्ये मोहनची बायको आपल्या मुलाला नवऱ्याने टाकलेल्या, मोहनच्या बहिणीचा अक्काचा लळा लागला म्हणून अक्काशी भांडते व तिला घर सोडायला सांगते. या दोन्ही कथांत आई होण्यास असमर्थ असलेल्या स्त्रीच्या मनातील वात्सल्याच्या भुकेचे सूक्ष्म चित्रण आहे, घाटदार कथानक, स्त्री-स्वभावातील बारकावे आणि नेमके संवाद यामुळे या कथा सदैव ताज्या वाटतात. 'पाखरू' ही भाव्यांच्या 'पाखरू' या कथेची व 'किमया' ही त्यांच्याच 'सतरावे वर्ष' या कथेची आठवण करून देणारी आहे, 'पाखरू' मध्ये पाखराच्या पिलाला दिसणारे सुंदर, हिरवेगार, मोहमयी जग आणि त्या पिलाच्या आईच्या अनुभवास आलेले क्रूर, अन्यायी जग यांच्यामधील संघर्ष चित्रित केला आहे, पाखरांमधील संवाद, जगातील विषमतेचे, दारिद्र्याचे, दुःखाचे वर्णन भाव्यांच्या आवाहक शैलीत आहे. तर 'किमया' ही कुमारवयातील चंदू आणि मंदा यांची कथा सतराव्या वर्षातील निरागस प्रेम भावनेचे मोहक शैलीत व नेमक्या प्रसंगात केलेले वर्णन आहे.

प्राचीन संस्कृती आणि मूल्ये यांचा औद्योगिकरणामुळे होणारा ऱ्हास व त्यामुळे लेखकाला होणारे दुःख हेही काव्यांप्रमाणे 'वास्तु' या कथेत वऱ्हाडपांड्यांना वाटते.

'शृंखला' ही भारतीय तत्त्वज्ञानातील 'आत्मा' या संकल्पनेचे गूढत्व आणि अलौकिकत्व उकलणारी कथा आहे. नवजात बालकाचा आत्मा, 'सत्य' सांगण्यासाठी तडफडतो. पण भोवतालच्या

जगाला केवळ नश्वर शरीर व त्याचे विकार-वासना दिसतात; अशी कल्पना या कथेत आहे. शरीर म्हणजे सत्य नव्हे असे मानणाऱ्या वऱ्हाडपांडे यांच्या या 'आत्म्याला' मात्र आईच्या उदरातील गर्भवास किळसवाणा कां वाटावा हे कळत नाही.

'वातचक्र' ही या संग्रहातील एक चांगली कथा. चार-चौघं चैनीने संसार करतात तसे आपल्याही नवऱ्याने करावे असे शेजारच्या जोडप्याला पाहून नीलिमाला वाटते. पण शेवटी समाजसेवेचे व्रत घेतलेल्या आनंदरावांचा ध्येयवाद ती स्वीकारते. 'चाक' आणि 'शिकंदर' या दारिद्र्यात खितपत पडलेल्या, पण सुखाचे स्वप्न पाहणाऱ्या फाटक्या माणसांच्या कथा वैशिष्टचपूर्ण आहेत. आपले दारिद्र्य झटकून आपण स्वाभिमानाने जगावे असे क्षणभरच 'चाक'मधल्या दामूला वाटून जाते. तर 'शिकंदर'मधला राघव चार दिवस उपाशी राहून मोठ्या हॉटेल-मध्ये खाण्याची चैन करतो व क्षणभर शिकंदरपणा अनुभवतो. प्रथमदर्शनी साध्या वाटणाऱ्या या कथाच वऱ्हाडपांडे यांच्या ललित लेखनाची बल-स्थाने आहेत.

'उत्सव' या नंतरच्या कथासंग्रहातील कथांत वऱ्हाडपांडे यांना स्वतःचे कथा-विश्व सापडले आहे, असे दिसते. या संग्रहातील सर्वच कथांमध्ये रूढ अर्थाने कथा नाहीतच. कवितांमध्ये 'भावगीत' हा जसा एक प्रकार असतो, तसा येथे 'भावकथा' आहेत. 'निर्मिती', 'पौरुष', 'शिक्षा', 'राजू', 'अपमृत्यू', 'राहूल : माझा मित्र' या अशा भावकथाच आहेत.

'निर्मिती' मध्ये लेखकाला शेजारच्या सुंदर मुलीच्या अस्तित्वाने निर्माण होणाऱ्या उत्कट भावनांपुढे लिहायला घेतलेल्या कथेची सर्जक प्रेरणा, उर्मी ही थिटी आणि उपरी वाटते, सौंदर्योत्सुक मनाची चलबिचल नेमक्या अनुभवात व्यक्त करण्याचा लेखकाचा प्रयत्न येथे यशस्वी झाला आहे. 'पौरुष' ही कथा तरुण तरुणींच्या मनात फुलपाखराप्रमाणे भिरभिरणारी, हवीहवीशी अस्वस्थता दिगंबरच्या रूपाने लेखक हळूवार-पणे मांडतो.

या संग्रहातील लहान मुलांच्या निरागस भावनांचे भावचित्रण करणाऱ्या कथा वऱ्हाडपांडे यांचे सूक्ष्म निरीक्षण व स्पंदनशील अनुभव साकारण्याची शैली प्रतीत करतात. 'शिक्षा', 'राजू', 'अपमृत्यू', 'राहूल-माझा मित्र' या चार कथांपैकी 'अपमृत्यू' ही कथा त्यातही वेधक आहे. पऱ्यांच्या, जादूच्या विश्वात रमणारा चारुहास ससे म्हणजे आभाळातील म्हातारीच्या कापसाचे गोळे यावर विश्वास ठेवतो. पण एक दिवस तो मोठा होतो, आकाशातून पाऊस कसा पडतो ते शाळेत त्याची बाई सांगते आणि लेख-काच्या दृष्टीने इथे त्याचा अपमृत्यू होतो.

दारिद्र्याने गांजलेल्या 'मुकुंदा शाळिग्राम'ची कथा वर्तमानपत्री अनुभवावर आधारलेली वाटते. गरिबीमुळे पत्नी व मुलांना विष पाजणारा मुकुंदा न्यायाधिशाला भ्रष्टाचार, मूल्यहीनतेमुळे सड-लेल्या समाजव्यवस्थेबद्दल सांगतो; ते लेखकाचेच स्वगत वाटते. कथा आकार घेत नाही. 'अनोळखी' आणि 'पापपुण्य' या कथाही धक्कादायक अनुभव निर्माण करण्याचा अयशस्वी प्रयत्न करताना दिसतात.

'पॉलिश' ही वऱ्हाडपांडे याची स्वतंत्र भावशैली प्रकट करणारी या संग्रहातील सुंदर भावकथा होय. कधी नव्हे ते आयुष्यात प्रथमच जोड्यांना पॉलिश करणारा पुंडलिक त्या जोड्यां-वर धूळ लागू नये म्हणून प्राणापलीकडे जपतो. ओबडधोबड व्यक्तित्वातील असा मजेदार हळूवार-पणा टिपणारे वऱ्हाडपांडे यांचे निरीक्षण अशा कथेत स्वाभाविक वाङ्मयमूल्य धारण करते.

डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या कथासंभारावर दृष्टी टाकली म्हणजे सर्वप्रथम लक्षात येते ती त्यांची लेखनाची प्रामाणिक प्रेरणा. (दि. के. बेडेकर जिला 'गांभीर्य' म्हणतात.) 'मुकुंदा शाळिग्राम' सारखी कथा वगळली तर चाकोरी-बद्ध मध्यमवर्गीय जीवनात सुद्धा प्रतिभावंत लेखकाला मानवी स्वभावाचे रंगीबेरंगी माणिक हाती लागतात. कुठलीही बाह्य, वैचारिक प्रेरणा जाणिवपूर्वक स्वीकारण्याची गरज नसते. म्हणूनच डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या कथांबद्दल राम शेवाळकर म्हणतात, "या लेखकाचे कथाविश्व सोज्वळ

सौंदर्याने उजळलेले आहे. मानवी संबंधातील व कुटुंबजीवनातील हवेहवेसे वाटणारे लोभनीय माधुर्य त्यांच्या कथांची चव वाढवीत जाते. बालवय, कौमार्य, मातेची वत्सलता, दारिद्र्यातील स्वाभिमान असे विषय कथेसाठी वऱ्हाडपांडे निवडतात ते त्यांच्या मध्यमवर्गीय संवेदनशीलतेला भावनात म्हणून. आणि म्हणूनच या कथा स्वाभाविक उतरल्या आहेत."

× × ×

डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या अनुभूतीविश्वातील प्रामाणिकतेची प्रेरणा त्यांच्या कवितातूनही प्रतीत होते. 'या मनाचा पाळणा' हा संग्रह १९७२ मध्ये प्रसिद्ध झाला असला तरी त्यातील कविता १९५०–६० च्या दरम्यानच्या आहेत. बापट–करंदीकर यांच्या कवितेतील वास्तववादावर आधारित सामाजिक अनुभूती आणि अनिलांचा मानवतावाद त्या काळात अन्य कवींवर प्रभाव टाकणारा होता. पण अशा कोणत्याही खुणा वऱ्हाडपांडे यांच्या कवितांवर दिसत नाही. समकालीन प्रेरणा 'स्वीकारणे' किंवा मर्यादित भावविश्वाचा 'प्रामाणिक' आविष्कार करणे या दोहोंत कवितेसाठी दुसरी गोष्टच अधिक स्वाभाविक आणि महत्त्वाची असते असे मला वाटते.

म्हणूनच समीक्षकांनी टिंगल केलेले व मराठी कवितेतून हद्दपार झालेले चंद्र, तारका, आभाळ, वारा, फुले, सुगंध यांचे एकसुरी (प्लेन) वर्णन वऱ्हाडपांडे यांच्या कवितांतून प्रामुख्याने आढळते. दोन–चार कविता वगळता या संग्रहातील बहुधा प्रत्येक कवितेत 'मत्त गंध', 'सुगंध' हे शब्द आलेले आहेत.

निसर्गाचे रम्य दर्शन आणि त्याच्या अथांगतेपुढे नतमस्तक होण्याची भावना, 'कोसळले गगन जरी' अशा सारख्या कवितेत आहे.

> पंख हवे मज असले
> उलगडता सहजच जे
> भयकंपित हो वारा
> चपलेचे तेज थिजे....(पंख हवे मज असले)

अशी अपेक्षा करणाऱ्या कवीला,

> बळ असून दुर्बल मी
> शल्य वागवीत उभा
> बाहुतिल थिजले वळ
> सावरीत क्षुद्र नभा...

अशी वास्तवाची जाणीवही आहे. पानं, फुले, पांखरे, बालसूर्य यांच्या स्वतःच्या मनातील भावसादृश्य सौंदर्याला आळवणाऱ्या कवीला 'सत्या'चा प्रत्ययही कधी येतो :

> फुटतो जेव्हा घडा अचानक
> अन् मातीला माती मिळते
> आकाराचे फसवे बागुल
> बघता बघता विरून जाते
> तेव्हा कळते : आकाराचे
> वृथाच केले होते कौतुक
> वृथाच होतो बसलो वानित
> वरची नक्षी सुबक अमोलिक (सत्य)

'दुपार', 'प्रत्यय', 'अशा दुपारच्या वेळी' या कवितात सुंदर शब्दचित्रे मोजक्या शब्दात वऱ्हाडपांडे काढतात. ती अतिशय मोहक आहेत.

> ओला मेहंदीचा हात
> त्याने कुर्वाळिली वेल
> माझी मोगऱ्याची फुले
> कशी झाली लाल . . . लाल
> (ओला मेहंदीचा हात)

अशा एखाद्या कवितेत पु. शि. रेग्यांची मुग्ध वासना जाणवते, पण 'अजूनि स्मरते या हातांना' अशा कवितेतून ते मध्यमवर्गीय संवेदनशीलता प्रामाणिकपणे व्यक्त करतात. ही संवेदनशीलता आणि आविष्करणातील हा प्रामाणिकपणा खरे तर त्यांच्या एकूणच ललित वाङ्मयाचे व त्यांच्या व्यक्तिमत्वाचे केंद्रक आहे :

> अजूनि स्मरते या हातांना
> काल माखली होती माती
> अजूनि जपते धाप कालची
> कालचीच श्रमवेडी छाती
>
> . . . . . .
>
> असले हे मातीचे माझे
> परंपरागत अतूट नाते
> जरा पुसट आणखी
> होऊ नये ते आता होते !'

म्हणूनच कवी अनिल 'वसंत वऱ्हाडपांडे हे कवींच्या गर्दीतूनही स्वतःच्या कविव्यक्तित्वाचा वेगळेपणा जाणवून देतात.' असे या काव्याच्या संदर्भात म्हणतात. (मलपृष्ठ 'या मनाचा पाळणा')

× × ×

'चित्रशाळा' ही वसंत वऱ्हाडपांडे यांची एकमेव कादंबरी. निवृत्त झालेल्या प्राध्यापकाचं हे मनोगत. कादंबरीला कथानक असे नाहीच पण ते नाही म्हणून त्यात वैशिष्टयपूर्ण असे काही नाहीच. झपाट्याने बदलणाऱ्या सामाजिक वास्तवाच्या अक्राळविक्राळ वादळातही मूल्यनिष्ठेची पणती तेवत ठेवणाऱ्या मध्यमवर्गाचा प्रतिनिधी म्हणजे या कादंबरीचा नायक. या पणतीचा प्रकाश मात्र केवळ आभास आहे. कारण नायकाची संवेदनशीलता ही नमुनेदार मध्यमवर्गीयांच्या कृतीशून्य प्रतिक्रियावादातून जन्म घेतलेली आहे. या सुरक्षित संवदेनशीलतेला भोवताली घडणाऱ्या, मन सुन्न करणाऱ्या घटना चिंतनीय वाटतात. मध्यमवर्गीय म्हणून इतरांनी हिणवलेल्यांच्या चक्रव्यूहातल्या या घटना या कादंबरीच्या नायकाला अस्तित्वाच्या प्रश्नाइतक्या महत्त्वाच्या वाटतात. (अर्थात हा सुद्धा आभास.) अशा प्रसंगांची चित्रशाळा म्हणजे प्रस्तुत कादंबरी.

हा नायक मात्र आपल्या जाणिवांशी प्रामाणिक आहे. विश्वाला मानवतेचा खोटा भाव तो आणीत नाही. इतरांनी कितीही क्षुद्र समजलं तरी प्रत्येकाचं त्याच्या जाणिवांच्या मर्यादेपुरतं विश्व अफाट असतं.

चांगले शिक्षण, यशस्वी नोकरी, चौकोनी कुटुंब असा जीवनाचा एकमार्गी अनुभव घेतलेल्या या निवृत्त प्राध्यापकाची जगाकडे, निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी काहीशी कृतज्ञतेचीही आहे. हे कृतज्ञ जीवन रेखांकित करण्यासाठी लेखकाने नाना देसाई हे एक पात्र या कादंबरीत आणले आहे. नाना हे स्वातंत्र्यचळवळीत स्वतःला झोकून देणारे सेनानी. स्वातंत्र्योत्तर काळातील देशातील विषमता, दारिद्र्य, अराजकता पाहून त्यांना वाईट वाटते. चीड येते. चळवळीसाठी त्यांनी आपल्या प्रेयसीचा मोहपाशही टाळलेला असतो. नायकाच्या चाकोरीबद्ध, सुखवस्तु आयुष्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर नानांचे जीवन असामान्य वाटते.

या कादंबरीत तीनच पात्रे आहेत. नायक, त्याची पत्नी वसु आणि नाना. कादंबरी प्रथमपुरुषी निवेदनाच्या तंत्रात लिहिली आहे. त्यामुळे वारंवार घटनांचा ओघ खंडीत होऊन नायकाची पर्यायाने लेखकाची दीर्घ स्वगते येतात. अनेक ललित स्वगते व निबंधांचा समुच्चय म्हणजे प्रस्तुत कादंबरी असेही म्हणता येईल. या निबंधांतील लालित्य व वैचारिकता पूर्णपणे भाव्यांच्या प्रकृतीशी साम्य सांगणारी आहे. इतिहासातील भव्यतेचे आकर्षण, प्राचीन संस्कृतीचा अभिमान, ढासळणारी सामाजिक नीतिमत्ता यावर नायक आवेशाने भाष्य करतो. स्वतःच्या अकार्यक्षमतेला दोष देतो. स्वतःचा इन्टरव्ह्यू घेताना हा प्राध्यापक स्वतःशी म्हणतो, 'याचाच अर्थ, काहीही व्यासंग न करता केवळ बोलण्यातल्या कौशल्यानं तू इतका काळ लोकांना झुलवलंस! –किंवा विद्यार्थ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्या भांडवलावर तू तुझा व्यवसाय केलास! होय की नाही? खरं म्हणजे धंदा केलास' (इ)

वस्तुतः मध्यमवर्गीयांच्या खोट्या–फसव्या संवेदनशीलतेवर अर्धे-अधिक मराठी कथासाहित्य निर्माण झाले आहे. या संवेदनशीलतेला हास्यास्पद ठरविणाऱ्या 'कोसला'सारख्या कादंबऱ्याही कितीतरी आधीच लिहिल्या आहेत. या दृष्टीतून प्रस्तुत कादंबरी कालबाह्य वाटते.

'कादंबरी' या वाङ्मयप्रकारच्या दृष्टीने ही कादंबरी अतिशय सैल आहे. तीनच पात्रे असल्याने या कादंबरीत घटनाप्रसंग अत्यल्प आहेत. आजूबाजूच्या नातेवाईकांचे व मित्रांचे दुःख पाहून नायकाचे मन झंकारते. तोच त्याला जीवनाचा अनुभव वाटतो व तो दीर्घ भाष्ये करतो. कादंबरीत अनुभवाची विवक्षितता दाखविण्याऐवजी चटकन सामान्यीकरण करण्याची प्रवृत्ती हा मुख्य दोष आहे. त्यामुळे नियती, जीवन, दुःख, नशीब या शब्दांच्या आधारे कंटाळवाणी स्वगते निर्माण झाली आहेत. साप्ते बाजारातून भटकताना सुद्धा लेखकाला (नाय-

अनुक्रमणिका

ताला) 'मानवी स्वभाव' न्याहाळण्याचा मोह आवरत नाही.

लेखकाच्या शब्दशैलीत नावीन्य नाही. कथांप्रमाणे नेमकेपणा नाही. सकाळ, संध्याकाळचे वर्णन करतांना पुनःपुन्हा तीच ती पाल्हाळं येतात. क्वचित 'नाराजलोच' (३) असे प्रावरकरी क्रियापद, 'मुडकावीत' (१०), 'रचरचली' (११०) अशी नादानुवर्ती वैशिष्टयपूर्ण शब्द वऱ्हाडपांडे निर्माण करतात.

× × ×

वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे यांच्या एकूण ललित वाङ्मयाचे अवलोकन करताना असे लक्षात येते की, त्यांच्या कादंबरीपेक्षा त्यांची कविता अधिक आस्वाद्य आहे; व त्यापेक्षा त्यांच्या कथा त्यांच्या प्रतिभेचा प्रामाणिक आविष्कार आहे.

त्यांच्या संपूर्ण साहित्यात 'मध्यमवर्गीय संवेदनशीलता' ही भावना केंद्रीभूत झालेली आहे. त्यामुळे त्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व एकात्म वाटते. वाङ्मयमूल्य दृष्टचा या वाङ्मयाचा दर्जा कमी जास्त असेल पण त्यांचा प्रामाणिक आविष्कार वादातीत आहे. एक यशस्वी प्राध्यापक व मध्यमवर्गीय नागरिक म्हणून समाजाच्या संदर्भात आलेल्या अनुभवांना त्यांनी कोणत्याही तथाकथित 'वादाचा' आव न आणता वाङ्मयरूप देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. ■

c/o मराठी विभाग
नागपूर विद्यापीठ परिसर,
नागपूर, १०

साभार पोच

मन चितीत चितीत / डॉ. प्र. ना. व्यवहारे / पृ. ११७ / रु. ७ /–
स्मृतिगंध / स. शं. देसाई / प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर / पृ. २५१ / रु. ८० /–
तांबडं फुटलं / वा. ह. कल्याणकर / युगंधरा प्रकाशन, औरंगाबाद / पृ. ९४ / रु. ४० /–
महाराष्ट्र रामायण / आनंद साधले / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / पृ. ५४४ / रु. १५० /–
क्रांतीपर्व / डॉ. उत्तमराव पाटील / म. रा. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई / पृ. ३८९ / रु. ६० /–
डॉ. भीमराव आंबेडकर / चा. भ. खैरमोडे / म. रा. सा. सं. मंडळ, मुंबई / पृ. ४१६ / रु. ४० /–
संहिता समीक्षा आणि परिभाषिक संज्ञा / वसंत दावतर / म. रा. सा. सं. मंडळ, मुंबई / पृ. १६१ / रु. ६३ /–
प्रवासवर्णन / डॉ. वसंत सावंत / म. रा. सा. सं मंडळ मुंबई / पृ. ४४९ / रु. ५० /–
शंकर पळशीकर यांची चित्रे / एस एस. वासुदेव / म. रा. सां.सं. मंडळ, मुंबई / पृ. ८० / रु. ९० /–
धर्माचे समाजशास्त्र / अनुवाद श्री. नरेश परळेकर / म. रा. सा. सं मंडळ, मुंबई / पृ. ९१२ / रु. १२० /–
भावनाकोश / डॉ. शं. र. फाटक / म. रा. सा. सं. मंडळ, मुंबई / पृ. ५६५ / रु. ४० /–
महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शीलालेख / डॉ. वि. भि. कोलते / पृ. ४४५ / रु. ८२ /–
कौटलीय अर्थशास्त्र / प्रा. र. पं. कांगले / म. रा. सा. सं. मंडळ, मुंबई / पृ. ६८३ / रु. ७६ /–
विनोबा सारस्वत / संपा. राम शेवाळकर / साहित्य अकादमी / पृ. ३२९ / रु. ४५ /–
चेम्मीन / तकाशी शंकर पिल्ले / अनुवाद- प्रमोद जोशी / साहित्य अकादमी / पृ. १८८ / रु. २५ /–
रामशास्त्री प्रभुणे / सदाशिव आठवले / श्री विद्या प्रकाशन, पुणे / पृ. १६७ रु. ५० /–
परिक्रमा / लता राजे / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / पृ. २४० / रु. ६० /–
डॉ. बाबासाहेब आंबेडकर / चां. भ. खैरमोडे / श्रीविद्या प्रकाशन पुणे / पृ. २२० / रु. ६० /–

अनुक्रमणिका

क | वि | ता

अंधारगाणे / श्याम माधव धोण्ड

पुन्हा अनादी अंधार
जडजीवात भरला
तमंव्याकूळ सृष्टीस
दीप दयार्णव झाला...

खोप्यांतून पाखरांचे
मग खोळंबले गाणे
क्षण थांबले कळ्यांचे
स्वप्नातलेही फुलणे...

चुकचुकलेली पाल
काय शकुन बोलली ?
सांद्र अंधाराची गाणी
रातकिड्यांनी गायिली...

हलू हळवा पसारा
झाला संवेदक सारा
घोटाळला ज्योतीपाशी
वारा; शोधत सहारा...

तेव्हा दुरूनिया आले
भरवीचे जड सूर...
सारे साठले जात्यात
सांडे भूपाळी पिठूर !

□ □

उकल / श्याम माधव धोण्ड

कुण्या गावाच्या गाठीला
बांधू माझे जीर्ण जिणे ?
भूत भविष्या पल्याड
वेड्या, दिगंता पेलणे...

प्रहरांनी आपल्यात
सामावावे ओतप्रोत
आणि वाहत्या प्रवाही
व्हावे डोळे दोन रिक्त

यात्रेच्याही उरी दडे
अगम्याचा गमागम
जैसा गंगौघाच्या ठायी
श्रद्धागंधाचा उगम

चित्र अंधाराला पीत
वृक्ष 'शिशिर्देही' उभा
लाभे वसंता कोंदण
ऐसा त्याचा अंतर्गाभा !

समूर्तांच्या संदर्भांचा
तळ गूढ नि नितळ
संथ सोसता असोशी
वाढे वठण्याचे बळ...!

□ □

युगवाणी / ए-मे-जू '८८

अनुक्रमणिका

मुद्दल / सदानंद देशमुख

आज पुन्हा
मला माझ्या गहाण पडलेल्या स्वप्नांची
तीव्रतेनं आठवण व्हायला लागली
स्वप्नावाचून
कसमसुन यायला लागलं.

म्हणून, मी माझी
सारी संचित निराशा
कनवटीला लावून
सावकाराकडे गेलो.

त्याने व्याजाचा हिशेब केला
माझ्या कनवटीची
सारी निराशा
व्याजातच संपणार होती
आणि मुद्दल बाकीच राहणार होती !

□ □

हूल / सदानंद देशमुख

स्वप्न पाखरांची दाटी हर्ष फांद्याला झकोले
कोणी मारला दगड पक्षी सैरावैरा झाले

किती टाकले तरीही फसे डेऱ्यात पाऊल
अवचित घडे सारं नाही लागत चाहूल

कामसाधू गणगोत देई जिव्हाळ्याची हूल
कळू येते उशिरानं गोड शब्दातली भूल

आता जपून चालतो मागे वळून पाहतो
ठेचाळती बेसावध त्यांना सावध करतो !

□ □

काही हायकू / वासंती इनामदार जोशी

१.

कशासाठी उमलतोय गंध ?
सुवास मंद मंद
दुसरा नाहीच का छंद ?

२.

सगळीकडे उमटलेत
फुलांचे जर्द ठसे
कधी फुलल्या कळ्या ?
कळलेच नाही कसे ?

३.

आभाळभर पालवलेला
घनगर्द वसंतऋतू
कसे समजायचे त्याचे हेतू ?

४.

ओळखीचे ढग
ओळखीच्या खुणा
हा कोण उमलतोय
गंधांचा पाहुणा ?

□ □

उत्पात / अलोन

या झुळुकेपरी
आहे–नाहीसे
सहज तुझे
असणे

तू गेल्यावर
उ न्म ळ ले घ र
पहात मी
बसणे.

□ □

अनुक्रमणिका

भारतीय स्त्रीजीवन

अनंत अमदावादकर

ग्रं थि की

भारतात स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ त्यात गुंतलेल्या विविध स्तरातील कार्यकर्त्यांच्या समज व कुवतीनुसार आकार घेत आहे. अशावेळी गीता साने यांचे " भारतीय स्त्रीजीवन " हे पुस्तक मौज प्रकाशनाने प्रकाशित करून एक महत्त्वाचे काम केलेले आहे. या विषयाच्या अभ्यासकांची ह्यामुळे मोठी सोय झालेली आहे. शिवाय स्त्री-मुक्तिवादी चळवळीला चर्चेसाठी एक भक्कम अभ्यास-ग्रंथ उपलब्ध झाला आहे. अलिकडे ह्या चळवळीच्या अनुषंगाने जे वाङ्मय प्रसिद्ध झालेले आहे त्यात उत्साह, अभिनिवेश व उत्तेजनेचा भाग अधिक आढळून येतो. मध्यमवर्गीय जाणिवेचा 'करिअरिस्ट' दृष्टिकोनही त्यातून वजा करता येत नाही. परिणामी वैचारिक विकासात अनेक अडथळे निर्माण होण्याची शक्यता गृहित धरावी लागते. समतेच्या चळवळीतील स्त्रियांना समता स्वातंत्र्याच्या जीवनाचे चित्र मात्र स्पष्ट झालेले नाही. त्यांच्या मनावर रेखलेले चित्र पहावयास मिळते, तेव्हा दलितांना ' ब्राह्मण ' व स्त्रियांना 'पुरुष' व्हावयाचे आहे, असे आढळून येते. या चळवळींना समता अभिप्रेत नसून आपल्यापुरते विशेषाधिकार पाहिजे आहेत हाच त्याचा अर्थ होतो, त्यामुळे मध्यमवर्गीय स्त्रिया चळवळीत निष्क्रिय राहतात.' (पृ. २३५) असे सडेतोड मत लेखिकेने व्यक्त केले आहे.

स्त्रियांच्या प्रश्नांबद्दल अकृत्रिम जिव्हाळा आणि आस्था लेखिकेला आहे. स्त्रीस्वातंत्र्याच्या ध्यासाने दीर्घकाळपर्यंत केलेल्या धडपडीतून आलेले अनेक अनुभव त्यांच्या गाठीशी आहेत. त्यांचे स्त्रीस्वातंत्र्यविषयक विचाराचे एक सूत्र आहे. या ग्रंथातील सगळ्या प्रकरणातून संकलित केलेली माहिती व त्यावर व्यक्त झालेले अभिप्राय त्यांच्या आवडत्या विचारसूत्रात गोवून मांडलेले आहेत. आशयाशी अनुरूप व अनुकूल भाषा वापरण्याचे सामर्थ्य लेखिकेजवळ असल्यामुळेच विषयाचा एवढा विस्तार मर्यादित पृष्ठसंख्येच्या आवाक्यात त्यांना मांडता आला. भरपूर संदर्भ, नोंदी, अवतरणे यांनी ग्रंथाची गुणवत्ता वाढविलेली आहे. परतंत्र भारतीय स्त्रीजीवनाची सुखदुःखे स्पष्ट करणे हा या प्रबंधाचा हेतू आहे असे लेखिकेने सुरुवातीसच सांगितले आहे. आणि ह्या हेतूपुरते ग्रंथाचे यश मोठे आहे.

एकूण पाच प्रकरणे व एक परिशिष्ट अशी ह्याग्रंथाची विभागणी केली आहे. भारतीय न्याय-व्यवस्था, अर्थव्यवस्था, वेश्यासंस्था, आणि कुटुंबव्यवस्था अशा विविध अंगांनी केलेला भारतीय स्त्रीजीवनाचा अभ्यास या ग्रंथात वाचकासाठी उपलब्ध झालेला आहे. भारतीय स्त्रीकडे पाहण्याची लेखिकेची विशिष्ट दृष्टी व विचारसणी आहे त्यांची आवडती मतं त्यांनी विविध विषयांच्या अनुषंगाने धावते अभिप्राय देताना निष्कर्षांच्या रुपात मांडलेली आहेत. त्यादृष्टीने ' प्रश्नाची पार्श्वभूमी हे ' पहिले व ' स्त्री आणि कुटुंबसंस्था ' ही दोन प्रकरणे वाचण्यासारखी आहेत. स्मृतीप्रणित धर्मशास्त्र व त्याचाच भाग असलेली परंपरा व न्यायव्यवस्था, दुटप्पी लैंगिक नीती यामुळे बंदिस्त व परतंत्र झालेले स्त्रीजीवन, तिला सोसावा लागणारा छळ आणि तिचे नष्ट झालेले व्यक्तिमत्व इत्यादि स्त्रीजीवनाचे दास्य चित्रित करणारे विवेचन हृदयाला चटका लावणारे आहे. ते मूळातूनच वाचले पाहिजे. मात्र आजच्या दृष्टीने इतिहासाकडे पाहण्याचा प्रयत्न झाला तर आकलनाचा धीर सुटतो व निष्कर्ष वक्र होण्याचा संभव असतो. अशात मोहित करणारी विचारसरणी जर जवळ असली तर भूतकाळात घडून गेलेला इतिहास पुन्हा घडविण्याचे प्रयत्न प्रामाणिकपणे होत राहतात. आपल्याला आवडलेले सिद्धांत नित्य नव्या परिभाषेचा शोध घेतच असतात. ' आवडती ' ' नावडती ' असे विचारसरणीचे भेदही आता फारच स्पष्टपणे जाणवू लागले आहेत.

स्त्रीमुक्तीच्या चळवळीतून प्रकट होणारी विचारसरणी व लेखिकेची विचारसरणी जवळजवळ सारखी आहे, असे बारकाईने पाहिल्यास जाणवते. स्त्रीस्वातंत्र्यविषयक लेखिकेने केलेली टीका लक्षात घेऊनही दोहोतले साम्य लक्षात राहण्यासारखे आहे. या ग्रंथात व्यक्त झालेले पानोपानी विखुरलेले अभिप्राय एकत्र करून ह्यावर सलगपणे प्रदीर्घ चर्चा घडून येण्याची आवश्यकता आहे. स्त्रीमुक्ती, स्त्रीस्वातंत्र्य या संकल्पनांचा आशय स्पष्ट होण्यासाठी अजून बराच काळ लागेल. अज्ञान व दारिद्र्यात खितपत पडलेल्या भारतातल्या स्त्रियांना विचार करायला थोडी उसंत मिळेल तेव्हाच स्त्रीस्वातंत्र्याचा सर्वगामी आशय प्रकट व्हायला सुरुवात होईल. प्रस्तुत प्रबंध भविष्यातल्या स्त्रीमुक्तीच्या चर्चेची प्रस्तावना ठरत असेल तर ते यशही असाधारण ठरेल.

'पुरुषप्रधान समाजव्यवस्थे'बद्दल या ग्रंथातही भरपूर चर्चा झालेली आहे. 'जगातील इतर समाजही स्त्रीच्या अवनतीला अपवाद नाहीत' 'स्वस्त्रीची विक्री करण्याचा अधिकार नवऱ्याला एकोणिसाव्या शतकातही, इंग्लंडमध्ये होता.' (पृ. १६) अशासारखे अनेक संदर्भ चर्चेला घेतलेले आहे. याचा अर्थ स्त्रीदास्याचा इतिहास जागतिक पातळीवर घडलेला आहे. पुरुषप्रधान व्यवस्था ऐतिहासिक ओघात केवळ भारतातच निर्माण झाली असे नाही. प्राचीन काळापासून, परस्परात कुठलेही दळणवळण आणि संपर्क नसताना, स्वतंत्रपणे वाढलेल्या भिन्न संस्कृतीमध्ये पुरुषप्रधान समाजव्यवस्था निर्माण झालेली आढळून येते. याबाबतीत प्रश्न पडतो की असे का झाले असावे ? स्त्रीला पुरुषाश्रयी गौणत्व का प्राप्त व्हावे ? यासंबंधीची जीवशास्त्रीय कारणमीमांसा उपलब्ध आहे काय ? याचे पुरेसे स्पष्टीकरण या ग्रंथातूनही कुठे दिलेले आढळून आले नाही. माणसाच्या मानवीकरणाची प्रक्रिया अपूर्ण राहिल्याची ही लक्षणे आहेत काय ? की माणसाचा पशुभाव अजूनही पुरेसा नष्ट न झाल्याचा हा पुरावा आहे ? आजवरच्या नायकवादी समाजरचनेच्या बलप्रधान आचारसंहितेतून पुरुषप्रधान समाजरचना निष्पन्न झाली असावी असा तर्क बांधता येईल. पण ह्या साऱ्या प्रश्नांचे विज्ञाननिष्ठ स्पष्टीकरण शोधले पाहिजे. नीतिमूल्यांचा विचार अधिक सावधपणे करण्याची आवश्यकता आहे भौगोलिक परिस्थिती, आर्थिक व्यवस्था, स्त्री–पुरुषांची संख्या माणसाची सृष्टीविषयक व मानवविषयक विचारसरणी, परकीय आक्रमणे व त्यातून निर्माण झालेली संरक्षण विषयक व्यवस्था इत्यादी गोष्टींनी नीतिमूल्ये निर्धारित होत असतात. व त्यामुळे इतिहासात वेगवेगळे नीतिनियम व नीतिपर्याय दिसून येतात. नीतिमूल्यांच्या बाबतीत स्त्री व पुरुष असे द्वंद्व उभे करून ऐतिहासिक आकलन करण्याच्या पद्धतीमुळे स्त्री व पुरुष ह्या मानवी व्यक्तींचा वैज्ञानिक बोध गारठण्याची शक्यता आहे याचे भान विचारवंतांनी ठेवण्याची गरज आहे.

औद्योगिक संस्कृती अवतरल्यानंतर जातिव्यवस्थेचा खचलेला पाया, कुटुंबव्यवस्थेची व लैंगिक नीतिसंबंधाची झालेली प्रचंड मोडतोड, जन्माधिष्ठित श्रेष्ठकनिष्ठतेचा खिळखिळा झालेला सोपान, जातपंचायती, स्वयंपूर्ण खेडी व ग्रामपंचायती अशी समाजाची अंगे खिळखिळी झाल्याचे चित्रण लेखिकेने अनेक उदाहरणे देऊन केलेले आहे. जुन्या व्यवस्थेच्या वाताहतीसंबंधी अनेक अभिप्राय व्यक्त केले आहेत. वानगीदाखल काही अवतरणे पहा–'त्यांच्या कार्याची पर्यायी व्यवस्था मात्र बहुश: केलेली नाही.' (पृ. २९) 'एकत्र कुटुंब तुटल्यावर उघड्यावर पडलेल्या निराधारांची सोय सामाजिक पातळीवर आजही झालेली नाही.' (पृ. ३०) 'तुटलेल्या जुन्या समाजव्यवस्थांच्या जबाबदाऱ्या समाजाने आपल्या समर्थ खांद्यावर झेलल्या नाहीत...त्यामुळे जुन्या नष्ट झालेल्या परंपराऐवजी, कोणी केव्हा व कसे वागावे ह्याचे नवे पायंडे पडले नाहीत; आणि समाजजीवनात पोकळ्या निर्माण झाल्या. वडील मंडळींनी ह्या पोकळ्यामधून येणाऱ्या अराजकाबद्दल कधी आजकालच्या तरुणांना दोष दिला तर कधी कलियुगाला जबाबदार धरले. कलियुगाचे आव्हान त्यांना मात्र घेता आले नाही; प्रश्नांची उत्तरे शोधता आली नाहीत.' (पृ. ३१) 'जुन्या समाजरचनेची पडझड आपल्याला जाणवली, पण तिची दुरुस्ती करता आली नाही वा नवीन काही निर्माण करून तुटलेला भाग जोडून घेता आला

अनुक्रमणिका

नाही. परिवर्तनाच्या ओघात नव्याने उभे राहणारे प्रश्न वेळोवारी दिसलेही नाहीत. गेल्या दीड शतकात औद्योगिकरणामुळे अस्ताव्यस्त वाढत गेलेली कलकत्ता–मुंबईसारखी शहरे, त्या शहरामधून तयार होत असलेल्या उपेक्षित व दीनवाण्या वस्त्या किंवा झोपडपट्टया, त्यांच्यात पोसली जाणारी गुन्हेगारी, फोफावत गेलेला वेश्याव्यवसाय, पोरांची होणारी दैना ह्या गोष्टींचा अन्वयार्थ समजण्याइतकी प्रगल्भ बुद्धी फारशी कुठे दिसून येत नाही. झोपडपट्टीच्या पुनर्वसनाची प्रचंड समस्या ह्यातूनच जन्माला आली.' (पृ. ३१) 'जुने दोष सुधारता आले नाहीत; उलट, परिवर्तनाच्या ओघात ते तीव्रतर झाले.' (पृ. ३२)

वरील अवतरणांवरून, सामाजिक स्थित्यंतराविषयीचे सगळे निष्कर्ष नकारात्मक असे सहजच लक्षात येते. पर्यायी व्यवस्था शोधण्याचे, नवे पायंडे पाडण्याचे, पोकळचा भरून काढण्याचे, प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे, समाजरचनेच्या पडझडीची दुरुस्ती करण्याचे, तुटलेला भाग जोडून घेण्याचे, गोष्टींचा अन्वयार्थ समजण्याइतकी प्रगल्भ होण्यासाठी बुद्धीच्या मशागतीचे इ. अनेक प्रश्न वरील अभिप्रायातून वाचकांच्या मनात निर्माण होतात पण ह्यांचे निश्चित अर्थ, उकल, अन्वयार्थ वेगळचा दृष्टिकोनातून समजावून घेण्याची वाचकाची जिज्ञासा मात्र या ग्रंथातून पूर्ण होत नाही. त्यामुळे असे अभिप्राय स्वगतासारखे वाटतात. नवनिर्माणावाचून आपल्याला आता गत्यंतर नाही.' (पृ. ३२) या वाक्याचा अर्थ, नवीन काही निर्माण करून तुटलेला भाग कसा जोडून घ्यावा हे किंवा असेच काही तरी स्पष्ट केल्याशिवाय, कसा कळणार ? स्वातंत्र्य आणि समता या शब्दांचा आशय भारतीय स्त्रीजीवनाच्या संदर्भात स्पष्ट झाला असता तर बरे झाले असते. प्रश्नांची उत्तरे शोधता न येणाऱ्या वडीलधाऱ्या मंडळींनी अराजकाबद्दल जसे तरुणांना किंवा कलियुगाला जबाबदार धरले तद्वत्‌च एकंदरीत समाजव्यवस्थेबद्दल कुणाला तरी जबाबदार धरून त्या विरुद्ध असंतोष संघटित करण्यात आमची विद्वत्ता इतकी गुंतून पडते की समाजाच्या नवनिर्माणाचे मानसचित्र रेखाटण्याच्या जबाबदारीचा तिला विसर पडतो. माणसाने माणसाच्या चालवलेल्या शोषणाच्या असंख्य हृदयद्रावक कहाण्या ऐकून आम्ही सारेच व्यथित होतो. परंतु शोषण–संबंध हुडकून काढून 'त्याचा अन्वयार्थ समजण्याइतकी प्रगल्भ बुद्धी फारशी कुठे दिसून येत नाही व या शोषण संबंधाचे मूळकारण असलेल्या स्वार्थी प्रेरणांना आवर घालण्याचा निर्णय व्यक्तिगत पातळीवर घेऊन समाजात मूल्ये स्थिरावण्याचे प्रयोग करणाऱ्यांची उदाहरणे चळवळींचे विचारकारण करणाऱ्या लोकातही क्वचितच आढळून येतात. विचारहीन बंडखोरीने स्त्रीमुक्तीचा मार्ग प्रशस्त होईल आणि नवनिर्माणाची दिशा सापडेल अशी आशा करता येणार नाही.

परिस्थितीमुळे घडून आलेले बदल हेतूशून्य असल्यामुळे एकांगी व अपुरेच असतात. बस व रेल्वे गाड्यातून एकत्र प्रवास करावा लागल्यामुळे काही जुने संकेत गळून पडत असले तरी त्यामुळे माणसामाणसातले संबंध उन्नत झाले असा निष्कर्ष काढता येत नाही व बसस्थानके व रेल्वेस्टेशन ही समाजपरिवर्तनाची संस्कार केंद्रे बनली असे मानता येत नाही.

लेखिकेने अनेक महत्त्वाच्या व एरवी दुर्लक्षित मुद्यांना विवेचनात समाविष्ट करून स्त्रीजीवनाचे आकलन होण्यासाठी वाचकाची भूमिका व्यापक बनवायला मदत केली आहे हे खरे असले तरी अनेक मुद्यांबाबत अभिप्राय देताना व्यक्त झालेली मते पुष्कळदा सुटी, शेरे–ताशेरेवजा, अपुरी व मोघम वाटतात. अशापैकी काही मुद्यांचा परामर्श घेणे चर्चेला उपयुक्त ठरेल असे वाटते.

न्यायव्यवस्थेवरचे प्रकरण अतिशय अभ्यासपूर्ण आहे. न्यायसंहिता, अंमलबजावणी आणि न्यायदान ह्या तिन्ही शाखांची सविस्तर चर्चा केलेली आहे. ह्या तिन्ही पातळीवर वर्तमान न्यायव्यवस्था मोठी समाधानकारक व आशादायक नाही. कायद्याची पायमल्ली होण्याचे कारण म्हणजे कायद्यांची संहिता व त्यावरचे नियम अपुरे असतात. कायदे व त्यांची प्रत्यक्षात होणारी अंमलबजावणी यात प्रचंड अंतर पडून कायदे निरुपयोगी होतात. कायद्याचे बडगे स्त्रीसंरक्षणार्थ तिच्या पाठीशी उभे राहत नाहीत; तर सदैव तिच्या पाठीवर

पडत असतात. या प्रकरणातील विवेचन वाचून आंधळ्या न्यायदेवतेची आठवण होते. न्यायव्यवस्थेसमोरची स्त्रीची अगतिकता लेखिकेने ह्या प्रकरणातून प्रभावीपणे चित्रित केलेली आहे.

एकूण, न्यायव्यवस्थेसंबंधीचा प्रश्न हा संपूर्ण सामाजिक परिवर्तनाचा एक भाग म्हणूनच विचारात घ्यावा लागेल. कोणताही न्याय हा समाजाच्या सामाजिक; आर्थिक आणि सांस्कृतिक इयत्तेपेक्षा उच्च राहू शकत नाही हा न्यायव्यवस्थेसंबंधीचा सारांश आपण लक्षात ठेवला पाहिजे. संपूर्ण क्रांतीच्या दिशेने समाजाची पावले पडू लागतील तेव्हाच स्त्रीला न्याय मिळेल अशी आशा बाळगता येण्यासारखी आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेतील स्त्रियांची लेखिकेने 'मिळवत्या' व 'न मिळवत्या' अशा दोन गटात विभागणी केली आहे आणि दोन्ही गटातील स्त्रिया स्वतंत्र नसून घराच्या वेठीच्या मजूर आहेत, असा निर्वाळा दिला आहे. भारतातील गरिबीच्या करुण कहाण्यांना अंत नाही. स्त्रीचे समाजव्यवस्थेतील स्थान गौण असल्यामुळे तिच्या वाट्याला गरिबीचे दुःख अधिक आले आहे. तिचे दुःख भारतीय अर्थव्यवस्थेतील स्थित्यंतरामुळे अधिक वाढले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची कशाप्रकारे पुनर्रचना केली म्हणजे हे दुःख कमी होईल याचा व्यापक विचार होण्यासारखा आहे. तशी मांडणी इतरत्र झाली असली तरी त्या विचारसरणीचा या ग्रंथात विचार केलेला दिसून येत नाही, असे खेदाने म्हणावे लागते.

लेखिकेची याबाबतची काही मते चर्चेस उपयुक्त ठरतील म्हणून पुढे दिली आहेत. 'स्त्रिया आत्मविस्मृत नाहीत, तर साखळदंडांनी घट्ट जखडून पिंजऱ्यात कोंडलेल्या व वठणीवर आणण्यासाठी अन्नपाण्याविना ठेवलेल्या सर्कशीतील जनावरांशी त्यांचे साम्य आहे. गृहिणींना एक मालक असतो. त्याच्यासाठीच त्यांना राबावे लागते." (पृ. १६०). "समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या नवीन परिस्थितीत स्त्रियांचे अर्थार्जन आवश्यक तसेच उचितही झालेले आहे. तथापि सर्व समाजाप्रमाणे स्त्रियांची मनोवृत्ती एकोणिसाव्या शतकात गुंतून पडलेली असल्यामुळे, स्त्रिया लग्न व संसार हेच जीवनाचे इतिकर्तव्य मानतात; याचे अनेक परिणाम स्त्रीजीवनावर व सामाजिक परिवर्तनाच्या गतीवर होतात.' (पृ. १३८). "अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात आपला विचार अजूनही व्यक्तीचा नसून गटाचा आहे. एक मिळवता पुरुष; त्याची परावलंबी पत्नी व दोन अज्ञान मुले, असा तो काल्पनिक गट आहे." (पृ. १६०). "संसार करणे हे जीवनाचे उद्दिष्ट मानल्यामुळे लग्न हे मनूच्या काळाप्रमाणे स्त्रियांना आजही आवश्यक होऊन त्या अगतिक होतात." (पृ. १३८) इत्यादि मते लेखिकेने आवेशाने मांडलेली आहेत. लग्नसंस्था व कुटुंबसंस्था निकालात काढण्याची सूचना वरील मतावरून स्पष्टपणे मिळते. ही मते कोणत्या थरातील स्त्री जीवनाला उद्देशून आहेत? पुरेशा विवेचनाअभावी अशी मते अनाकलनीय होतात. अशा मतांची बारकाईने छाननी करून ती पुरेशी स्पष्ट करण्याचे किंवा निकालात काढण्याचे स्त्री चळवळीतील विचारवंतांनी मनावर घेतले पाहिजे. कारण अशा मांडणीतून स्वातंत्र्य व मुक्तीचा विचार बाजूला पडून अनेक वैचारिक प्रमाद घडून येण्याची शक्यता आहे. संसार करणे जीवनाचे उद्दिष्ट मानले नाही तरी गरज म्हणून आहेच. तसे मानले नाही तर जीवनाची शैली पारच बदलून जाईल. ती जीवनशैली कशी असेल, त्यासाठी कोणते संस्कार, कोणता मूल्यविवेक आवश्यक आहे; ह्याची मांडणी करण्यासाठी मोठ्या प्रतिभेची गरज आहे. या ग्रंथाचा तो आवाका नाही. लग्न हे मनूच्या काळाप्रमाणे आवश्यक होते म्हणजे काय? विवाहसंस्था तुटावी असे लेखिकेला अभिप्रेत असले तरी त्याची पर्यायी मांडणी त्या करीत नाहीत. कुटुंब व्यवस्थेबद्दलही त्यांचे मत प्रतिकूलच दिसून येते. भारतीय स्त्री जीवनावरील हजार संदर्भ गोळा केले म्हणजे एक परिपूर्ण विचार जन्माला येईल असे त्रैराशिक मांडणे अशास्त्रीय व अप्रत्ययकारी ठरेल. स्त्रीजीवनातील दुःखामुळे झालेला मनःक्षोभ अशा मतातून व्यक्त झालेला आहे एवढाच अर्थ त्यातून आपण काढला पाहिजे.

हे नकळत झाले असावे. कारण "स्त्री जीवनाच्या विचारात तथोक्त 'खालच्या' थरामधल्या स्त्रियाही समाविष्ट होतात ही समजूत आल्यावर विषयाचा विस्तार प्रचंड असल्याची जाणीव झाली" (पृ. पाच) असे लेखिकेने निवेदनाच्या सुरुवातीस प्रांजळपणे मान्य केले आहे. त्यामुळे प्रबंधाकरिता त्यांनी विविध-स्तरांतील आणि वर्गातील स्त्रीजीवनाच्या नोंदी घेतलेल्या असल्या तरी त्यांचे स्त्रीस्वातंत्र्यविषयक विचार व अभिप्राय तथोक्त 'वरच्या' थराला-उद्देशून व्यक्त झाल्यासारखे वाटतात. ग्रामीण भारतातील अगतिक, असहाय्य स्त्रियांच्या मुक्तिसाठी आजच्या परिस्थितीत त्यांची उपयुक्तता नाही कारण 'खालचा' थर हा स्त्रीमुक्तीच्या प्रबंधाचा विषय झाला असला तरी चिंतनाचा व्हायला अजून वेळ आहे. तशी एकूणच स्त्री स्वातंत्र्यासाठी अशा मतांची उपयुक्तता किती, याचा अधिक विचार शिबिरे, चर्चासत्रें, अभ्यास मंडळे यातून व्हायला पाहिजे.

औद्योगिक क्रांतीनंतरची अर्थव्यवस्थेतली स्थित्यंतरे व भारतीय स्त्रीजीवन यांचा यथार्थ अन्वय लावून स्त्रीस्वातंत्र्याचा शोध घेणे अधिक बिकट झालेले आहे. "औद्योगिकरण अधिक झपाट्याने करून समाजातील सुखसमृद्धी वाढवायची आहे." (पृ. २०४) हे लेखिकेचे मत अर्थव्यवस्थेवरील त्यांचे भाष्य समजून घेताना उपयोगी पडणारे आहे.

कारखानदारी व भांडवली उद्योग इंग्रजी राजवटीत देशात औद्योगिक क्रांतीनंतर सुरू झाले. त्याअगोदरची ग्रामीण उद्योगावर आधारलेली अर्थव्यवस्था इंग्रजांनी योजनापूर्वक मोडकळीस आणली. शेतीव्यवसायास पूरक असे हातमाग, तेलघाणी, सुतार–लोहारकाम, कशिदाकारी इ. उद्योग हळूहळू डबघाईस येऊन संपले. त्यातले कौशल्य लयाला गेले. त्यामुळे शेतीव्यवसायावरील अवलंबन वाढले. ठोक उत्पादन करणारे कारखाने शहरात सुरु झाले. किंवा कारखान्यांच्या आसपास शहरे विकसित झाली. शहरीकरणाची प्रक्रिया देशात वेगाने सुरू झाल्यानंतर उद्योगांच्या अभावी बेकार झालेली श्रमशक्ती खेड्यातून शहराकडे धावू लागली. त्यातूनच कारखानदारीला स्वस्तात श्रमशक्तीचा पुरवठा झाला. भांडवलाकडून श्रमशक्तीचे शोषण मोठ्या प्रमाणावर सुरू झाले ते आजतागायत चालूच आहे. म. गांधींनी चरख्याचे व ग्रामोद्योगांचे पुनरुज्जीवन करून ग्रामीण अर्थव्यवस्था सावरण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या अनुयायांना औद्योगिक क्रांतीचे वेड लागले होते. औद्योगिकरणास आवश्यक असलेल्या तंत्रविद्येसोबत विकास विषयक दृष्टीही आयात करण्यात आली. येथील प्रचंड श्रमशक्तीचा विचार न करता ठोक उत्पादन पद्धतीचा अवलंब करण्यात आला व बहुराष्ट्रीय कंपन्यांचे जाळे देशभर पसरले. स्वातंत्र्यानंतरही विकेन्द्रित उद्योगव्यवस्था व त्यासाठी उपयुक्त अशा तंत्र विद्येचा (appropriate technology) शोध घेण्याची गरज आजही राज्यकर्त्यांना वाटत नाही. आज देशाचे आर्थिक परावलंबन कमालीचे वाढले आहे व देशाची शहर व खेडे अशी आर्थिक फाळणी झालेली आहे. अर्थव्यवस्थेच्या स्थित्यंतराचे परिणाम समाज-जीवनावर झाले. समाजाच्या अपेक्षा आकांक्षा बदलल्या आहेत. दारिद्र्य व अज्ञानाचे दशावतार पाहिलेल्या खेड्यातील भारताच्या वाट्याला आलेली अधिक दुर्दशा आहे. शहराकडे वाट मिळत नाही म्हणून खेड्यात आपण अडकून आहोत असे वाटते. स्त्री वर्गाच्या वाट्याला आलेली दुर्दशा तर अवर्णनीय आहे. ग्रामीण माणसाच्या डोक्यात शहर पूर्णपणे भरलेले आहे तर शहरी माणसाच्या डोक्यात खेडे अजिबात नाही. शहरी विद्वानांचे अर्थशास्त्रीय, समाजशास्त्रीय, सांस्कृतिक सिद्धांत ऐकताना किंवा वाचताना ते खोटे व तकलादू आहेत असे प्रत्ययाला येते. शहरात राहणारा उच्चशिक्षित, उच्चवर्णीय नोकरीतला पांढरपेशा, विद्वान, विचारवंत, व्यावसायिक; व्यापारी व भांडवलदारांचा वर्ग तुलनेने मजेत आहे. कारण विकासाची बहुतांश फळे त्याच्याच पदरात पडली आहेत. आणि हा वर्ग खेड्यातल्या भारताच्या दुर्दशेविषयी बेपर्वा आहे.

खेड्यातील आठदहा मध्यम शेतकऱ्यांची घरे सोडली तर शेकडा नव्वद स्त्रिया मजुरी मिळविण्यासाठी कष्ट करतात. अर्थार्जनाचा उपदेश

स्त्रीमुक्तीसाठी केला जातो त्यावेळी ह्या ग्रामीण स्त्रियांचा विचार कितपत केला गेला आहे असा प्रश्न पडतो. '...पण खालच्या वर्गातील स्त्रिया आपला पगार नवऱ्याच्या हाती न देण्यात यशस्वी होतात. तेथे त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य खरे वाटते.' (पृ. १६०) अशा-सारखी विधाने त्यांच्याविषयी जेव्हा केल्या जातात तेव्हा स्वातंत्र्याबद्दलचे असे विचार तोकडेच नव्हे तर मलिन वाटू लागतात. कशीबशी मिळवलेली सारी मिळकत कुटुंबाच्या पोटात चार घास ढकलण्यासाठी व अंगावर दोन धड कपडे घ्यायला अपुरी पडते तिथे आर्थिक स्वातंत्र्याचा शोध लावण्यासाठी विद्वत्ताच लागते.

'स्त्रीच्या अर्थार्जनावर घेतले जाणारे आक्षेप फुसके लुटुपुटूचे आहेत.' (पृ. १४८) हे लेखिकेचे विधान खरे आहे. पण आक्षेपांच्या उत्तरादाखल केले गेलेले युक्तिवादही गमतीदार आहेत. असे थिल्लर आक्षेप व त्यांना दिलेली मासलेवाईक उत्तरे मुळातून वाचण्यासारखी आहेत. आपण केवळ आक्षेपाचा विचार इथे करू.

'स्त्रियांच्या नोकरीवर टीका करताना आपल्याला तिच्या घराची व मुलांची आठवण येऊन आपण भावनेने ओथंबून जातो. पण लक्षा-वधी स्त्रियांना राहाण्यास घरे नाहीत याचे भान आपल्याला उरत नाही...आणि ग्रामीण भागात तर घरांची उणीव शहराइतकीच आहे हेही आपल्याला माहित नसते. ज्या देशात शेकडा साठसत्तर लोकांना डोक्यावर छत्र देखील खऱ्या अर्थाने उपलब्ध नाही, तेथे आई कामाला गेल्याने 'घरापोरांची आबाळ होते.' हा घेतला जाणारा आक्षेप आपल्या अज्ञानाचे द्योतक मात्र आहे. (पृ. १४६-१४७) या युक्तिवादात युक्ती आहे. हे चटकन् लक्षात येत नाही. स्त्रियांच्या अर्थार्जनाचे सरळ सरळ समर्थन करता येण्यासारखे आहे. पण त्यासाठी देशातल्या शेकडा साठसत्तर लोकांच्या हलाखीचा आधार घेऊन युक्तिवाद करणे अज्ञानाचे द्योतक नाही. याला प्रखर बुद्धिवादाचे चातुर्य म्हणता येईल. खालच्या थरातील स्त्रिया आपला पगार नवऱ्याच्या हाती पडू न देण्यात यशस्वी होतात तिथे खऱ्या आर्थिक स्वातंत्र्याचे दर्शन घेणारी प्रतिभा शहरी आक्षेपांना शहरी थाटाची उत्तरे देताना फुलून आली तर ते समजूनच घेतले पाहिजे. खेड्यापाड्यात नव्वद टक्के स्त्रिया काबाडकष्ट करतात. पण अर्थार्जनाने स्त्री पुरुषी होते. असा आक्षेप तिथे कोणी घेत नाही. खेड्यातल्या दारिद्र्य व अज्ञानाच्या दाहक वाळ-वंटाची निर्जिव आकडेवारी उद्धृत करणारी विद्वत्ता शहरातील केळीचे बाग सुकल्याबद्दल बेचैन होते. यात दुटप्पीपणा आहे असा आरोप करणे बरोबर होणार नाही. सगळे प्रामाणिकपणे चालू आहे. 'भाषा' व 'संस्कृती' धारण करणाऱ्या विद्वत्तेची ही वर्गीय प्रकृती आहे. हे मात्र लक्षात घेतले पाहिजे.

पढिक शिक्षण व जगण्यातले शहाणपण यातला भेद कळला आणि स्त्री-पुरुषांचे हित कशात आहे हे उमजले तर शिक्षण व आर्थिक स्वावलंबन प्रत्यक्षात उतरविण्याचे अनेक प्रयोग स्त्री स्वातंत्र्याचा शोध घेण्यासाठी करता येण्यासारखे आहेत. वेगळे संस्कार झाल्याखेरीज केवळ अर्थार्जनाने माणसामध्ये मानवीमूल्ये विकसित झाल्याचे आढळून येत नाही.

वेश्यासंस्थेबद्दल ऐतिहासिक पार्श्वभूमी व वर्तमान वस्तुस्थितीचे सम्यक विवेचन केलेले आहे. वेश्याव्यवसाय स्त्रियांच्या अगतिक व असहाय्य स्थितीची परिसीमाच म्हणता येईल. 'वेश्या संस्था जिवंत असेपर्यंत स्त्रिया स्वतंत्र नाहीत किंवा त्या स्वतंत्र होऊही शकत नाहीत. कारण ही संस्था म्हणजे स्त्रीस्वातंत्र्याची अखंड होळी आहे." लेखिकेचे मत अत्यंत मार्मिक आहे.

'स्त्री आणि कुटुंबसंस्था' हे ग्रंथातील शेवटचे व महत्त्वाचे प्रकरण आहे. त्यातील विवेचने अभ्यासण्यासारखे आहे. लग्नसंस्था व कुटुंब-संस्थेबद्दल लेखिकेचे विचार प्रतिकूल आहेत. त्याविषयी अगोदर थोडक्यात चर्चा केली आहे. कुटुंबसंस्थेचा अधिक विचार या प्रकरणात केलेला दिसून येतो.

कुटुंब हे स्त्रीला कैद करणारे कारागृह आहे. स्त्रिया आजही वेठीच्या मजूर किंवा गुलाम असून त्या कुटुंबाच्या बंदीवान आहेत. सर्वसमाजाप्रमाणे स्त्रियांची मनोवृत्ती एकोणिसाव्या शतकात गुंतून

पडल्यामुळे स्त्रिया लग्न व संसार हे जीवनाचे इतिकर्तव्य मानतात. ह्या मतप्रणालीचे आग्रही प्रतिपादन, कुटुंबव्यवस्था तुटत असल्याचे स्वागत करण्यात दिसून येणारा उत्साह व कुटुंबव्यवस्थेला पर्याय शोधण्यासाठी विदेशात झालेल्या प्रयोगाबद्दल आकर्षण एकंदर विवेचनात दिसून येते. पण प्राप्त परिस्थितीत भारतात कुटुंबव्यवस्थेला पर्याय शोधण्याचे कार्य कठीण वाटत असल्यामुळे त्याऐवजी स्त्रीचे कुटुंबनिरपेक्ष अस्तित्व विकसित करण्यावर लेखिकेने अधिक भर दिला आहे.

कुटुंबसंस्थेत अनेक दोष निर्माण झालेले आहेत. ते दूर करून कुटुंबसंस्था अधिक संपन्न व उन्नत करण्याचे जाणिवपूर्वक प्रयत्न झाले पाहिजेत. तसे झाले तर कुटुंब स्वातंत्र्याचे व समतेचे संस्कार करणारी पाठशाळा बनू शकेल. कुटुंबसंस्थेने माणसाला ती निर्माण झाल्यापासून शतकानुशतके आधार दिला आहे हे विसरून त्यावर आघात करण्याची इच्छा बाळगणे कृतघ्नपणाचे ठरेल.

मातापुत्रांनी परस्परांना भोगापलिकडचे मानण्याचा संस्कार जेव्हा निर्माण झाला तेव्हाच माणूस पशूपासून वेगळा झाला. तेथून माणसाच्या मानवीकरणाची सुरुवात होऊन संस्कृतीचा उदय झाला व कुटुंबसंस्था निर्माण झाली. समाजाच्या 'वरच्या' व 'खालच्या' थरातील कुटुंबातून आजही बोलून उपदेश न करता, लैंगिक संबंधाबाबत जी शिस्त निर्माण झालेली. आढळून येते ती शिस्त निर्माण करणारा संस्कार करण्याचे सामर्थ्य मोडक्या स्थितीत आजही कुटुंबसंस्थेत आहे.

आज विज्ञानाच्या आडोश्याने विवाहबाह्य संबंध सैल झालेले आढळून येतात. पण अशा संबंधातून निर्माण झालेली जबाबदारी न स्वीकारल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. स्त्रीपुरुषांच्या कामजीवनाची व्यवस्था लावण्यात लग्नसंस्था व कुटुंबसंस्थेने आजवर उपकारक भूमिका पार पाडलेली आहे. कामप्रवृत्ती पाळीव करण्याचे काम ह्या संस्था निमूटपणे पार पाडत आल्या असून अशिक्षित साध्या भोळ्या मानवीसमाजाला अज्ञानी अवस्थेतही माणूस म्हणून जगायला मदत केली आहे. अनियंत्रित कामजीवनातून स्त्रीचे शोषण वाढेल यात शंका नाही. 'कुटुंबसंस्थेला घिरावे देवून जगण्यात येत आहे.' अशी थट्टा या ग्रंथात केली असली तरी या संस्थेची समाजहितासाठी कल्याणकारी गरज अजूनही आहे याचा उमज स्त्रीच्या विकासाची जबाबदारी स्वीकारलेल्या स्त्री विचारवंतांना पडेल अशी आशा बाळगायला हरकत नाही.

संयुक्तता (Jointness) हे भारतीय जीविकेतील मूलभूत मूल्यांपैकी एक प्रधानमूल्य आणि ते कुटुंबव्यवस्थेत गुंफून टाकलेले आहे. परस्पराकरिता जगणे व एकमेकांचे ऋणी राहून कृतज्ञता बाळगणे ही संयुक्ततेची अविभक्ततेची जाणीव मग ती पतीपत्नीतील असो, कुटुंबातली असो की एकूण समाजजीवनातली असो व्यक्तीला केवळ एक व्यक्ती म्हणून उरू न देता तिचे जीवनाच्या प्रत्येक पातळीवर समाजीकरण यथाशक्य करीत असते.

'कुटुंबसंस्थेची माणुसकीही उणावते आहे. ...स्त्रीचे विश्व तर आणखी संकोचले आहे. जावा नणंदांची व कित्येकदा तर शेजारीणबाई आजारी पडल्यास तिची मुले अंगावर पाजणारी बाई आता शोधून सापडणे कठीण आहे.' (पृ. २१३) माणुसकी जोपासण्याची कुटुंब व्यवस्थेची क्षमता औद्योगिकरणाचे समाजावर होणाऱ्या दुष्परिणामामुळे क्षीण होत चालली आहे. हे दुष्परिणाम टाळण्यासाठी 'कुटुंबसंस्थेला पर्याय शोधून स्त्रियांना व मुलांना समाजाच्या प्रवाहात सामावून घेतल्याने समाज एकजिनसी होईल.' (पृ. २२२) अशी वैचारिक प्रसाधनाच्या शैलीची विधाने प्रबंधाची शोभा वाढवीत असतात. भरमसाट गोळा झालेले तपशील, विज्ञान व व्यवहार यातील संतुलन राखून मांडणी न केल्यामुळे, ढिगाऱ्यासारखे पडून राहतात.

भारतीय स्त्रीचे समाजजीवनातील स्थान गौण आहे. स्वतःकडे पाहण्याची तिची स्वतःची दृष्टी नाही आरशासमोर उभी राहून स्वतःच्या प्रतिबिंबाकडे पुरुषाच्या दृष्टीतून पाहत असते. तिला स्वतःकडे पाहण्याची स्वतःची दृष्टी प्राप्त करून देणे स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीची दिशा असली

पाहिजे. आत्मप्रत्ययाची अशी दृष्टी प्राप्त झाली तरच ती आत्मसन्मानासाठी, सृजनशील संघर्षासाठी सिद्ध होईल व मानवी प्रतिष्ठा परत मिळवू शकेल. 'पुरुषाशी बरोबरी करण्याची' आजची चळवळी भूमिका म्हणजे पुरुषाच्या दृष्टीने स्वतःकडे पाहण्याची सवयच म्हटली पाहिजे. त्यातून 'पुरुष विरुद्ध स्त्री' असे द्वंद्व उभे झाले आहे. अशा द्वंद्वातून केवळ मूर्तिभंजनाचा हव्यास उत्पन्न होतो; रचनेचा विवेक व धीर सुटत जातो. आपल्या मुलुखातले ते सगळे त्याज्य व मुलुखावेगळे ते सगळे महान असे समजून स्वातंत्र्य व समतेचा अजाण वाचाळपणा करून आत्मभान येत नाही. स्वतःसाठी केलेल्या तडजोडी आणि जीवनातील संघर्षांशी केलेले व्यक्तिगत तह म्हणजे समाजपरिवर्तनाच्या वाटा नव्हेत. 'परिणत प्रत' व्यक्तींनीही नवनिर्माणाची दिशा शोधताना लोकगती व लोकमतीचे भान ठेवले तरच समाजाला काही मार्गदर्शन मिळू शकेल.

'समतेच्या चळवळीतील स्त्रियांना समता स्वातंत्र्याच्या जीवनाचे चित्र मात्र स्पष्ट झालेले नाही.' (पृ. २३५) अशी टीका केलेली असली तरी या ग्रंथातही या मूल्यांचा आशय स्पष्ट करण्याकडे दुर्लक्ष झालेले दिसते. तशी वैचारिक स्पष्टता नसल्यामुळे चळवळीत व व्यक्तिगत जीवनात लागावी ती शिस्त लागत नाही. स्वातंत्र्याच्या अपसमजाने वैचारिक पातळीवर बराच गोंधळ घातलेला आहे. समता बंधुता, मैत्री, करुणा ह्या मूल्यांवर अधिष्ठित असा विवेक निपजल्याशिवाय स्वातंत्र्य आणि मोकाटपणा यात फरक करणे अवघड जाते आणि केवळ स्वातंत्र्य हे मूल्य होऊ शकते काय असा प्रश्न पडावा अशी स्थिती 'निर्माण होते.' दररोज अनेक पातळ्यांवर जगत असताना आपल्याला स्वातंत्र्याचा शोध घ्यावा लागतो व ते मिळवावे लागते. अमर्याद स्वातंत्र्याच्या घोषणा फसव्या असतात. स्वातंत्र्याच्या मर्यादा कळल्या तरच ते मूल्य म्हणून दाखल होऊ शकते. स्त्रीमुक्तीसाठी लैंगिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे बहुधा स्वतःच्या आचरणाला सोयीचे असे सिद्धांत व तत्वज्ञान निर्माण करताना दिसतात. 'फ्रीसेक्स' मुद्यावर स्त्रीमुक्तीची चर्चा अडकून ठेवणाऱ्या 'कार्यकर्त्यां'ची संख्या मोठी नसली तरी त्यांचा उपद्रव फार आहे. या ग्रंथात नवनिर्माणाच्या चळवळींचा उल्लेख करताना वाखाणलेल्या एका संघटनेवर, उल्लेखित कार्यक्षेत्रात, 'स्त्रीपुरुष कार्यकर्त्यांनी सहजीवनाची घोषणा केल्याशिवाय एका पांघरुणात झोपू नये.' असा प्रस्ताव संमत करायची वेळ आली. पुढे त्या चळवळीची वाताहत होऊन सगळा कार्यक्रमच मागे पडला.

कोणतीही मूल्ये केवळ ती थोर आहेत म्हणून समाज स्वीकारीत नाही. ती मूल्ये जीवनात प्रतिबिंबित करण्याची धडपड करणाऱ्या व्यक्ती जोवर समाजासमोर उभ्या राहत नाहीत तोवर ती लोकजीवनात रुजत नाहीत. ग्रंथाच्या अखेरीस कार्यकर्त्यांसाठी उपदेशाच्या चार गोष्टी सांगितल्या आहेत. त्या अधिक तपशिलाने मांडल्या जाण्याची आवश्यकता आहे. ते काम इतर कुणीतरी करीत राहिले पाहिजे. हे काम एकट्या दुकट्या माणसाचे नाही हे लेखिकेने प्रकट केलेले मत खरे आहे.

स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीत पुरुषांचा सहभाग कसा कसा वाढेल याविषयी या ग्रंथांत फारसा विचार झालेला नसला तरी तो झाला पाहिजे. स्त्री व पुरुष यांनी परस्परासमोर प्रतिस्पर्धी म्हणून उभे ठाकणे स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीला अपेक्षित नसावे. प्रसंगी स्त्रीला पुरुषाशी संघर्ष करावा लागेलही पण त्याची तात्विक भूमिका उन्नत सहयोगाची असायला हवी. स्त्री व पुरुष यांच्यात समता असल्याशिवाय एकता निर्माण होऊ शकत नाही या विचाराने समाजमनात मूळ धरले पाहिजे. स्त्रीला मानवी प्रतिष्ठा प्राप्त झाल्याशिवाय पुरुषाचे 'माणूसपण' अपुरे आहे हे पुरुषांना कळले पाहिजे. जोवर स्त्रियांना त्यांचे उच्चतम जीवन जगण्यापासून परावृत्त केले जाईल तोवर पुरुषांना अभिप्रेत असलेला परमपुरुषार्थ ते कधीही प्राप्त करू शकणार नाही. या सत्याचा बोध प्रथम आम्हाला झाला, तरच समाजाचे प्रबोधन करण्याचे काही साधन हाती लागण्याचा संभव आहे. मानवी गुणांच्या अपेक्षेने स्त्री पुरुष

दोघेही अविकसित व अप्रगल्भ आहेत. पुरुषांनी स्त्रियांचा जेवढा छळ केला तेवढाच स्त्रियांनी स्त्रियांचा केला आहे असे आढळून येते. म्हणून दोघांचीही मानसिकता बदलली पाहिजे. समतेचे तत्त्व समजून ते व्यक्तिगत, कौटुंबिक व सामाजिक जीवनात उतरविण्याची समज व प्रवृत्ती कशी निर्माण होईल याचा अधिक विचार होण्याची गरज आहे. मानवी संबंध शरीर, मन व बुद्धीच्या-स्तरावर संतुलित कसे होतील याचा शोध घेतला पाहिजे. मानसिक पातळीवर ते प्रेमपूर्ण व मैत्रीचे व बौद्धिक पातळीवर ते विवेकपूर्ण झाले तर शारीरिक स्तरावर ते निरामय व सक्षम होण्यासाठी उपाय सहज सापडतील. मानवी मूल्ये जीवनात मूळ धरू लागली तर मानवी हक्क व कर्तव्ये या विषयीचे भान अधिक विवेकपूर्ण होईल. त्यासाठी जीवनात छोटे छोटे प्रयोग सतत झाले तर अधिक संपन्न जीवनाची शैली आकार घेऊ लागेल. याविषयी ग्रंथांतील विवेचन सुटे व अपुरे आहे. औद्योगिकरण झपाट्याने करून आपल्याला सुखसमृद्धी वाढवायची आहे अशी आकांक्षा बाळगून स्वातंत्र्य व समतेचा आशय स्पष्ट झाला तर त्याला मर्यादा पडतीलच.

या ग्रंथातील ज्या मतांचा पगडा सर्व विवेचनावर आहे किंबहुना विवेचनाचे जे मुख्यसूत्र आहे त्याविषयी थोडक्यात विचार येथे केला. आरोपप्रत्यारोपाच्या भानगडीत न पडता स्त्री मुक्तीचा विचार करताना त्यात दोष राहू नये याचा आग्रह असला पाहिजे. कारण दोषांचे दुष्परिणाम आजतरी स्त्रीच्याच वाट्याला येतील म्हणून दक्ष असायला हवे. अनेक महत्त्वाच्या मुद्यांचा व घटनांचा विचार या ग्रंथात केला आहे त्यांचा वाचकांनी विचार करावा. मात्र त्यावरचे अनेक निष्कर्ष वेताचे उतरले आहेत ते तपासून घ्यावेत, असे या प्रबंधाबद्दल आदर बाळगूनही सुचवावेसे वाटते. स्वातंत्र्य व समतेचा पुकारा करीत उघडझाप पद्धतीने आकलन करून काढलेले निष्कर्ष मांडण्याची सवय विचार प्रक्रियेची हानी करणारी ठरू शकते, असे अनेक संघटनांच्या प्रबोधन प्रक्रिया जवळून पाहिल्यास आढळून येते. आयुर्वेदाचार्य चरकाने 'प्रज्ञापराध' असा शब्द योजिला आहे. प्रज्ञेच्या पातळीवर जे अपराध घडतात त्याचे परिणाम पिढ्यान् पिढ्या समाजाला भोगावे लागतात. स्त्री मुक्तीच्या वैचारिक मांडणीत 'प्रज्ञापराध' घडू नयेत याची दक्षता त्याचे परिणाम स्त्री-जीवनाच्या वाट्याला येऊ नये म्हणून घेणे ही विचारवंतांनी आपली जबाबदारी मानली पाहिजे.

■

भारतीय स्त्री जीवन
गीता साने
मौज प्रकाशन.
पृ. कि. रु.

होमिओपाथिक औषधांचा लक्षण–भावना कोश

डॉ. सुनील पारसे

ॲलोपॅथी किंवा आधुनिक वैद्यकशास्त्राचा वरचष्मा असलेल्या आपल्या देशात होमिओपॅथी म्हणजेच समोपचारपद्धतीने आज पर्यायी चिकित्सापद्धती म्हणून कां होईना पण आपले एक विशिष्ट स्थान निर्माण केले आहे हे निर्विवाद आहे.

दोनशे वर्षांपूर्वी जर्मनीत जन्माला झालेल्या ह्या चिकित्सा–पद्धतीची मुळे आज भारतात खोलवर रुजली आहेत. तरी ह्या शास्त्राच्या वैज्ञानिक तत्वाबद्दल जनमानसात प्रचलित असलेल्या काही गैरसमजुती अजूनही कायम आहेत. ह्याचे एक प्रमुख कारण म्हणजे, ह्या चिकित्सा-पद्धतीचे शास्त्रीय विवेचन करणाऱ्या स्वभाषेतील दर्जेदार ग्रंथांचा तुटवडा. इंग्रजी भाषेत उपलब्ध असलेल्या अमाप साहित्याचे, त्यातील वैद्यकीय शब्दांच्या क्लिष्टतेमुळे, सांगोपांग अध्ययन करणे सर्वांना शक्य होत नाही. प्रस्तुत ग्रंथाच्या स्वभाषेतील उपलब्धतेमुळे ही अडचण बहुतांशी दूर झाली आहे.

होमिओपॅथी चिकित्सापद्धतीच्या यशाचे गमक म्हणजे चिकित्सकाची निरीक्षणशक्ती होय.

अनुक्रमणिका

आधुनिक वैद्यकशास्त्रात वर्णिलेल्या एकाच (Diagnosis) रोगसंज्ञेने ग्रस्त असलेले अनेक रोगी, रोगाचे निदान एकच असूनसुद्धा, एकमेकांपासून भिन्न असतात आणि ह्या भिन्नतेतच, त्या रोग्याचे व्यक्तिवैशिष्टच समावलेले असते. उदाहरणच द्यायचे झाले तर, 'ज्वरा'च्य अवस्थेत काही रोगी अस्वस्थ, काही सुस्त, काही चिडखोर, काही बुजीर, काही संशयी कां होतात ? साधारणपणे ज्वरात तहान जास्त असते. मग एखाद्या रुग्णाला अजिबात पाणी पिण्याची इच्छा कां होत नाही ? ज्वरात साधारणपणे खाण्याची इच्छा नसते. पण एखादा रुग्ण ज्वरात सतत खायला कां मागतो ? कुणाला मोकळी वा किंवा पंखा हवा असतो तर कुणाला थोडी सुद्धा हवा सहन होत नाही. कुणाचे दुखणे काही विशिष्ट अवस्थेत किंवा हवामानात कमी होते तर कुणाचे जास्त होते. अशी अनेक चिन्हे आशुकारी आणि चिरकालीन रोगांमध्ये निरनिराळ्या रुग्णात आपणाला दिसून येतात, आणि हीच त्या रुग्णांची वैशिष्टचपूर्ण लक्षणे असतात. ह्यातील बहुतांशी चिन्हांबद्दल असे कां ? हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

होमिओपॅथीक औषधयोजना करताना रुग्णाच्या ह्याच रोगचिन्हसमूहाचा योग्य औषध निवडण्यासाठी उपयोग केला जातो आणि ह्या वैशिष्टचपूर्ण चिन्हांना सर्वात वरचा दर्जा देण्यात येतो. केवळ मटेरीया मेडिका म्हणजे औषधी निघंटूच्या अभ्यासाने ह्या वैशिष्टचपूर्ण चिन्हांच्या दर्जाचा तुलनात्मक अभ्यास कुणालाही साध्य होत नाही. त्यासाठी 'रेपरटरी' म्हणजे योजनाकोशाची गरज असते.

'रेपरटरी' हा शब्द मूळ लॅटीन भाषेतून आला असून त्याचा अर्थ 'वस्तू पुन्हा सापडण्याकरिता ठेवलेली जागा.'

निरोगी व्यक्तीवर केलेल्या होमिओपॅथीक औषधांच्या सिद्धिकरणांच्या वेळेला त्या त्या औषधांनी निर्माण केलेली सर्व मानसिक आणि शारीरिक चिन्हे त्यांच्या दर्जासकट, एका विशिष्ट क्रमाने संग्रथित केली जातात. 'भावना कोश' हा असाच लक्षणसमुहांचा क्रमिक संग्रह आहे.

डॉ. शं. र. फाटक ह्यांचे इंग्रजी भाषेतील "ए कन्साइस रेपरटरी ऑफ होमिओपॅथिक मेडिसिनस्' (१९६३) आणि 'मटेरिया मेडीका ऑफ होमिपॅथिक मेडिसिनस्' (१९७७) हे ग्रंथ मान्यता पावले आहेतच. पण मूळ इंग्रजी ग्रंथातील लक्षण-चिन्हांसाठी नेमकी पर्यायी मराठी शब्दयोजना करणे हे अतिशय जिकरीचे काम ग्रंथकर्त्यांनी त्यांच्या तीस वर्षांच्या प्रदीर्घ समोपचार-चिकित्सेच्या अनुभवाने साध्य करून, त्यांच्या स्वतःच्या अनुभवानी ह्या भावनाकोशात औषधांच्या सूचित भर टाकल्यामुळे ह्या ग्रंथाची मौलिकता अधिकच वाढली आहे.

होमिओपॅथीच्या अभ्यासकांनी आणि जिज्ञासूंनी हा ग्रंथ अध्ययनार्थ जरुर संग्रही ठेवावा.

■

भावना कोश / डॉ. शं. र. फाटक
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई
पृ. ५६५ / कि. रु. ४० /-

इस्रायल : युद्ध, युद्ध आणि युद्धच

अनिअ सांवरे

निराशेच्या जागतिक अंधारातूनही एखादा राष्ट्रसूर्य कसा उदयाला येऊ शकतो आणि प्रबळ राष्ट्रनिष्ठेने भारलेली सामान्य माणसेही त्या संदर्भात काय विलक्षण चमत्कार घडवू शकतात याचा साद्यंत आढावा घेणे आणि तो वाचणे हा एक सुखद अनुभव आहे. आधुनिक इतिहासाचे समर्थपणे दर्शन घडवणारे मराठीतील ख्यातनाम साहित्यिक श्री. वि. ग. कानिटकर यांनी आपल्या 'इस्रायल : युद्ध, युद्ध आणि युद्धच,' या ताज्या पुस्तकातूनच तोच अनुभव वाचकांना पुन्हा एकदा दिला आहे.

इस्लामी धर्मांध आक्रमणांच्या लाटांचा सतत ४० वर्षे इस्रायलने यशस्वी मुकाबला केला त्याची समग्र ओळख आपल्या वाचकांना करून देणे हा तर या पुस्तकामागील प्राथमिक हेतू आहेच. हा

झगडा राष्ट्रांराष्ट्रांमधील नसून दोन परस्पर विरोधी मनोवृत्तीमधील आहे. धर्मनिष्ठ पण विज्ञानाभिमुख आणि धर्मसहिष्णू असा ज्यू समाज आणि धर्मांध व इतर धर्मियांसोबतचे सहजीवन सहन न होणारे मुसलमान समाज यांच्यातील हा झगडा आहे. फळणीनंतरच्या भारतात ही मनाची सर्व कवाडे बंद करून, आधुनिकतेकडे पाठ फिरवून बसलेल्या प्रचंड संख्येतील मुसलमान समाजाची शोकांतिका देशावर पुन्हा परिणाम करणार अशी चिन्हे दिसू लागली आहेत. अशा परिस्थितीत या दोन मनोवृत्तीतील झगड्याचे दर्शन आपल्या समाजाला घडवणे व त्यातून त्यांनी योग्य बोध घेणे लेखकाला आवश्यक वाटते व त्यासाठीच लेखन प्रपंच केल्याचे लेखकाने प्रस्तावनेत स्पष्ट केले आहे.

मध्यपूर्व भागाची अशांतता हा जागतिक तणावाचा विषय आहे आणि मध्यपूर्व भागाच्या अशांततेचा प्रश्न 'इस्त्रालय' या नव्या आणि चिमुकल्या देशापासून वेगळा केलाच जाऊ शकत नाही. दोन हजार वर्षापूर्वी ज्यु समाजाला आपली भूमी सोडून परांगदा व्हावे लागले आणि त्यांनी पुढील वर्षी जेरुसलेममध्ये असेन अशी शपथ घेऊन ते स्वप्न पिढ्यांपिढ्यातून जिवंत ठेवण्याचे ठरवले. त्या क्षणीच आजच्या या मध्यपूर्व भागातील अशांततेच्या समस्येची बिजे रुजली गेली. एका अमूर्त राष्ट्र समुदाय भावने इतक्या प्रचंड काळानंतर साकार रूप धारण केले हा मानवी इतिहासातील एक विस्मयकारक चमत्कार आहे. आणि तो अवश्य सविस्तर वाचता येईल असा आहे. लिआँन उरीसचा 'एक्झोडस्'ही या संपूर्ण कालखंडाचे जिवंत चित्रण करणारी उत्तम कादंबरी आहे. कानेटकरांनी आपल्या पुस्तकात इस्रायलनिर्मितीचा प्रारंभीचा इतिहास थोडक्यात दिला असला तरी प्रामुख्याने त्यांनी आपले क्षेत्र इस्रायलला निर्मितीनंतर करावा लागलेला संघर्ष त्याची कारणे त्याचे अरब जगात पडलेले पडसाद, या ४० वर्षाच्या कालखंडातील प्रमुख घटनांचा आढावा आणि प्रमुख नेते ज्यांनी या परिस्थितीला घडवले आणि ज्यांना या परिस्थितील घडवले आणि ज्यांना या परिस्थितीने घडवले त्यांच्या पुरते मर्यादित ठेवले आहे. महाशक्तीच्या राजकारणाचा प्रादेशिक व्यूह युद्धावर पडणारा प्रभाव आणि कणखर नेतृत्व आणि उत्तुंग सामूहिक विजिगिषु मनोवृत्ती यामुळे लहान देशही मोठ्या मित्र देशापासून मदत घेऊनही स्वतःचे स्वातंत्र्य व व्यक्तिमत्व कसे अभंग राखू शकते याचेही उत्तम दर्शन नेमक्या प्रसंगातून घडवण्यात कानेटकर नेहमी प्रमाणे यशस्वी झाले आहेत.

अरबांच्या मनोवृत्तीला साजेसे उत्तर इस्रायलने दिल्यामुळेच इस्रायल टिकू शकले, वाढू शकले. नाही तर इतक्या शत्रुत्वपूर्ण वातावरणात एकप्रकारे चारी बाजूंनी शत्रुत्वभावनेचा जनसागर असतांना आणि प्राकृतिक स्थिती अतिशय प्रतिकूल असताना एक उत्तम संपूर्ण समाजनिर्मितीचे कार्य किती कठीण आहे हे वेगळे सांगायला नकोच- दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या अनेक विकसनशील देशांना नवनिर्मितीसाठी जडणघडणीसाठी इस्रायलच्या परिश्रमाचा आणि निष्ठेचा किंवा गिरवता आला असता. आणि असे झाले असते तर ठिकठिकाणी वेगळे चांगले चित्र दिसले असते. परंतु दुर्दैवाने तसे घडले नाही. आणि म्हणूनच अशा प्रकारच्या इतिहासलेखनाची आणि अभ्यासलेखनाची आवश्यकता असते. परंतु हे लिखाण जर मनोरंजक, आणि सोप्या भाषेत मांडले गेले तरच ते जनसामान्यापर्यंत पोहचते व कानेटकर यांनी नेहमी हेच केले आहे, त्यामुळे ते अतिशय वाचनीय झाले आहे. या विषयात रस असणाऱ्यांना तर ते नितांत आवडलेच परंतु बाकीच्यांना हे पुस्तक वाचून यात रस निर्माण होईल इतकी ताकद यात नक्कीच आहे.

या पुस्तकाच्या लेखनाची सुरवात आधी 'माणूस'मध्ये आणि नंतर 'प्रपंच' मासिकातून झाली नंतर पूर्वप्रसिद्ध लेखांचे आवश्यक ते पुनर्लेखन आणि संस्कार करून ४६९ पानांचे हे पुस्तक श्रीविद्या प्रकाशनाने प्रसिद्ध केले आहे. कि. १२५ रु. फक्त.

■

संगीत संत कान्होपात्रा

आशा सावदेकर

नुकत्याच बालगंधर्व जन्मशताब्दी निमित्त झालेल्या नाटयस्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झालेल्या 'संगीत संत कान्होपात्रा 'चा प्रयोग पाहिला. त्या नाटकाचा पहिला प्रयोग ३ मार्च १९०८ रोजी गुरुवारी रात्री ९ वाजता ठाणे येथे गडकरी रंगायतन मध्ये झाला होता.

संगीत नाटक आणि तेही केवळ बालगंधर्वांच्या भूमिकेने गाजलेले ! आजच्या काळात ज्याचे पुस्तकही सहज उपलब्ध होऊ नये असे हे नाटक नव्या संचात, आधुनिक प्रेक्षकांसमोर सादर करण्याचे आव्हानच नागपूर केंद्राने स्वीकारले आणि पूर्णपणे पेलून दाखविले.

संगीत कान्होपात्राचा प्रयोग देखणा होता. त्यात अशोक मगरकर यांचे नेपथ्य व प्रकाशयोजना, जयंत इंदूरकरांच्या खडया आवाजामुळे रंगणारी चोखोबाची भजने, शामला अमरावतकरच्या आवाजाची माधुरी आणि रागिणी खंडकर व डॉ. सुनील पारसे यांचा सुंदर अभिनय या जमेच्या बाजू आहेत.

या नाटकातील खरा संघर्ष हा भावनेच्या पातळीवरचा आहे. कान्होपात्रा ही नायकिणीची मुलगी. विलास, सुखोपभोग यांच्याच सहवासात ती वाढलेली. परंतु तिचे ज्याच्यावर प्रेम आहे त्याच्याशी तिचे मीलन होऊ शकत नाही आणि दुःखाच्या कडेलोटाच्या क्षणी तिचे मन चोखोबांच्या उपदेशामुळे ईशचरणी धाव घेते. तरीही कथानकात आनंदराव हे खलपात्र आहे. कान्होपात्रेच्या नादी मालकाला लावून त्याच्या पत्नीवर डोळा ठेवणारा, आपल्या काळ्या कृत्यांनी बादशहाकडून जहागीर मिळविणारा आनंदराव कान्होपात्रेला पकडून बादशहाला नजर करायला निघतो. शेवटच्या क्षणी कान्होपात्रा पांडुरंगदर्शनाची परवानगी मागते आणि पांडुरंगाच्या चरणी आपल्या नश्वर शरीराचा त्याग करते. भोगी जीवनाकडून भक्तीकडे झालेला कान्होपात्रेचा प्रवास हे नाटकाचे प्रमुख सूत्र आहे. त्याभोवती वावरणारी अनेक पात्रे आहेत. कान्होपात्रेच्या देहसौंदर्यावर पैसा मिळवू पाहणारी पण तिच्या दुःखाने व्याकुळ होणारी तिची आई शामाबाई, विलासचंदाची अनुपम सौंदर्यवती आणि आपल्या प्रेमाने पतीला जिंकण्याची धडपड करणारी पत्नी शीलवती, कान्होपात्रेच्या निर्मळ मनाचे दर्शन घडल्यामुळे तिच्या उद्धारासाठी तळमळणारा चोखोबा. ही सगळीच पात्रे ठसठशीत आहेत. संपूर्ण नाटकात अभिनय आणि संगीत यांचा चांगला समतोल राखल्या गेलेला आहे. नाटकातील शेवंती, फुलवंती, झेंडू ही दुय्यम पात्रेही चांगली उभी केली गेली आहेत. कान्होपात्रेच्या आईची, पैशावर प्रेम करणाऱ्या नायकिणीची भूमिका श्रद्धा तेलंग यांनी फारच चांगली उभी केलेली आहे. आपल्या पतीवर प्रेम करणारी, तो आपल्यावर प्रेम न करता कान्होपात्रेकडे धाव घेतो आहे म्हणून व्याकुळ होणारी, पण वेळ येताच चुकीच्या मार्गावर जाणाऱ्या पतीला आपल्या तडफदार वागण्या बोलण्याने मागे फिरवणारी शीलवती रागिणी खंडकरने आपल्या अभिनयातून जिवंत केलेली आहे.

लोभी, कपटी आणि स्वार्थी आनंदरावाची भूमिका डॉ. सुनील पारसे यांनी दमदारपणे उभी केलेली आहे. बाकी कलावंत प्रज्ञा भोंडे, नंदकिशोर कावळे, पराग लुले, मंजुषा अगस्ती, विकास देव यांनीही आपली कामे समजून केलेली आहेत.

दिग्दर्शिका अनुराधा जोशी व संगीत दिग्दर्शक प्रभाकर देशकर दोघांनीही संगीत व अभिनयाचे दोन ध्रुव समर्थपणे सांभाळलेले आहेत. संगीतातील ऑर्गनची साथ सांभाळली आहे विनायक वालधुरकर यांनी तर तबल्याची साथ दीपक फडणीस यांनी केलेली आहे. अशोक मगरकर यांनी उभे केलेले जंगलाचे व विठ्ठल मंदिराचे दृश्य तर अप्रतिम वाटले !

दृक्-श्राव्य

चोखोबा आणि कान्होपात्रा यांच्या पदांनी रसिकांना डोलायला लावले. चोखोबाला तसा फारसा वाव नाटकात नाही. पण शामला अमरावतकरच्या रूपाला व संगीताला अधिक समर्थ अभिनयाची जोड मिळाली तर संगीत रंगभूमीला एक चांगली अभिनेत्री मिळेल यात संशय नाही !

हे नाटक पाहणे हा आनंद होता. चांगले नेपथ्य, दमदार अभिनय, उत्तम संगीत आणि संपूर्ण नाटकाला वेढून असणारे व नाटकात पदोपदी जाणवणारे उत्तम दिग्दर्शन यांचा सहजसंगम या नाटकात होता. रंगमंचावर दिंडी येते. तेव्हाचे दृश्य आणि कान्होपात्रा व पांडुरंग यांचा मंदिरातील पदांमधून चालणारा भावसंवाद यावेळची प्रकाश योजनाही अप्रतिम होती. एक कसदार व दमदार देखणा प्रयोग असेच वर्णन या नाटचप्रयोगाचे करावे लागेल. ■

निवेदन

मराठीतील एक थोर साहित्यिक श्री. जी. ए. कुलकर्णी यांच्या साहित्यावर असंख्य वाचकांनी नितांत प्रेम केले. जी. ए. कुलकर्णी यांच्या साहित्याचा अभ्यास करणाऱ्या आणि करू इच्छिणाऱ्या अनेकांना जी. एं. च्या पत्रांमुळे त्यांच्या साहित्याचे आकलन अधिक चांगले होऊ शकेल असे वाटते. यासाठी जी. एं. नी आपल्या सुहृदांना लिहिलेली पत्रे उपलब्ध झाली पाहिजेत अशी इच्छा या अनेक अभ्यासकांनी जाहीररीत्या व खाजगीरीत्याही व्यक्त केली. त्यांच्या साहित्याच्या अभ्यासासाठी त्यांची पत्रे उपलब्ध होणे आवश्यक आहे असे आम्हालाही वाटते. ज्या मित्रांशी जी. एं. चा पत्रव्यवहार असे, त्या काही मित्रांची आम्हाला माहिती आहे. परंतु आम्हाला ठाऊक नसलेल्या काही व्यक्तींना जी. एं. नी पत्रे लिहिली असणारच. ही सर्व पत्रे एकत्र करण्याचे आम्ही ठरविले आहे. या कामासाठी आम्ही पाचजण एकत्रित आलो आहोत. पत्रे मिळाल्यानंतर ती ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्याचे ठरल्यास या उपक्रमातून आम्ही कोणीची, वा या पत्राचे प्रकाशक, कोणताही आर्थिक लाभ घेणार नाही. ज्यांच्याकडे जी. ए. कुलकर्णी यांची पत्र असतील त्यांनी त्या पत्राच्या झेरॉक्स प्रती आमच्याकडे १५ सप्टेंबर १९८८ पर्यंत पाठवाव्यात ही विनंती.

पत्रे पाठविण्याचा पत्ता : श्री. पु. ल. देशपांडे, रूपाली, ७७७ शिवाजीनगर, पुणे–४११००४.

श्री. पु. ल. देशपांडे, श्री. श्री. पु. भागवत, श्री. म. द. हातकणंगलेकर, श्री. रामदास भटकळ, श्री. ग. प्र. प्रधान.

वर्तमान
वर्तमान
वर्तमान
वर्तमान
वर्तमान
वर्तमान
वर्तमान

'स्वामी' या कादंबरीने मराठी साहित्यक्षेत्रात ऐतिहासिक कादंबरीलेखनाचे नवे युग निर्माण करणारे प्रसिद्ध साहित्यिक श्री. रणजित देसाई यांच्या वयाला ८ एप्रिल रोजी ६० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त अनेक ठिकाणी त्यांचे सत्कार झाले.

■

ज्ञानेश्वर नाडकर्णी यांच्या 'प्रस्थान' या कथासंग्रहाचे प्रकाशन शांताराम यांच्या हस्ते २२मे रोजी मुंबईत झाले.

■

२७ मे ला पुणे येथे महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वर्धापन दिनी उत्कृष्ट साहित्य सेवेबद्दल परिषदेतर्फे गं. दे. खानोलकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक वा. भा. पाठक यांना ना. ग. गोरे यांच्या हस्ते कृतज्ञता-निधी देण्यात आला.

■

'रङ्गनायक' या अरविंद देशपांडे स्मृतिग्रंथाचे प्रकाशन १ जूनला श्री. दामू केंकरे यांच्या हस्ते झाले.

□

प्रसिद्ध गीतकार वसंत निनावे यांचे १० जून रोजी मुंबईत निधन झाले.

□

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या त्रैवार्षिक निवडणुकीत कार्याध्यक्षपदी राजेंद्र बनहट्टी यांची फेरनिवड झाली. कोषाध्यक्षपदी म. श्री. दीक्षित निवडून आले.

□

२४ जूनला अमरावती येथे बालगंधर्व जन्मशताब्दी वर्षाच्या समारोपाचा कार्यक्रम झाला. विद्याधर गोखले यांचे यावेळी प्रमुख भाषण झाले. शासनातर्फे सांस्कृतिक कार्यमंत्री ना. राम मेघे हे उपस्थित होते.

□

मनोहर वि. गोखले यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन जूनमध्ये साहित्य संघात झाले. न्या. हिदायतुल्ला यांचे चरित्र' आणि 'न्यायालयीन कथा' ही त्यांची दोन पुस्तके नागपूर प्रकाशनने प्रकाशित केली आहेत.

□

कै. शंकरराव दाणी यांच्या 'मनतरंग' कवितासंग्रहाचे प्रकाशन जूनमध्ये नागपुरात झाले.

■

विदर्भ साहित्य संघ नागपूर

केन्द्रीय कार्यवृत्त / दि. १ एप्रिल ते ३० जून १९८८

दि. ७ एप्रिल : श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे सुप्रसिद्ध कवी कै. राजाभाऊ व ढेयांच्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवार दि. ७ एप्रिल ८८ रोजी सकाळी ९ वाजता त्यांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अक्षयकुमार काळे उपस्थित होते.

दि. १० एप्रिल वि. सा. संघातर्फे कै. डॉ. केतकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला हार अर्पण करण्यात आला.

दि. ३० एप्रिल : बालकवींच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला वि. सा. संघातर्फे हार घालून अभिवादन करण्यात आले.

दि. १ मे कै. नाना जोग यांच्या स्मृतिदिनानिमित्त वि. सा. संघातर्फे त्यांच्या पुतळ्यास हार घालन त्यांना अभिवादन करण्यात आले.

दि. ८ मे : वि. सा. संघांचे पूर्वाध्यक्ष कै. आ. रा. देशपांडे (अनिल) यांचे स्मृतिदिनानिमित्त त्यांचे प्रतिमेस हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

दि. ९ मे : रविंद्रनाथ टागोर यांचे जयंती निमित्त त्यांचे प्रतिमेस हार घालून अभिवादन करण्यात आले.

दि. १० मे : श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

दि. १३ मे : वि. सा. संघाच्या संगीत समिती तर्फे बालगंधर्व जन्मशताब्दि निमित्त दि. १३ मे ८८ रोजी टिळक सभागृहात सायंकाळी ७–३० वाजता बेळगावच्या सुप्रसिद्ध संगीतज्ञ सौ. दीपा कार्लेकर यांचे गंधर्व गायकीचे मर्म सप्रयोग उकलून दाखविणाऱ्या भाषणाचा कार्यक्रम आयोजित-केला होता. नागपूर रसिकांनी त्यास उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमाचे अध्यक्षपदी प्रा. राम शेवाळकर होते तर कार्यक्रमाचे संचालन संगीत समितीचे आमंत्रक श्री. प्रदिप मुन्शी यांनी केले.

दि. २६ मे : कै. राम गणेश गडकरी यांचे स्मृतिदिनानिमित्त त्यांचे प्रतिमेस हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

दि. ७ जून : नागपुरात ४० वर्षांपूर्वी प्रसिद्ध होत असलेल्या कै. मावकर संपादित 'सावधान' (मराठी साप्तहिक) चा संच विदर्भ साहित्य संघात श्री. गिऱ्हेबंधू यांचे तर्फे भेट देण्यात आला. व तो प्राचार्य राम शेवाळकर यांनी स्वीकारला.

दि. ११ जून : कै. साने गुरुजी यांचे स्मृतिदिनानिमित्त त्यांचे प्रतिमेस हार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

दि. १३ जुन : कै. आचार्य अत्रे यांचे स्मृतिदिनानिमित्त त्यांचे प्रतिमेस हार घालून अभिवादन करण्यात आले.

दि. १५ जून : वि. सा. संघ व जयश्री प्रकाशन यांचे संयुक्त विद्यमाने श्रीमती प्रमिला भागवत यांच्या फुलवंती भाग १ व २ या बालगीत संग्रहाचा प्रकाशन समारंभ बुधवार दि. १५ जून ८८ रोजी डॉ. वसंतराव वऱ्हाडपांडे यांचे अध्यक्षतेखाली श्रीमती मनोरमाबाई दाते संचालिका शिशु विहार, यांचे हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी श्री. कमलाकर धारप व सौ. जयश्री रुईकर यांची भाषणे झाली. संचालन श्रीमती नलिनी दाणी यांनी केले.

याचदिवशी कै. अच्युतराव कोल्हटकर यांचे स्मृतिदिनानिमित्त त्यांचे प्रतिमेस हार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

दि. २२ जून : शासकीय गडकरी स्मारक समिती, नागपूर यांचे मदतीकरिता वि. सा. संघाने संगीत कान्होपात्रा या नाटकाचा प्रयोग काहीही मानधन न स्वीकारता सादर केला. या प्रयोगाद्वारे समितीने गडकरी स्मारकाकरिता रु. १ लाख १२ हजाराचा निधी जमा केला. या करिता आमदार श्री. रणजित देशमुख व नागपूरचे जिल्हाध्यक्ष श्री. हरनामसिंग यांनी विशेष परिश्रम घेतले.

दि. २३ जून : दक्षिणमध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर तर्फे बालगंधर्व जन्मशताब्दि समापन समारोहाअंतर्गत संगीत कान्होपात्राचा प्रयोग धनवटे रंगमंदिरात सादर केला. सर्वच कलाकारांनी अतिशय उत्कृष्ट कामे केली व प्रयोगाने रसिकांचे समाधान झाले.

दि. २४ जून : अमरावती येथे : महाराष्ट्र बालगंधर्व जन्मशताब्दि समिती तर्फे आयोजित समारंभात संगीत कान्होपात्रा या नाटकातील गायक कलावंतांनी नांदी म्हणून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. नंतर अखिल भारतीय नाट्यपरिषदेचे अध्यक्ष श्री. चित्तरंजन कोल्हटकर यांचे हस्ते पारितोषिक वितरण झाले. त्यात वि. सा. संघाने सादर केलेल्या संगीत कान्होपात्रा नाटकातील खालील कलाकारांनी पारितोषिके स्वीकारली (१) सौ. अनुराधा जोशी (दिग्दर्शन) (२) श्री. मनोहर म्हैसाळकर निर्मिती) (३) श्री. अशोक मगरकर (नेपथ्य) (४) श्री. प्रभाकरराव देशकर (संगीत दिग्दर्शन) (५) कु. श्यामला अमरावतकर (संगीत /अभिनय) (६) श्री. जयंत इंदूरकर (संगीत /अभिनय) (७) कु. रागिणी खंडकर (अभिनय). त्याच दिवशी रात्री संगीत कान्होपात्रा नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. हजारो अमरावतीकर रसिकांनी त्याचा आस्वाद घेतला.

■

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाचा १ एप्रिल ते ३० जून चा अहवाल सादर करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. या तीन महिन्यात नागपुरातील मान्यवर साहित्यिकांनी व अभ्यासकांनी देणगीदाखल ग्रंथ देऊन शिवाजी संदर्भ ग्रंथालय समृद्ध केले. कै. मनूताई नातू यांच्या देणगीचा विशेष उल्लेख करावा लागेल. आपल्या अमूल्य खाजगी संग्रहातील एकूण ६४० ग्रंथ व दुर्मिळ नियतकालिके देणगीदाखल देऊन त्यांचे पती प्रा. दि. य. देशपांडे यांनी हे ग्रंथालय समृद्ध केले आहे. त्याचबरोबर सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी ११० ग्रंथ व ७४ नियतकालिकांचा संच ग्रंथालयाला देणगीदाखल दिलेला आहे. सुप्रसिद्ध पत्रकार श्री. चंद्रशेखर फडणीस यांनी ३०० ग्रंथ देऊन शिवाजी संदर्भ ग्रंथालय समृद्ध केले आहे.

अ.	परीक्षा	परीक्षार्थीचे /केंद्राचे नाव पत्ता
६.	म. प्रबोध	चित्तरंजन पद्माकरराव पांढरे, सिटी कॉन्व्हेंट, बल्लारपूर
७.	म. प्राथमिक	एकनाथ केवलराम बोबाटे, जि. प. पूर्व मा. विद्यालय, निमगाव
८.	म. प्रारंभ	कु. पल्लवी अरुण कायंदे, बाल मंदिर सेकंडरी स्कूल, नागपूर
९.	म. प्रारंभोत्तर	कु. मीनल श्रीधरराव खर्डेनवीस, लोकांची शाळा, सिरसपेठ, नागपूर
१०.	पूव विनीत	अमोल अशोकराव गुंडावार, शिवाजी हायस्कूल चामोर्शी, जि. गडचिरोली
११.	साहित्य विनीत १	कु. कल्पना नामदेवराव इंगोले, सेवासदन हायस्कूल, नागपूर
१२.	साहित्य विनीत : २	कु. प्रज्ञा कृष्णराव तळवेकर, लोकांची शाळा, नागपूर (कै. ना. कृ. दिवाणजी रोख पारितोषिक) (३१+२०) व वि. सा. संघ पारितोषिक
१३.	साहित्य परिचित १	: कु. मंजुषा प्रभाकरराव गोतमारे, लोकांची शाळा, नागपूर
१४.	साहित्य परिचित १	: कु. मीरा विनायकराव पडोळे, लोकांची शाळा, नागपूर
१५.	साहित्य परिचित २	: कु. मंजूषा वढूरामराव पटेल, लोकमान्य टिळक विद्यालय, ब्रह्मपुरी
१६	साहित्य परिचित २	: श्रीकृष्ण लक्ष्मीनारायणजी राठी, यशवंत महाविद्यालय, वर्धा
१७.	भाषा स्नातक ३	: कु. वंदना गोपाळराव भानारकर, व्ही. एम. व्ही. महाविद्यालय, नागपूर
१८.	भाषा स्नातक ३	: कु. मंगला नारायण काकपुरे, भा. भा. मंदिर, नागपूर
१९.	म. प्रवीण	
२०.	म. प्राज्ञ	देवनाथसिंग रामगोविंदसिंग ठाकूर, विदर्भ साहित्य संघ, नागपूर
२१.	साहित्य पारंगत	: कु. वीणा, विडकर विदर्भ साहित्य संघ, नागपूर कै. डॉ. वा. ग. शिंगणापूरकर रोख पारितोषिक (५१+५०) वि. सा. संघ पारितोषिक

२२. सर्वाधिक परीक्षार्थी–प्रा. श्री. कापगते, कर्मवीर महाविद्यालय, मूल
व परीक्षा शुल्क पुरस्कार डॉ. श्री. विजयकुमार इंगळे, लोकांची शाळा, नागपूर

२२. माध्यमिक शालान्त परीक्षेत मराठी विषयात सर्वप्रथम (विभागून)
श्री. विनोदकुमार हरदयालदास आसुदानी, } घर क्र. ४२, हेंमू कॉलनी चौक
श्री. घनश्याम हरदयालदास आसुदानी } जरीपटका, नागपूर १४
कु. अनुभूती विजय मेटकर, लखोटिया भुतडा विद्यालय, कोंढाळी

"आजीव सभासद"

१ एप्रिल ८८ ते ३० जून ८८ पर्यंत

सौ. पुजारी ज्योती मोहनराव, श्री. दिवाळे विनयकुमार (सर्व नागपूर), श्री. जामकर मधु (परळी वैजनाथ), श्री. लांजेवार विठ्ठल बुधाजी, भुरे तेजराम (सर्व भंडारा), डॉ. श्री. नरुद्दीन पीरभाई, प्रा. थारकर मनोहर, जिल्हेवार विनोद बाळाभाऊ, डॉ पद्मावार प्रफुल्लचंद्र माधवराव, प्रा. श्री. गोरंटीवार रमेश सदाशिवराव, आसगावकर दीपक श्रीराम (सर्व पुसद) श्री. शेटे किसनराव मादगुजी (चामोर्शी), प्रा. त्रिपत्तीवार विनायक (धामणगाव रेल्वे), श्री. उजवणे दामोदरपंत भगवान (अमरावती), प्रा. बोंडे ज्ञानदेवहरी (नरखेड), श्री. पोटे अनंत हरीहर, श्री. देवसरकर पुरुषोत्तम, सौ. पांडे शुभांगी, श्री. देशपांडे उत्तमराव रंगराव (सर्व उमरखेड), सौ. बारोकार निर्मला जयवंतराव, सौ. गजभिये रमा अंबादास (सर्व रामटेक), प्रा. श्री. मेश्राम आनंद, श्री. गिन्हेपुंजे धनराज बाजीराव, श्री. सपाटे पुंडलिक बापुजी, प्रा. डॉ. हुडप गोविंद नि, श्री. लाखनीकर परशुराम गोविंद, श्री. येळणे एकनाथ निळकंठ (सर्व लाखनी), श्री. बनहट्टी राजेंद्र (पुणे) श्री. काण्णव आनंद शंकर, प्रा. डॉ. डोळके अशोक महादेव (सर्व मुंबई)

अनुक्रमणिका

वाङ्मय पारितोषिक निधी
(१२ जुलै १९८८ पर्यंत)

(१)	श्री. मा. नी. गलगलीकर	५०००
(२)	श्री. मदन धनकर	१०१०
(३)	मे. शेवाळकर डेव्हलपर्स	१००१
(४)	डॉ. व. कृ. वऱ्हाडपांडे	१००१
(५)	श्री. सुरेश द्वादशीवार	१०००
(६)	सौ शोभाताई उबगडे	५१०
(७)	श्री. मनोहर म्हैसाळकर	५०१
(८)	खासदार शांताराम पोटदुखे	५०१
(९)	दशरथ सिडाम	५०१
(१०)	श्री. अनिल गंगाराम वोहेकर	५०१
(११)	श्री. वामनराव तेलंग	५००
(१२)	वि. सा. संघ शाखा भंडारा	५००
(१३)	नीडोज् हॉटेल ॲन्ड रेस्टॉरंट	५००
(१४)	श्री. आर. बी. दखणे	५००
(१५)	श्री. दीपक आसाराम	५००
(१६)	श्री. किशोर जयस्वाल	५००
(१७)	श्री. नवनीत देशमुख	२५१
(१८)	श्री. नारायण कुळकर्णी कवठेकर	२५०
(१९)	प्रा. डॉ सुनंदा कविमंडन	१०१
(२०)	श्री. सुरेश आकोटकर	१०१
(२१)	श्री. अविनाश रिनके	५२
(२२)	सौ कुंदा केळापुरे	५१
(२३)	संचालक, लोकमान्य टिळक पर्स फंड	५०
(२४)	डॉ. मधुकर वाकोडे	५०
(२५)	मंजुषा फुके	३५
(२६)	सौ. ज्योति सोचे	२५
(२७)	सुनीता शरद सहस्रबुद्धे	२५
(२८)	सौ. एम. एस. परांजपे	२५
(२९)	सौ. उज्ज्वला देशपांडे	२५
(३०)	श्रीमती अनुसया अग्रोल	२५
(३१)	माया देवगांवकर	२५
(३२)	कु. विद्या फडणीस	२५
(३३)	सौ धनश्री वैद्य	२५
(३४)	सौ. अंधारे	२५
(३५)	सौ. शिल्पा घाटे	२५
(३६)	कु. अरुणा बाबणकर	२५
(३७)	वंदना भांडारकर	२५
(३८)	कु. रावळे	२५
(३९)	श्री. दामोदर बारापात्रे	२५
(४०)	सौ मंगला देशपांडे	२५
(४१)	सौं छाया नाईक	२५
(४२)	श्री. कृष्ण राऊत	२५
(४३)	सौं. सुषमा पटवर्धन	२५
(४४)	सौ. संध्या अमृते	२५
(४५)	कु. प्रतिभा देशमुख	२५
(४६)	श्री. चंद्रकांत कुळकर्णी	२०
(४७)	श्री. प्रकाश एदलाबादकर	१०
(४८)	श्री. श्रीपाद जोशी	१०
(४९)	श्री. योगेश बऱ्हाणपुरे	१०
(५०)	सौ. आशा सावदेकर	१०

१-४-८८ ते ३०-६-८८

धामणगाव रेल्वे

शाखेने एका आठवड्याचे नाट्य प्रशिक्षण शिबीर ता. १५ ते २० जून १९८८ ला आयोजित करून स्थानिक तरुण कलावंतांमधील नाट्यगुणांचा शोध घेतला. या प्रशिक्षण काळात नाट्य-क्षेत्रातील मुरब्बी जाणकारांना पाचारण करून तरुण आणि बालक कलावंतांना अभिनय व नाट्य-कलेचे धडे देण्यात आले. दि. १५ जून ला अमरावतीच्या नाट्यधर्मीचे श्री. अनंत पाठक यांनी अभिनयाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले. यात सनर्जीपासींग, साउंड अँड रिस्पॉन्स इत्यादि थियेटर गेम्सचा समावेश होता.

श्री. फंदे बंधू, श्री. कळसकर, श्री. वखरे व श्री. पाटील यांनी योगासंबंधी मार्गदर्शन केले. श्री. दत्ता सराफ आणि श्री. कोठारी यांनी बहुमोल सहाय्य केले.

दिनांक २० जून रोजी श्री. अण्णासाहेब घोडे व श्री. बाबासाहेब म्हात्रे यांचे उपस्थितीत प्रशिक्षणार्थिनीच लिहून, दिग्दर्शित व अभिनीत केलेली ज्वलंत सामाजिक प्रश्नांवरील चार नाटिका सादर केल्या व उपस्थितकांडून दाद घेतली. एका नव्या प्रयोगाचे सर्वांनीच कौतुक केले.

या सादरीकरणानंतर श्री. अण्णासाहेब घोडे ह्यांचे हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण झाले. श्री. बाबासाहेब म्हात्रे यावेळी प्रमुख अतिथी होते.

गडचिरोली

गडचिरोली शाखा व 'सर्च' यांनी संयुक्तपणे दि. २६-५-८८ रोजी रात्री ९ वाजता वऱ्हाडीकवी प्रा. विठ्ठल वाघ यांच्या काव्यगायनाची मैफिल संपन्न झाली. शाखाकार्याध्यक्ष श्री. गो. ना. मुनघाटे यांनी प्रा. वाघांचे आणि 'सर्च'तर्फे डॉ. राणी बंग यांनी सौ. वाघ यांचे स्वागत केले. प्रास्ताविक डॉ. अभय बंग यांनी केले तर संचालन श्री. प्रमोद मुनघाटे यांनी केले. विठ्ठल वाघांनी आपल्या वऱ्हाडी कवितांनी उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले आणि श्रोत्यांनीही त्यांच्या लोकप्रिय गीतांना मनापासून दाद दिली.

शेंबाळ पिंप्री

शाखेनी १९८८-८९ करिता खालीलप्रमाणे कार्यकारिणीची निवड केली आहे.

(१) अध्यक्षा-श्रीमती विजयमाला वि. देशमुख (२) कार्याध्यक्ष-श्री. भाऊराव रंगराव केली देशमुख (३) कार्योपाध्याक्ष-(१) नूरखाँ पठाण (२) म. जहांगीर, म. पटेल, (४) सचिव-श्री. रामराव लक्ष्मण सूर्यवंशी (५) सहसचिव- दिलीप जाधव, (२) श्री. सुरेश पांडे (६) खजिनदार -शे. खलील शे. हुसेन (७) सहखजिनदार-श्री. बाबुराव टेकाडे (८) कार्यक्रमप्रमुख सर्वश्री. (१) उत्तम घोगरे (२) शे. अक्रम (३) प्रमोद पांडे (४) विनायक पांडे (५) गणेश सूर्यवंशी (६) संजय सूर्यवंशी.

लाखनी

"यावर्षी महाराष्ट्राचे महाकवी कुसुमाग्रज यांचे हीरकमहोत्सवी वर्ष आहे. म्हणून त्यांच्या जीवनयज्ञात लाखनी शाखेच्या दहाव्या वर्धापन दिनी बोलताना मी या शाखेच्या वतीने माझी

शब्दरूपी आदरांजली समिधा म्हणून वाहते" असे उद्गार समर्थ महाविद्यालयाच्या इंग्रजीच्या प्राध्यापिका डॉ. सुनंदा कविमंडन यांनी काढले.

प्रास्ताविकात सचिव द. सा. बोरकर यानी शाखेचा दहा वर्षाचा आढावा सादर केला.

याप्रसंगी लाखनी केन्द्रातून मराठी विषयात सर्वोच्च गुण प्राप्त करणाऱ्या खालील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

(१) वर्ग १० वा– संजय एकनाथ पाखमोडे (मेरीट–२६)– गांधी वि. लाखनी.

(२) वर्ग १२ वा– कु. भारती महादेवराव चाचेरकर– समर्थ क. म. वि. लाखनी.

(३) बी. ए. (मराठी वाङ्मय) ज्ञानेश्वर गोविंदराव धांडे– समर्थ म. वि. लाखनी.

बालचित्र स्पर्धा घेण्यात आली – त्यातील यशस्वी विद्यार्थ्यांना पुस्तके व प्रशस्तिपत्रे देण्यात आणि त्यांची नावे अशी–

(१) कु. मुक्ता दवलत बोरकर प्रथम वर्ग ७ वा– समर्थ विद्यालय लाखनी.

(२) सुधीर श्रीरामबापू हटनागर प्रथम वर्ग ८ वा– जि. प. वि. पोहरा.

(३) मोहनदास भैय्याजी बुराडे द्वितीय वर्ग ९ वा– समर्थ विद्यालय लाखनी.

(४) खेमराज शामरावजी वाघाये तृतीय वर्ग ८ वा– जि. प. विद्यालय पोहरा.

याप्रसंगी या भागातील सावरी गावचे प्रा. नरेश वंजारी यावर्षी नागपूर विद्यापीठात एम्. ए. ला मराठी विषय घेऊन प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्याबद्दल त्याचाही विशेष सत्कार करण्यात आला.

सरचिटणीस

"शापदग्ध" कथासंग्रहाचे प्रकाशन

विदर्भ साहित्य संघ, विदर्भ लेखक संघ आणि सुविचार प्रकाशन मंडळ नागपूर या तीन संस्थांतर्फे हिंगणघाटचे डॉ. मल्हार गंगाधर कावळे यांच्या "शापदग्ध" या कथासंग्रहाचे प्रकाशन प्रा के. ज. पुरोहित (शांताराम) याचे हस्ते दि. २७ जानेवारी १९८८ रोजी विदर्भ साहित्य संघाचे गडकरी सभागृहात झाले. डॉ. सुरेंद्र बारलिंगे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ हे अध्यक्षस्थानी होते. श्री. वि. तथा मामासाहेब घुमरे, सौ. सुलभा हेर्लेकर आणि डॉ. श्रीकांत चोरघडे यांची या प्रसंगी भाषणे झाली.

YUGAVANI / L-22 Regd. News Paper / NGP/ 341 / ० युगवाणी / एप्रिल;मे;जून १९८८

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर - ४४००१२.
मुद्रक मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर - ४४००१२.